COLLEGE OF ARTS & COMMERCE
LIBRARY.

# र स रा ज

## खंड क्र ३

( रसराज अंकांचा बांधीव खंड )

| अंक क्रमांक | वर्ष |
|---|---|
| १०. | १९८९ - १९९० |
| ११. | १९९० - १९९१ |
| १२. | १९९१ - १९९२ |
| १३. | १९९२ - १९९३ |
| १४. | १९९३ - १९९४ |

**महत्वाची सूचना** :- सदरचा खंड ग्रंथालयाबाहेर नेवू नये तसेच कोणत्याही परिस्थितीत आतील मजकूराचे कात्रण काढू नये

प्राचार्य

SHRI S. H. KELKAR COLLEGE OF ARTS,
COMMERCE & SCIENCE,
DEVGAD, DIST-SINDHUDURG
LIBRARY
This is valuable and
cannot be taken outside the
Library without the special
permission of the Librarian

# र स रा ज

## खंड क्र. ३

( रसराज अंकांचा बांधीत खंड )

| अंक क्रमांक | वर्ष |
|---|---|
| १०. | १९८९ - १९९० |
| ११. | १९९० - १९९१ |
| १२. | १९९१ - १९९२ |
| १३. | १९९२ - १९९३ |
| १४. | १९९३ - १९९४ |

महत्त्वाची सूचना :- सदरचा खंड ग्रंथालयाबाहेर नेवू नये
तसेच कसल्याही परिस्थितीत आतील मजकूराचे कात्रण काढू नये.

प्राचार्य


सराज
१९८९-९०
सार्क
बालिका वर्ष

# निरोप



प्राचार्यासमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यासमवेत तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थी

शिक्षण विकास मंडळाचे
श्री सदाशिव हरी केळकर कला व
वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# स्वराज

## १९८९-९०

अंक १० वा

**संपादक मंडळ**

प्राचार्य आर. ए. कुलकर्णी – अध्यक्ष
प्रा. विनायक पाटील – मुख्य संपादक

सहाय्यक संपादक

**वरिष्ठ विभाग**

प्रा. आनंद जरग
प्रा. वसंत कांबळे

**कनिष्ठ विभाग**

प्रा. लता वळसंगकर
प्रा. हेमंत चव्हाण
प्रा. बाबुराव पोवार

## विद्यार्थी संपादक मंडळ

### वरिष्ठ विभाग

संजय धुरी
संतोष खडपे
संदीप फडके
संजय कुळकर्णी
संगीता बर्वे

### कनिष्ठ विभाग

ज्ञानदेव परब
मंदार जोशी
माधुरी गोरे
मृणाल काळे

## अंतरंग

संपादकीय
छायाचित्रे

**वरिष्ठ विभाग**

मराठी
इंग्रजी

**कनिष्ठ विभाग**

मराठी
इंग्रजी
कॉलेज डायरी
पारितोषिके

## मुखपृष्ठ

सार्क बालिका वर्षाच्या
निमित्ताने

## चित्रमुद्रा

मास ॲडव्हरटायझींग
कोल्हापूर

# संपादकीय

जागतिक इतिहासात गेले वर्ष विलक्षण क्रांतिकारी ठरले. आंतरराष्ट्रीय राजकारणात, समाजकारणात व अर्थकारणात अनेक घडामोडींची नोंद ह्या वर्षात झालेली दिसेल. कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेला साम्यवादाचा पोलादी पडदा युरोपातून नष्ट होऊन अनेक देशांनी आधुनिक लोकशाहीकडे वाटचाल सुरू केली आहे. रूमानिया, झेकोस्लाव्हाकिया ही त्याची ठळक उदाहरणे. साम्यवादाची जननी समजल्या जाणाऱ्या खुद्द रशियातच गोर्बाचेव्ह महाशयांनी ' पेरेस्त्राईका ' व ' ग्लासनोस्त ' या नावाच्या अद्‌भूत उपक्रमांनी उदारमतवादाकडे वाटचाल सुरू केली आहे. रशियात हा बदल होताच त्याचे परिणाम लगेचच युरोपवर होण्यास प्रारंभ झाला. जर्मनीला दुभंगणारी बर्लिनची भिंतही नष्ट होऊन दुसऱ्या महायुद्धानंतर विभागलेल्या पश्चिम जर्मनी व पूर्व जर्मनीच्या एकीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. १९९१ च्या प्रारंभी ' अखंड जर्मनी ' युरोपच्या नकाशावर दिसेल. युरोपातील स्थित्यंतराची प्रतिक्रिया आशिया खंडात उमटली नाही तर नवलच ! चीनमध्ये लोकशाहीची चळवळ मोडून काढण्यात तेथील साम्यवादी शासनाला तात्पुरते यश आले असले तरी उत्तर कोरीया व दक्षिण कोरीयाच्या एकीकरणाचे वारे वाहू लागले आहेत.

विसावे शतक हे 'स्वातंत्र्याचे शतक' म्हणावे लागेल. दक्षिण अफ्रिकेच्या वर्णद्वेशी सरकारने स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या नेल्सन मंडेलाची तब्बल २७ वर्षांच्या अटकेनंतर तुरुंगातून मुक्तता केली. नेल्सन मंडेलांची मुक्तता म्हणजे दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्याची नांदी म्हणावे लागेल. शेजारचा नामिबिया हा देश तर २१ मार्चला गोऱ्यांच्या वर्चस्वाखालून मुक्त झाला आहे. आता लवकरच दक्षिण आफ्रिका स्वतंत्र होऊन तेथे काळ्यांचे सरकार येण्याची लक्षणे दिसत आहेत.

भारतीय उपखंडात पर्यायाने दक्षिण आशियात शांतता व सहकार्य नांदावे म्हणून स्थापन झालेल्या सात देशांच्या ' सार्क ' परिषदेने १९९० हे वर्ष ' वर्ष बालिका ' म्हणून साजरे करण्याचे आवाहन केले आहे. ' सार्क ' मध्ये मोडणाऱ्या देशांत बालिकांची स्थिती भयानक आहे. विशेषतः भारतात तर लहानपणीच मुलींना देवदासी बनविण्याची पद्धत आहे. या मुली वयात आल्या की त्यांना वेश्या व्यवसायास लावले जाते. आज महाराष्ट्र व कर्नाटकातील बहुसंख्य वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया ह्या पूर्वीच्या देवदासीच आहेत. वेश्याव्यवसायामुळे सामाजिक आरोग्याला किती धोका निर्माण झाला आहे हे कोल्हापूरमधील घटनेवरून स्पष्ट झाले आहे. आज जगात कॅन्सरपेक्षाही भयानक समजल्या जाणाऱ्या ' एडस् ' रोगाची लागण कोल्हापुरातील वेश्यांना झालेली

आहे, तर दुसरीकडे बालिका वर्षातच रिंकू पाटील सारख्या विद्यार्थिनीस शाळेतच जाळून मारले गेले. सार्‍या बालिका वर्षाची ही शोकांतिकाच नव्हे काय ?

यावर्षी भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'भारतरत्न' ही सर्वोच्च बहुमानाची पदवी मरणोत्तर का होईना देऊन आंबेडकरांचा पर्यायाने दलित समाजाचाच एक प्रकारे गौरव केला आहे. परंतु बाबासाहेबांनी सांगितलेल्या शिकवणीचा मात्र समाजाला व देशालाही आज विसर झालेला दिसतो. अखंड भारतासाठी न लढता आमचे देशबांधव धर्मासाठी लढत असून काही शक्ती स्वतःच्या स्वार्थी राजकारणासाठी धर्माची ढाल पुढे करून जनतेला भडकवत आहेत, हे पंजाब व काश्मीर मधील देशविघातक चळवळीवरून स्पष्ट झाले आहे.

या सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांना स्पर्श करणारे विषय 'रसराज' मध्ये देण्याचा आम्ही अल्पसा प्रयत्न केला आहे. केवळ साहित्यिक चर्चेऐवजी जागतिक घडामोडीकडे डोळसपणे पाहून ज्वलंत समस्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, त्यांचा दृष्टिकोन व्यापक व्हावा, हाच यामागील उद्देश आहे.

**विनायक पाटील**

# आमचे स्फूर्तिस्थान



**माननीय श्री. शां. कृ. तथा**
**बापूसाहेब पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड

## तृतीय वर्ष कला-प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


राजेंद्र मुंबरकर


शरद शिंदे


हरीहर वाटवे


अजयकुमार चोपडेकर


उमेश बिडये


दयानंद पाटकर


भालचंद्र तारी


नारायण जाधव


वामन भुजबळ


प्रकाश पाटणकर


संजीवनी शिरसाट


ज्योत्स्ना मांजरेकर


दत्तात्रय प्रभू

# आमचा अभिमान


मंगेश लाड

## प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



अकिला खान
तृतीय वर्ष/कला



छाया जामसंडेकर
तृतीय वर्ष/कला



सरिता नाईकसाटम
तृतीय वर्ष/कला



मधुबाला मुणगेकर
बारावी/कला



विनीता खाडीलकर
बारावी/कला



मंगल भुजबळ
बारावी/कला



मिलिंद भिडे
बारावी/कला



भाग्यश्री इचलकरंजीकर
बारावी/कला



श्यामसुंदर जोशी
बारावी/कला



दया खाडीलकर
बारावी/वाणिज्य



मंगेश केसरकर
बारावी/वाणिज्य



गीता मेस्त्री
बारावी/वाणिज्य



रमेश गोखले
बारावी/वाणिज्य



पांडुरंग पडेलकर
बारावी/वाणिज्य



पद्मा जोशी
बारावी/वाणिज्य



सुचिता परब
बारावी/वाणिज्य

# नेतृत्व...

## वरिष्ठ विभाग

संजय धुरी



जनरल सेक्रेटरी

कल्पना बापट



विद्यार्थिनी प्रतिनिधी

सचिन देशपांडे



विद्यापीठ प्रतिनिधी

## वर्ग प्रतिनिधी

| हेमंत पिसे | संजय धुरी | सचिन देशपांडे | रहीम खान | कल्पना बापट | उदय रूमडे | राजेंद्र घाडी |
|---|---|---|---|---|---|---|



| तृतीय वर्ष कला | तृतीय वर्ष वाणिज्य | द्वितीय वर्ष कला | द्वितीय वर्ष वाणिज्य | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम वर्ष कला | प्रथम वर्ष वाणिज्य |
|---|---|---|---|---|---|---|

## जनरल चँपियनशिप



जितेंद्र उपरकर



ज्योति तानवडे

# नेतृत्व . . .

## वर्गप्रतिनिधी–कनिष्ठ विभाग

| राजेंद्र भुजबळ | पंढरीनाथ पराडकर | धर्मेंद्र कदम | संदीप जाचक | प्रवीण सावंत | ज्ञानदेव परब | प्रसाद कुलकर्णी |
|---|---|---|---|---|---|---|



| बारावी कला (अ) | बारावी कला (ब) | बारावी वाणिज्य | बारावी विज्ञान | अकरावी कला | अकरावी वाणिज्य | अकरावी विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|



धर्मेंद्र कदम
जनरल सेक्रेटरी



माधुरी गोगटे
विद्यार्थिनी प्रतिनिधी

## जनरल चँपियनशिप



प्रवीण सावंत



भारती नरे

# रसराज–संपादक मंडळ

## वरिष्ठ विभाग–विद्यार्थी संपादक समिती



संजय धुरी    संतोष खडपे    संजय कुळकर्णी    संगीता बर्वे    संदीप फडके

## कनिष्ठ विभाग



ज्ञानदेव परब    मृणाल काळे    माधुरी गोरे    मंदार जोशी

## प्राध्यापक संपादक मंडळ



## रसराज–विशेष उपक्रम




म. गांधी विशेषांक



मधुबाला विशेषांक



लता मंगेशकर विशेषांक

# राष्ट्रीय सेवा योजना

## विद्यार्थी समिती



संजय शिंदे | जितेंद्र उपरकर | सीमा वझे | शुभांगी सावंत | सुनील सरवणकर | पद्माकर हिरनाईक



वृक्षारोपण करताना
देवगड रोटरीचे अध्यक्ष
भालचंद्र धुरी



कावलेवाडी येथे
श्रमदान करताना

# स्नेहसंम्मेलन



द. मा. मिरासदार विनोदाचे आख्यान सांगताना



'साडी डे' च्या
गराड्यात रंगलेली
प्राध्यापकांची
संगीत खुर्ची



'टाय डे' असा
साजरा झाला.

# स्नेहसंमेलन





' रोज डे ' मधील काही क्षण



उत्कृष्ट वादक रवि कोयंडेचा सत्कार



प्राचार्य विद्यार्थ्यास गुलाब देताना



' ग्रामीण विकास ' विषयात बी. ए. परीक्षेत विद्यापीठात
प्रथम आलेल्या राजेंद्र मुंबरकरचे कौतुक करताना

## स्नेहसंमेलन











दर्दभरी संध्याकाळ

## स्नेहसंमेलन











दर्दभरी संध्याकाळ



डॉ. वळसंगकर
भूगोल प्रदर्शनाचे उद्घाटन करताना



डॉ. प्रभू मातोंडकर
अंटार्क्टिका मोहिमेचे अनुभव सांगताना



प्रदर्शनास विद्यार्थ्यांची भेट



डॉ. देशमुख
' मानव व पर्यावरण ' यावर बोलताना

# भूगोल दिन



डॉ. अनिल वळसंगकर सागर संशोधनाचे महत्त्व सांगताना



भूगोल विभागाची सिंधुदुर्गकडे सफर

# केल्याने देशाटन



महाविद्यालयाची सहल डेरवण येथे



' ग्रामीण विकास ' विभागाची
वारणा प्रकल्पास भेट



ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्याची पाहणी
करताना इतिहास विभागाचे विद्यार्थी



**भाग्यश्री इचलकरंजीकर**
उत्कृष्ट वृत्तपत्र वाचक



**मधुबाला मुणगेकर**
उत्कृष्ट वाचक



**प्रकाश गोगटे**
उत्कृष्ट अभिनेता



**संगीता कोयंडे**
उत्कृष्ट अभिनेत्री



**संजय धुरी**
आदर्श विद्यार्थी



**ज्योति तानवडे/राजेंद्र जामसंडेकर**
उत्कृष्ट युगुल गीत



**राजेंद्र जामसंडेकर/संध्या पांचाळ**
उत्कृष्ट गायक – गायिका



**प्रात्यक्षिकासह अभिनयाचे पैलू उलगडून दाखविताना श्री. कमलाकर सोनटक्के**









**भाग्यश्री इचलकरंजीकर**
उत्कृष्ट वृत्तपत्र वाचक



**मधुबाला मुणगेकर**
उत्कृष्ट वाचक



**प्रकाश गोगटे**
उत्कृष्ट अभिनेता



**संगीता कोयंडे**
उत्कृष्ट अभिनेत्री



**संजय धुरी**
आदर्श विद्यार्थी



**ज्योति तानवडे/राजेंद्र जामसंडेकर**
उत्कृष्ट युगुल गीत



**राजेंद्र जामसंडेकर/संध्या पांचाळ**
उत्कृष्ट गायक – गायिका



**प्रात्यक्षिकासह अभिनयाचे पैलू उलगडून दाखविताना श्री. कमलाकर सोनटक्के**



कुलगुरु डॉ मेहरु बेंगाली यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट



प्राचार्य कुलकर्णी कुलगुरुंचे स्वागत करताना



एन. एस. एस. शिबिरात देवगड रोटेरियन्स

# वरिष्ठ विभाग

# सार्क बालिका वर्ष

**अशोक साईम**
तृतीय वर्ष/कला

१९९० हे वर्ष 'बालिका वर्ष' म्हणून साजरे करण्याचे आवाहन 'सार्क' या संघटनेने केले आहे. त्यानिमित्ताने हा लेख–

दक्षिण आशिया प्रादेशिक परिषदेत ( सार्क ) संमत झालेल्या ठरावानुसार १९९० हे साल 'बालिका वर्ष' म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. जागतिक वर्ष जाहीर करताना ज्या विषयाला महत्त्व दिलेलं असतं त्या विषयाकडे सर्व जगाचं लक्ष वेधलं जावं अशी मूळ कल्पना असते. मग ते बालक वर्ष असो वा युवा वर्ष असो. विविध क्षेत्रात काम करणारी मंडळी मग ह्या विषयाच्या संदर्भात काही उपक्रम, प्रकल्प वा कार्यक्रम हाती घेतात.

'सार्क'नं जाहीर केलेल्या बालिका वा कन्या वर्षाची व्याप्ती मुलगी जन्माच्या पासून ते तिचं लग्न होईपर्यंतची वर्षे धरायला हरकत नाही.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कौटुंबिक स्वास्थ्य व पर्यायाने सामाजिक स्वास्थ्य हे स्त्रीच्या क्षमतेवर अवलंबून असते. आदर्श व सामर्थ्यवान समाजाची निर्मिती करावयाची असल्यास स्त्रियांना समर्थ बनविण्याकडे, त्यांच्या विकासाकडे योग्य ते लक्ष द्यायला पाहिजे. स्त्रियांच्या प्रगतीचा पाया हा त्यांच्या बाल्यावस्थेत होणाऱ्या संवर्धनावर, पोषणावर, संस्कार व शिक्षणावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असतो. परंतु खेदाची गोष्ट अशी की, या बाल्यावस्थेतील (विशेषतः बालिकांच्या) संवर्धन, पोषण या बाबीकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. म्हणून या बाबतीत विशेष जाणीव निर्माण करण्यासाठी १९९० हे वर्ष 'बालिका वर्ष' म्हणून साजरे करण्याचे सार्क देशांनी ठरविले आहे. या सात देशातील बऱ्याच ठिकाणी बालकांची स्थिती दयनीय आहे. सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यदृष्ट्या सर्वच दृष्टीने सद्य परिस्थिती हलाखीची आहे. बालक व बालिकांना आहार, पोषण इ. समानतेच्या भूमिकेवरून मिळत नाही, हे आपण सर्वत्रच पहात आहोत. ही वागणुकीतील तफावत दूर केली पाहिजे. सदृढ, सुजान, सुबुद्ध अशी भावी पिढी तयार करण्यासाठी पहिली पायरी म्हणून बालिकांकडे समानतेच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. आहार, पोषण, शिक्षण, आरोग्य इ. बालिकांना आवश्यक प्रमाणात मिळणे ही काळाची गरज आहे. आजपर्यंत दुर्लक्षित अशा या विषयाकडे लक्ष देऊन भरीव योजनांचे नियोजन करून त्याची अंमलबजावणी द्रुतगतीने सुरु करावी हाच हे बालिका वर्ष म्हणून जाहीर करण्यामागचा हेतू आहे.

'सार्क' ने हे वर्ष 'बालिकावर्ष' म्हणून साजरे करण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय बालिकांकडे पाहिल्यास ही बालिका स्वतंत्र, निर्भीड, सुजाण असल्याचे दिसत नाही तर बालक, पुरुष व महिला या सर्वांनीच बालिकांना अक्षरशः अंधश्रद्धेच्या, खोट्या कल्पनांच्या साखळदंडानी घट्ट बांधून ठेवले आहे. असे म्हटल्यास अयोग्य ठरणार नाही. भारतातील आजची बालिका ही कोमेजलेली व समाजाच्या अदृश्य ओझ्याखाला दबलेली दिसते. बालिका ही समाजव्यवस्थेतील एक उपेक्षित घटक बनली आहे. एखाद्या कुटुंबात मुलगी जन्माला आली की तो सर्वांचाच 'नावडता' क्षण ठरतो. आई–बापाच्या दृष्टीने देखील...! परंतु मुलाचा जन्म झाला तर आनंद काय वर्णावा ?

मग ...... आई वडिलांना मुली का नको असतात ? त्या मोठेपणी आपल्या घरात राहत नाहीत म्हणून? त्यांच्या लग्नावर खर्च करावा लागतो म्हणून? त्या म्हातारपणी आपल्याला सांभाळणार नसतात म्हणून ? मुलीची अब्रू जपणं हे ओझं असतं म्हणून ? हे सगळे खरे तर समाजातल्या वाईट चालीरीतीचे, समाजमनाच्या क्रूरपणाचे पडसाद आहेत. समाजात घराबाहेर मुलींना मानाचं स्थान असेल, स्वतंत्रपणे जगता येत असेल, समाजाची भीती वाटावी असं काही घडणार नसेल तर आईबापांना मुलीचे ओझे वाटेलच कसे ?

गर्भजल परीक्षेच्या ज्ञानाचा फायदा घेऊन मुलीला गर्भात असतानाच तिची हत्या करणे, लहाणपणापासून परक्याचे धन म्हणूनच वागणूक देणे, मुलगा व मुलगी या दोघांनाही वाढवताना दिली जाणारी भेदभावाची वागणूक यावरून भारतीय समाजव्यवस्थेत मुलीकडे किती उपेक्षित दृष्टीने पाहिले जाते, तिच्यावर किती अन्याय केला जातो हे स्पष्ट होते. स्वतःच्या कन्येलाच जिथे आई–वडील कनिष्ठ वागणूक देतात, अशा स्थितीत मुलींना समाजात काय स्थान आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

'सार्क'नं १९९० हे ' आंतरराष्ट्रीय बालिका वर्ष' म्हणून साजरे करण्याचे आवाहन केले आहे. विशेष म्हणजे भारत हा 'सार्क' मधील एक प्रमुख देश. या देशात आणि तेही बालिका वर्षात बालिकांचा मानसन्मान राखणे तर सोडाच पण त्यांना कोणत्या आपत्तींना, संकटांना सामोरे जावे लागत आहे हे वृत्तपत्रातील विविध घटना वाचल्यानंतर दिसून येते. मन सुन्न करणारे, काळीज पिळवटून टाकणारे अत्याचार मुलीवर केले जात आहेत व स्वतःला पुरोगामी समजणारा समाज हे मख्खपणे बघत उभा आहे. यावर्षी सौंदतीच्या रेणुकादेवीला वाहिलेल्या तीन हजार मुली अर्थात ' देवदासी ' व उल्हास नगरच्या दहावीच्या संगीता पाटील हिला परीक्षेच्या वर्गातच जाळून मारण्याची घटना हे पाहिल्यानंतर आंतरराष्ट्रीय बालिका वर्षाची ही शोकांतिका आहे असे म्हटले तर त्यात चूक ती कोणती ?

बेळगाव जिल्हयातील सौंदतीच्या रेणुका देवीला माघी पौर्णिमेदिवशी ३००० अल्पवयीन मुलींना देवदासी बनविण्यात आले. ह्यातील ७० टक्के मुली हया महाराष्ट्रातील होत्या हे आश्चर्य. देवदासी म्हणून मुलींना का सोडले जाते हा इथे चर्चेचा मुद्दा नाही तर या मुली देवदासी बनल्यानंतर, त्या वयात आल्यानंतर त्यांना ज्या स्थितीला तोंड द्यावे लागते ते पाहिल्यास समस्त भारतीयांची मान खाली गेल्यावाचून राहणार नाही. देवदासी बनल्यानंतर ह्या मुलींच्या, आरोग्याची शिक्षणाची, त्यांच्या संगोपनाची संपूर्ण वाताहात होते. वेणी–फणी न केल्याने केसात जटा धरतात. तर याच मुली वयात आल्या की मुंबईच्या कुंटणखान्यात त्यांना वेश्या व्यवसायासाठी विकले जाते. त्यांचे शरीर विकून दलाल व कुंटणखान्याचे मालक श्रीमंत बनतात आणि ज्यावेळी हया देवदासीचे तारुण्य ओसरते, तेव्हा गटारातील घाणीत पडून शेवटी त्यांचा अंत होतो. हे सर्रास घडत आहे, पण सरकार पोटतिडकीने ' देवदासी ' पद्धत बंद करण्यास धजावत नाही हे दुर्दैव आहे.

दुसरी घटना उल्हास नगरातील. दहावीची परीक्षा चालू असतानाच पोलीस, विद्यार्थी, शिक्षक यांच्या साक्षीने गुंडानी संगीता पाटील ह्या सोळा वर्षाच्या कन्येस परीक्षा गृहातच पेट्रोल, डिझेल ओतून जीवंत जाळण्याचा प्रकार वाचकांना ज्ञात आहेच. ही दोन प्रातिनिधिक उदाहरणे म्हणजे आंतरराष्ट्रीय बालिका वर्षाची शोकांतिकाच आहे. जोपर्यंत बालिका असो वा महिला, त्यांना बालक व पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळत नाही, त्यांचा मान–सन्मान राखला जात नाही, तोपर्यंत ' आंतरराष्ट्रीय बालिका वर्ष ' या सारखे वर्ष साजरे करणे म्हणजे तो केवळ एक उत्सव ठरेल.

# अस्त साम्यवादाचा की मार्क्सवादाचा ?

संजय धुरी
तृतीय वर्ष/वाणिज्य

गेल्या काही महिन्यात पूर्व युरोपात एका पाठोपाठ एक भूकंपाचे धक्के बसले आणि पोलादी पडदा, पोलादी पडदा म्हणून ज्याचा धाक तो पडदा लोकक्षोभाच्या धगीत वितळलेला दुनियेला दिसला. स्टॅलिनने उभारलेल्या पोलादी पडदयाचे, पूर्व युरोपीय रूप म्हणजे बर्लिन भिंत. तीही कोसळली आणि तिचे तुकडे म्युझियममध्ये ठेवण्यासाठी विकले जात आहेत आणि पूर्व युरोपातल्या भूकंपाचे, कमी हादरे बसले असे वाटून की काय, गोर्बाचेव्ह् यानी खुद्द रशियातच बहुपक्षीय पद्धत आणण्याचे ठरवले आहे. म्हणजे साम्यवादी पक्षांची ही मृत्युघंटाच वाजते आहे. गांधींनी स्वतंत्र भारतात कॉंग्रेसचे विसर्जन करावे असे सांगितले होते. गांधीजवळ नैतिकतेखेरीज कोणताच अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांच्या शिष्यगणांनी, सत्तेकडे पाठ फिरवायचे नाकारले. सत्ता हेच सर्वस्व मानल्यानंतर अवघ्या चाळीस वर्षात कॉंग्रेसचे केवढे अध:पतन झालेले आढळते. गांधींना जे जमले नाही ते गोर्बाचेव्हनी करायचे ठरवले आहे असे दिसते.

साम्यवादाच्या तथाकथित स्थैर्याला धक्का नक्कीच लागला आहे. पण ' जुने जाऊ द्या मरणालागुनी ' असे म्हणत असताना, त्याची जागा कोणत्या नव्याने घ्यायची हे अद्याप पूर्व युरोपात ठरायचे आहे. आधुनिक काळातील नव्या युगाचा आरंभ असे म्हणता येईल असे सर्व बदलत आहे.

दहा वर्षापूर्वी या बदलाला सुरूवात झाली. पोलंडमध्ये आणि अगदी परवा परवा आल्जेरियात ते वारे पोचले. या नव्या क्रांतीचं वैशिष्टच म्हणजे कमीतकमी हिंसा, अपवाद फक्त रूमानियाचा. लोकांवर बेगुमान गोळीबार झाला तो फक्त तेथेच. केवळ चाळीस वर्षापूर्वी जर्मन आक्रमणाच्या रूपाने प्रचंड महायुद्धातल्या संहाराचा साऱ्या पूर्व युरोपाने अनुभव घेतला होता. त्याच ठिकाणी पूर्णतया अहिंसक क्रांती तेथल्या जनतेनेच घडवली हे अपूर्वच.

एका तत्त्वज्ञानाच्या नावे मूठभरांच्या हाती सर्वंकष सत्ता एकत्रित झाली होती. त्या सर्व साम्यवादी राजवटी, पत्त्याच्या बंगलीप्रमाणे कोसळल्या हे सर्वच देशातल्या बदलातले समान सूत्र. त्याच जोडीने आणखी एक बदल झाला. एकपक्षीय हुकुमशाहीच्या जागी आता बहुपक्षीय लोकशाही, तिची जागा घेत आहे. त्याच्याच जोडीने कायदयाचे राज्य.

१९३९ मध्ये महायुद्ध सुरू असताना, नाव घेण्यासारखा साम्यवादी पक्ष फक्त झेकोस्लावाकियात होता. खुद्द जर्मनीत साम्यवादी, नाझी राजवटीची शिकार होत होती. त्याचवेळी पोलंडमध्ये साम्यवादी, हिटलर आणि नंतर स्टॅलिन यांच्या दणक्याखाली संपले होते. हंगेरी आणि रूमानियात अनुक्रमे हुकुमशाही आणि दडपशाही यांच्या राजवटी होत्या. बल्गेरियन कम्युनिस्ट, रशियात निर्वासित म्हणून रहात होते. त्यामुळे युद्ध संपल्यानंतर मतपेटीच्या आधारे साम्यवादी पक्ष सत्तेवर आला तो फक्त झेकोस्लावाकियात. पण पुढे त्यांच्या नेत्याला, गॉटूवल्डला, स्टॅलिनने आपल्या पायाशी आणले आणि इतरांप्रमाणेच शीत युद्धातले एक खेळणे बनवले.

जर्मनीच्या पराभवानंतर या सर्व देशावरच्या नाझी राजवटी अर्थातच निकालात निघाल्या व त्यांची जागा लाल सैन्या मागोमाग आलेल्या रशियन हस्तकांनी

घेतल्या. प्रत्येक ठिकाणी लाल राजवटी सुरू झाल्या व इतर पक्षाना एक तर त्यात विलीन व्हावे लागले वा आपला मृत्यू पहावा लागला. अवघ्या पाच वर्षात सर्व युरोपात साम्यवादी राजवटी स्थीर झाल्या व कधीमधी झालेल्या उठावांना दडपून टाकण्याचे काम सोव्हिएत रणगाड्यांनी उत्तम प्रकारे केले.

रशियन दडपशाही पोलंडमध्ये विफल ठरताना दिसू लागली. १९८० मध्ये झालेला उठाव मोडून काढण्यासाठी तेथे मार्शल लॉ लादण्यात आला. पण कामगारांचे लोकशाही अधिकारासाठी झालेले उठाव पूर्णपणे मोडले गेले नाहीत. हा विरोध वाढत गेला आणि गेल्या साली पहिल्यांदाच साम्यवादी नसलेली व्यक्ती राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाली. पोलंड मधल्या कामगारांनी आपला पहिला निर्णायक विजय नोंदवला. हुकुमशाही साम्यवादाकडून लोकशाही समाजवादाकडे वाहणारे हे वारे मग हंगेरीपर्यंत पोचले आणि झेकोस्लावाकियात ते संचार करू लागले. पूर्व जर्मन साम्यवादी पक्षाने आता आपले नावच बदलायचे ठरवून, नव्याने ' लोकशाही ' हा शब्द असलेले नाव धारण करण्याचे ठरवले आहे. रूमानियात नाव साम्यवादी पक्षाचे पण अंमल चेसेस्कू दांपत्य आणि त्यांची टोळी यांचा. त्यामुळे सत्तांतर घडताना हजारो नागरिक ठार झाले आणि चेसेस्कू दांपत्यासकट एक हुकुमशाही सत्ता निकालात निघाली. तेथील साम्यवादी आता जणू बहिष्कृत झाले आहेत.

रूढ अर्थाने अस्तित्वात असलेले साम्यवादी पक्ष तर संपले आहेतच, पण साम्यवादी पक्षाची राजवट म्हणजे ठराविक ढाचा डोळ्यापुढे येतो, तोही आता दिसणार नाही. उदाहरणार्थ साम्यवादी राजवट म्हणजे कामगारांची हुकुमशाही, साम्यवादी पक्षाला अग्रस्थान, हे संपले. आता नव्या पक्षात 'पॉलिटब्युरो' या शब्दाला स्थान नाही. वर्षानुवर्षे पक्षाच्या नावे सत्ता गाजवणारे पूर्व जर्मनीचे होनेक्कर, हंगेरीचे फादर, बल्गेरियाचे झिव्हकोव्ह, पोलंडचे गिरेक आणि रूमानियाचे चेसेस्कू हे आता कायमचे निकालात निघाले आहेत.

काही महिन्यांच्या अवधीत फुंकर घातल्यासारख्या चाळीस वर्षाच्या धुरंधर राजवटी कोसळल्या आणि पक्ष म्हणून कम्युनिस्ट पक्ष निकालात निघाला. काही ठिकाणी पक्षाने नावे बदलली, काहींनी स्वतःचे विसर्जन स्वहस्ते केले. साम्यवाद्यांची इतकी दैना कोठच्याच काळात झाली नसेल. सगळ्या राजवटी कोसळल्यावर एक प्रश्न येतोच, 'मार्क्सवादाचे काय ? तो संपला ?'

बुडापेस्टमधल्या एका तरूण विचारवंताचे विधान तसे मार्मिकच. त्याच्यामते साम्यवाद संपला पण मार्क्स अमर आहे. म्हणजे औद्योगिक क्रांतीच्या काळातील एक श्रेष्ठ सामाजिक विचारवंत म्हणून मार्क्स निश्चितच अमर राहील, पण त्याच्या नावे त्याच्या मागून लादलेली साम्यवादी राजवट, छे... तिला मात्र तिच्या त्या स्वरूपात भवितव्य नाही.

---

# नामिबिया मुक्त झाला !

**कल्पना बापट**
द्वितीय वर्ष/वाणिज्य

अंधारयुगात चाचपडणाऱ्या नामिबिया या देशासाठी सूर्य गुरुवार ता. २१ मार्च ९० रोजी स्वातंत्र्याची पहाट घेऊन उगवला. आफ्रिका खंडाच्या आग्नेय दिशेस असलेल्या नामिबियाच्या क्षितिजावर संपूर्ण स्वातंत्र्याचा सहस्त्ररश्मी सूर्य, दक्षिण आफ्रिकी गोऱ्यांच्या जुलमी सत्तेचे मळभ दूर करीत प्रकट झाला. २१ मार्चच्या मध्यरात्री ७५ वर्षाच्या पारतंत्र्याचे जोखड फेकून नामिबिया आता मोकळा श्वास घेत स्वतंत्र

बाटचाल सुरू करीत आहे. दक्षिण आफ्रिकाचे विरूद्धच्या सॅम नुजोमा यांच्या अखंड लढयाचे फलित म्हणजे नामिबियाचे स्वातंत्र्य !

उत्तरेस अंगोला, पूर्वेस बोटस्वाना, दक्षिणेस दक्षिण आफ्रिका हे देश आणि पश्चिमेस निळाशार अटलांटिक महासागर पसरलेला ! या महासागराच्या किनारी असलेले " वाल्वीस–बे " हे उत्तम प्रतीचे नैसर्गिक बंदर, नामिबियावर पाय रोवणाऱ्या वखारवाल्या इंग्रजांनी चतुराईने आपल्या ताब्यात घेतले ते कायमचे! त्यानंतर आलेल्या जर्मन लोकांनी 'नैऋत्य आफ्रिका" असे या देशाचे नामकरण केले. १९१४ ते १९१८ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी दक्षिण आफ्रिकेने जर्मनांकडून हा प्रदेश बळकावला आणि तेव्हांपासून आजपर्यंत या देशावर आपली निरंकुश सत्ता चालविली.

दक्षिण आफ्रिकेच्या पोलादी पंजाखालील नामिबिया बळजबरीने हिसकावून घेतलेला हा प्रदेश त्यांनी सोडून द्यावा असा आग्रह त्या देशाकडे वारंवार धरण्यात आला. पण गेली ७५ वर्षे त्याकडे दक्षिण आफ्रिकेने पूर्णपणे दुर्लक्ष केले. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णविद्वेषी सत्ताधिशांनी नामिबियातील कृष्णवर्णीयांचा छळवाद सुरू केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून स्वतंत्र नामिबियाचे पहिले अध्यक्ष सॅम नुजोमा यांच्या नेतृत्वाखालील ' साऊथ वेस्ट आफ्रिका पीपल्स ऑर्गनायझेशनने ' (स्वापो) २३ वर्षे अविश्रांत लढा दिला. १९६० पासून आता पर्यंत ' स्वापो ' ने केलेल्या संघर्षाला जगाच्या विविध भागातून पाठिंबा मिळाला. भारताने देखील या स्वातंत्र्य लढ्यास सक्रिय पाठिंबा दिला होता. अखेर या सर्व प्रयत्नांना यश येऊन, पारतंत्र्याच्या शृंखला तोडून नामिबिया स्वतंत्र झाला.

नामिबियास यापूर्वीच स्वातंत्र्य मिळावे म्हणून विविध देश प्रयत्नरत होते. अलिप्त राष्ट्र चळवळीत प्रथमपासूनच महत्वाची भूमिका बजावणाऱ्या भारताने नामिबियास स्वातंत्र्य मिळावे म्हणून खूप प्रयत्न केले. यासाठी संघटित प्रयत्न व्हावेत, दक्षिण आफ्रिकेविरूद्ध अत्यंत कडक आर्थिक निर्बंध लादण्यात यावेत असा आग्रह भारताकडून धरण्यात आला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या आर्थिक निर्बंध लादण्याविषयीच्या ठरावासंदर्भात अमेरिका–ब्रिटन यासारखी राष्ट्रे नकाराधिकाराचा अवलंब करीत असतानाच भारत मात्र नामाबियाच्या स्वातंत्र्याचा हिरीरीने पुरस्कार करीत होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने २९ सप्टेंबर १९७४ रोजी एक ठराव संमत केला होता. ४३५ क्रमांकाच्या या प्रस्तावात नामिबियामध्ये असलेली दक्षिण आफ्रिकेची बेकायदेशीर राजवट संपुष्टात आणावी, तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून नामिबियन जनतेकडे सत्ता हस्तांतरित करावी, या हस्तांतर प्रक्रियेच्या काळात संयुक्त राष्ट्रसंघाची शांतीसेना तेथे ठेवावी व तेथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली खुल्या वातावरणात निवडणुका घेण्यात याव्यात अशा तरतुदी होत्या. अँगोलाच्या राजवटीविरूद्ध लढणाऱ्या 'युनिटा' बंडखोरांना दक्षिण आफ्रिकेचे पाठबळ होते. या बंडखोरांना तोंड देण्यासाठी अँगोलात क्युबाचे सैन्य आणण्यात आले होते. नामिबियाला स्वातंत्र्य देण्याच्या मार्गात या सर्वांची बाधा निर्माण झाली होती. पण अखेर अँगोला, क्युबा आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील त्रिपक्षीय कराराने स्वातंत्र्यप्रक्रियेस खऱ्या अर्थाने गती मिळाली. २९ सप्टेंबर १९७८ साली झालेल्या प्रस्तावाची १९८९ साली अंमलबजावणी झाली. या सर्व पार्श्वभूमीवर २१ मार्च १९९० ला दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या राजवटीच्या ताब्यातून नामिबियाची सुटका झाली.

गेल्या वर्षी संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली नामिबियात झालेल्या निवडणुकीत ' स्वापो ' संघटनेने घटनासमितीच्या ७२ जागांपैकी ४१ जागा जिंकून बहुमत सिद्ध केले. त्यानंतर ' स्वापो ' या संघटनेचे अनभिषिक्त नेते सॅम नुजोमा यांची नामिबियाचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि २१ मार्च ९० रोजी नामिबियाची राजधानी विन्डहॉकमध्ये अभूतपूर्व सोहळा पार पडला. संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस पेरेझ क्युलर यांनी नव्या राष्ट्राचा ध्वज फडकावून नवे अध्यक्ष म्हणून सॅम नुजोमा याना शपथ दिली. या सोहळ्याला भारताचे पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग, माजी पंतप्रधान राजीव गांधी, दक्षिण अफ्रिकेतील कृष्णवर्णीयांचे नेते नेल्सन मंडेला आणि अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.

नामिबिया खनिजसंपत्तीने समृद्ध असा देश आहे. जगातले सर्वांत मोठे युरेनियमचे साठे तांब्यांच्या तसेच अन्य खनिजपदार्थांच्या खाणी; विविध प्रकारचे मौल्यवान खडे या देशात आहेत. शिवाय पर्यटनाच्या दृष्टीनेही नामिबिया सुंदर आहे. पूर्वी येथील सुपिक प्रदेशात मानवाची वस्ती होती. त्याला स्वतःची अशी संस्कृती होती. या माणसाने इतिहासपूर्व काळात रंगवलेली खडकातील चित्रे काही वर्षापूर्वी उत्खननात सापडली आहेत. आज पुन्हा एकदा नामिबियन नागरिकांच्या हातात भविष्याचा विशाल प्रदेश सुंदर लेणी खोदण्यासाठी मिळाला आहे. या सौंदर्याचा वारसा घेऊन वाळवंटाचे पुन्हा नंदनवन करण्याची ताकद नामिबियन नागरिकांच्या हातात स्वातंत्र्याच्या रुपाने आता आली आहे.

# डॉ. नेल्सन मंडेला

**संजय खाडये**
प्रथम वर्ष/कला

११ फेब्रुवारीची रविवारची संध्याकाळ मंडेलाच्या मुक्ततेची बातमी देवून अंधारात विलिन झाली. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांचे नेते, आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष नेल्सन मंडेला यांच्या सुटकेची बातमी कळताच सारे जग उजळून निघाले. जगातल्या साऱ्या सुबुद्ध जनतेने या घटनेचे अंतःकरणपूर्वक स्वागत केले. तब्बल २७ वर्षापेक्षा जास्त काल आफ्रिकेच्या वर्णद्वेषी गोऱ्या राजवटीच्या तुरुंगवासातून ७१ वर्षीय मंडेला अत्यंत ताठपणे व प्रसन्न चेहऱ्याने हजारोंच्या जमावाला सामोरे आले.

नेल्सन मंडेला यांचा जन्म आफ्रिकेतील ट्रान्केई प्रांतातील उमटाला शहरात १४ जुलै १९१८ रोजी तेंबुशाही घराण्यात झाला. द. आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांवर श्वेतवर्णीयांचा जो अन्याय, जुलुम होत होता त्या विरुद्ध लढण्याचा मार्ग मंडेला यांनी स्वीकारला.

पुढे १९६४ मध्ये श्वेतवर्णीयांची राजवट उलथून टाकण्याचा कट रचल्याच्या आरोपावरून डॉ. मंडेलावर न्यायालयात खटला भरला आणि त्यात त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा झाली. यावेळी त्यांनी न्यायालयासमोर मांडलेले ' माझ्या ऐवजी हे सरकारच आरोपीच्या पिंजऱ्यात हवे होते. मी मुळातच अपराधी नाही, मी गोऱ्यांच्या वर्चस्वाविरुद्ध लढतोय. तसेच काळ्यांच्याही त्या आदर्श लोकशाहीचे स्वप्न पाहतोय, जिथं मानव समान असतील. त्या ध्येयासाठी मी जगतोय, झगडतोय, त्यासाठी देह ठेवायची माझी तयारी आहे.' हे नेल्सन मंडेलाचे विचार संपूर्ण काळया खंडाला उमेद देवून गेले.

२७ वर्षांच्या कठोर कारावासानंतरही मुक्त आकाशासाठी आजही सत्ताधाऱ्यांशी त्यांना व त्यांच्या देशवासीयांना घनघोर संघर्ष करावा लागणार आहे. परंतु या पार्श्वभूमीवर २७ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर मंडेला यांची झालेली सुटका म्हणजे जगातील तमाम लोकशाहीवाद्यांचा विजय म्हणावा लागेल.

विसाव्या शतकातही वर्णभेदावरून अत्याचार करण्याचा राज्यकर्त्यांचा खाक्या औरच आहे. दक्षिण आफ्रिकेत बहुसंख्य लोक कृष्णवर्णीय असले तरी राजवट मात्र श्वेतवर्णीयांची आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात कृष्णवर्णीयांची गळचेपी अनेक वर्षे अव्याहतपणे सुरु आहे. श्वेतवर्णीय राज्यकर्ते आंधळेपणाने उन्मत्त होवून कृष्णवर्णीयांची आशा, आकांक्षा, भाव-भावना दडपून टाकण्याचा प्रयत्नक रीत आले आहेत. या विषमतेविरुद्ध

सर्व जगाने आपली नापसंती व्यक्त केली असली तरी ब्रिटनसारख्या राष्ट्रांनी श्वेतवर्णीय गोऱ्या सरकारची तळी उचलून धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. तथापी संपूर्ण जगात या प्रश्नावर असलेले मतैक्य व गोऱ्या राजवटीविरुद्ध असलेली तिरस्काराची भावना यांची त्यांना दखल घ्यावी लागेलच. दक्षिण अफ्रिकेला वठणीवर आणण्यासाठी आर्थिक नाकेबंदीचा प्रस्ताव भारतासहित कांही प्रमुख राष्ट्रांनी मांडला. परंतु दुर्दैवाने बड्या राष्ट्रांची भूमिका यावर आडमुठेपणाची आहे. याच दरम्यान डॉ. मंडेलांची प्रकृती ढासळू लागली तरी गोऱ्या राजवटीला त्यांची दया आली नाही. मंडेलांनी आपल्याशी तडजोड करावी अशी गोऱ्या सरकारची इच्छा होती. कृष्णवर्णीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यास वचनबद्ध असलेल्या डॉ मंडेलांनी ' मृत्यू आला तरी चालेल पण शरणागती स्वीकारणार नाही ' असे ठामपणे जाहीर केले.

डॉ. नेल्सन यांचे सारे आयुष्य झंझावती आहे. काळ्यांच्या हक्कासाठी आपल्या तुरुंगवासाच्या काळातही त्यांनी वकिली सल्ले देणे सुरू ठेवले होते. या मार्गदर्शनाचीच त्यांच्या देशवासीयांना खरी आवश्यकता होती.

अशा प्रकारे दुर्दम्य आशावादी नेताच जेलच्या अनंत यातना भोगून २७ वर्षांच्या दीर्घ कारावासानंतरही पुन्हा उमेदीने उभा राहतो आणि सांगतो— ' माझ्या देशबांधवांनो ! वर्णद्वेषाविरुद्धचा आमचा लढा संपलेला नाही. सर्व शक्ती एकवटून तो आम्हाला यशस्वी करावयाचा आहे, हे त्यांचे भाषण ऐकण्यासाठी लाखो लोकांनी गर्दी केली होती. त्यावरही गोऱ्या पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्था यांच्या गोंडस नावाखाली गोळीबार केला. ह्या त्यांच्या कुटिल नीतीचे वर्णन कोणत्या शब्दात करावे ?

राजधानी प्रिटोरिया, केपटाऊन इत्यादी शहरातील भागांतून ' येथे कुत्री आणि काळे लोक येण्यास मनाई आहे ' असे फलक अजूनही दिसतात. गोऱ्या मुलांच्या शाळेत काळ्या मुलांना प्रवेश दिला जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. ह्या सर्व गोष्टी निपटून काढण्यासाठी मंडेला व त्यांचे समर्थक जिद्दीने उभे ठाकले आहेत. नेल्सन मंडेला यांची सुटका झालीच आहे पण अजून शेकडो राजबंदी, कारागृहाच्या भिंतीआड आहेत त्यांची सुटका व्हायची आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसवर असलेली बंदी उठवायची आहे. काळ्या जनतेला आपल्या स्वतःच्या देशात मुक्त वातावरणात श्वास घेता आला पाहिजे. लोकशाही संकेतानुसार आणि मानवी हक्काचा मान राखण्यासाठी द. आफ्रिकेत असलेले काळे आणि गोरे समान आहेत ही भावना तयार झाली पाहिजे. यासाठी अहिंसा तत्त्वाला आफ्रिकन कॉंग्रेस बांधलेली असली तरी आत्मसंरक्षणासाठी हातात बंदूक घेवून लढण्यासाठी या पक्षाचे कार्यकर्ते तयार आहेत.

जागतिक लोकमताच्या दडपणाचा प्रभाव आणि दक्षिण आफ्रिकेत निर्माण झालेली अभूतपूर्व जागृती यामुळे त्या सरकारला नेल्सन मंडेलांना बंधमुक्त करणे भाग पडले. त्यांची सुटका म्हणजे जागतिक जन आंदोलनाचा गौरवशाली विजय आहे. मंडेलांच्या त्यागाचा व देशभक्तीचा तो विजय आहे. असे असले तरी मंडेलांची मुक्तता म्हणजे उद्दिष्टपूर्ती नव्हे. अद्यापही स्वातंत्र्याचे आव्हान कायम आहे. ज्यावेळी आफ्रिकन सत्ता कृष्णवर्णीय जनतेकडे येईल तेव्हाच खऱ्या अर्थाने उद्दिष्ट साध्य होईल. त्यासाठी त्यांना चळवळ अविरतपणे चालून ठेवावी लागेल. अर्थात मंडेलांची कारागृहातून झालेली सुटका म्हणजे काळ्यांच्या स्वातंत्र्याची नांदीच आहे.

एका उर्दू शायराने म्हटल्याप्रमाणे " हिदोंकी कुर्बानी
हम भुला सकते नही
सर कटा सकते है लेकिन
सर झुका सकते नहीं !
अशा अपूर्व गौरवास नेल्सन मंडेला पात्र आहेत.

# फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली देणगी

दया खाडिलकर
प्रथम वर्ष/वाणिज्य

१४ जुलै १९८९ रोजी फ्रेंच राज्यक्रांतीला दोनशे वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्त फ्रान्समध्ये भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. फ्रान्सचे अध्यक्ष मितेराँ यांनी द्विशताब्दीवर्षाचे स्मारक म्हणून एक भव्य इमारत बांधण्याचा संकल्प सोडला होता. क्रांतीच्या द्विशताब्दिवर्षाच्या निमित्ताने बांधलेली ही इमारत वास्तुशिल्पाचा एक अप्रतिम नमुना असून जगातील सर्व राष्ट्रप्रमुखांची परिषद या इमारतीत घेण्याचे फ्रान्सने ठरविले होते. तो संकल्पही पूर्ण झाला.

'पॅरिस' हे अगोदरच सुंदर शहर, त्यात ते क्रांतीच्या उत्सवासाठी सजलेले. त्यामुळे त्याचे सौंदर्य विविधांगांनी द्विगुणित झाले होते. दरवर्षी १३ जुलै रोजी केवळ पॅरिसमध्येच नव्हे तर संपूर्ण फ्रांसभर क्रांतीदिनाचा जल्लोष होत असतो. यावर्षी तर त्यास उधाण आले होते. हजारो लोक नाचगाण्यांत मश्गुल होते. या उत्सवानिमित्त पॅरिसमधील सर्व हॉटेल्स खच्चून भरली होती. विविध देशांची कलापथके येऊन दाखल झाली होती. चिनी विद्यार्थ्यांनी तर नुकतेच बेंजींगमध्ये जे 'लोकशाही प्रस्थापनेचे आंदोलन' झाले त्यावर आधारित पथनाट्य सादर केले. तसेच फ्रेंच लष्करी संचलन व इतर कार्यक्रम दूरचित्रवाणीवरून प्रसारित केले जात होते. एकंदरीत फ्रांसची जनता द्विशताद्विचा आनंद भरभरून लुटत होती.

अशा या आनंद महोत्सवाचा आस्वाद घेण्यासाठी फ्रेंच जनतेला जो लढा द्यावा लागला त्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर या सोहळ्याचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे ही गोष्ट चटकन् ध्यानात येईल.

दोनशे वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रात बेबंदशाही माजली होती. सर्वसामान्य जनता अन्यायाखाली भरडली जात होती. शेतकरी, शेतमजूर, कारागीर व मध्यमवर्ग इ० दुर्बल समाजघटकांवरच सर्व करांचे ओझे पडत होते. उलटपक्षी अमीर, उमराव, जमीनदार, धर्मगुरू हे वरिष्ठ वर्ग कोणताही कर भरत नसत. त्यांना अनेक प्रकारचे विशेषाधिकार होते. अशा सामाजिक अन्यायाविरुद्ध लोकांच्या मनात असंतोष खदखदत होता. या असंतोषाचे रूपांतर हळूहळू क्रांतीच्या विचारात होऊ लागले होते.

दुसऱ्या बाजूला फ्रेंच मध्यमवर्ग जागृत होऊ लागला होता. या जागृतीमध्ये लेखक व विचारवंताचे कार्य मोठे होते. विचारवंतामध्ये मॉंटेस्क्यू, व्हॉल्टेअर व रुसो हे प्रमुख होते. पण या सर्वांमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीला उपयुक्त व निश्चित मार्गदर्शन करण्याचे श्रेय रूसोलाच दिले जाते. स्वतःला क्रांतीचे अपत्य मानणारा नेपोलियन रूसोबद्दल म्हणतो, 'रुसो झाला नसता तर फ्रेंचराज्यक्रांतीच झाली नसती.' पुढील काळात प्रसिद्धिस आलेली लोकशाहीची स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्वे त्यांनीच उच्चारली व लोकमनात पेरली. 'राज्य म्हणजे राजा व सर्व सामान्य जनता यांमधील एक करार आहे,' या रुसोच्या धाडसी विधानाने जनमानसात रुजू लागलेला क्रांतीचा विचार अधिकच प्रबळ झाला.

त्यावेळी फ्रान्सवर बुर्बोन राजघराण्यातील राजांची अनियंत्रित सत्ता होती. हे राजे स्वतःला ईश्वराचे प्रतिनिधी मानत. शेवटचा बुर्बोन राजा सोळावा लुई हा कर्तव्यशून्य, हेकेखोर, दूरदृष्टी नसलेला असा होता.

राज्यकारभारापेक्षा त्याला शिकार व कुलुपनिर्मितीत अधिक रस होता. फ्रान्सची सम्राज्ञी मेरी आन्त्वानेत ही जन्माने ऑस्ट्रियन होती. ती लोकांमध्ये अप्रिय होती. ती आपल्या चैन-विलासावर बराच पैसा उधळीत असे.

अशा या लुईचा दरबार म्हणजे चैन, विलास व उधळपट्टीचा नमुना होता. या दरबाराचा वार्षिक खर्च सुमारे वीस दशलक्ष डॉलर्स होता. आणि हा सर्वसामान्यांकडून जबरदस्तीने वसूल केला जात होता. असा हा दरबार म्हणजे देशाचे कबरस्तानच ठरले.

कर्तृत्वहिन राजाच्या नेतृत्वाखाली कारभार यंत्रणासुद्धा अकार्यक्षम आणि भ्रष्ट बनली होती. देशाच्या निरनिराळ्या भागात निरनिराळे कायदे नियम व वजन-मापांच्या पद्धती अस्तित्वात होत्या. करवसुली सरकारमध्ये भरणा केलेल्या रक्कमेपेक्षा कितीतरी पटीने अधिक असे. कारण जमिनदार प्रथम कराची रक्कम सरकारी तिजोरीत भरत आणि त्यानंतर त्यापेक्षा जास्त रक्कम लोकांकडून वसूल करत. न्यायदान पद्धतदेखील सदोष होती. थोडक्यात राज्यकारभाराला निश्चित दिशा मिळावी यासाठी आवश्यक असणारी एकवाक्यता, सारखेपणा व समानता या गोष्टींचा फ्रान्समध्ये पूर्णपणे अभाव होता.

अशा परिस्थितीत लोकांच्या मनातील असंतोष वाढत गेला आणि प्रक्षुब्ध क्रांतीबीजाने प्रेरित झालेल्या समाजाचा प्रचंड मूक मोर्चा राजवाड्यावर चालून गेला. तेव्हा व्हर्सायच्या राजवाड्यावर मेजवान्या झडत होत्या. 'भूक, भूक, भाकरी द्या' अशा घोषणा देणाऱ्या मोर्चाला "भाकरी मिळत नसेल तर केक खा!" असे उद्दाम उत्तर राणी मेरीने दिले. संतप्त जमावाने राजा-राणीला कैद केले. तेव्हा सैन्याने देखील जनतेवर गोळीबार करण्याचे नाकारले. जनतेने शस्त्रागार लुटून हजारो पलटणी उभारल्या. क्रांतीकारकांनी अनियंत्रित राजसत्तेचे व जुन्या जमान्याचे प्रतीक असलेल्या बॅस्टील किल्ल्याचा पाडाव केला. कैद्यांच्या मुक्ततेपेक्षा राजसत्तेला उघड विरोध हे या लढ्याचे वैशिष्ट होते. हा दिवस १४ जुलै १७८९ हा होता. तो फ्रांसचा विजयदिन म्हणून मोठ्या समारंभपूर्वक देशभर पाळण्यात येतो. क्रांती यशस्वी झाल्यानंतर विधिमंडळाने हजारो लोकांसमक्ष देशद्रोह्यांसाठी उभारलेल्या गिलोटीन यंत्राखाली राजाराणीचा शिरच्छेद केला. या क्रांतीनंतर फ्रांस हे 'प्रजासत्ताक' राष्ट्र झाल्याचे घोषित करण्यात आले.

अशा या फ्रेंच राज्यक्रांतीने एका नव्या, प्रगतिशील, आधुनिक फ्रांसला जन्म दिला.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही, राष्ट्रवाद इ० प्रगत विचारांचे तत्त्वज्ञान फ्रेंच क्रांतीकारकांपाशी होते. त्यामुळे या राज्यक्रांतीने जुन्या राजसत्तेबरोबरच जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील जुनी प्रस्थापित व्यवस्था, जुनी मूल्ये यांचा पूर्णपणे अव्हेर केला. नव्या प्रागतिक विचारांच्या आधारावर नवी प्रगत न्यायव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सामाजिक समता, व्यक्तींची प्रतिष्ठा या श्रेष्ठ मानवी मूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली.

फ्रेंच राज्यक्रांतीने सामान्य माणसाला इतिहासाच्या रंगभूमीवर नायक म्हणून उभे केले. यापूर्वी सामान्य माणूस, बहुजनसमाज हे पूर्णपणे दुर्लक्षित, उपेक्षित व दडपले गेलेले होते आणि वरिष्ठ वर्गीयांचे राष्ट्रीय जीवनात प्राबल्य होते. क्रांतीने ही परिस्थिती बदलून टाकली व त्यातून जनता युगाचा उदय मानवी इतिहासात झाला.

फ्रांसमध्ये नवे कायदे, नवी राज्यव्यवस्था, नवी कालगणना, मेट्रीक पद्धतीची वजनमापे, लिखित घटना, सार्वत्रिक शिक्षण, सर्वांना समान हक्क, जमिनीचे फेरवाटप, फ्रेंच भाषेचा पुरस्कार, व्यापारावरील निर्बंध रद्द करणे, कायद्याचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण अशा अनेकविध सुधारणा अंमलात आल्या.

फ्रेंच राज्यक्रांतीचे तत्त्वज्ञान लवकरच युरोपभर पसरले. या तत्त्वज्ञानाच्या आधारावर देशोदेशी राष्ट्रीय पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परिणामी, फ्रेंच लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाने अनियंत्रित राजसत्तेला वाढता शह बसू लागला. जगात अनेक ठिकाणी क्रांत्या होऊन लोकांनी उदारमतवादी राज्य घटनांची मागणी केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान

सर्वत्र लोकप्रिय होऊन जर्मनी, इटाली, बाल्कन राष्ट्रे, मध्ययूरोपातील राष्ट्रे यांत राष्ट्रवादी चळवळी उदयास आल्या. राष्ट्रीय एकीकरणाचे प्रयत्न करण्यात आले. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळी उदयास आल्या.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, प्रागतिक राष्ट्रवाद, लोकशाही, प्रजासत्ताकवाद हा या क्रांतीचा मंत्र होता. या मंत्राच्या संदेशाने जगभरच्या पददलित जनतेला अन्यायाविरूद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली. 'मानवी हक्कांची सनद' घोषित करून फ्रेंच राज्यक्रांतीने मानवतावादी कार्याला स्फूर्ती दिली. गुलामगिरीची पद्धत बंद करणे, तुरुंग सुधारणा यांसारख्या विचारांना व कार्याला स्फूर्ती मिळाली. जगभरच्या मानवमुक्तीच्या व स्वातंत्र्याच्या चळवळींना फ्रेंच राज्यक्रांतीने चालना दिली. १९ व्या व २० व्या शतकातील युरोप, आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळींना या क्रांतीनेच गती आणि दिशा दिली आहे.

अशा या फ्रेंच राज्यक्रांतीस केवळ राज्यक्रांती म्हणता येणार नाही, तर तिला एक 'जागतिक वैचारिक क्रांती' म्हणावे लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यासारख्या प्रगत राजकीय विचारांच्या आधारावर फ्रेंच राष्ट्रीय जीवनाची पुनर्रचना करण्याचा गंभीर प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे या क्रांतीने सामाजिक व सांस्कृतिक आशयही होता. या क्रांतीला मध्ययुगीन समाजाला लोकशाही राज्यव्यवस्थेच्या दिशेने आणून सोडले.

म्हणूनच संपूर्ण जगाला लोकशाही तत्वाची महान देणगी देणाऱ्या फ्रांसच्या राज्यक्रांतीला १८ व्या शतकातील एक महत्वपूर्ण आणि समाजप्रवर्तक घटना मानण्यात येते.

तथापि, ज्या विचाराने आज अर्धे जग भारलेले आहे, अशा साम्यवादी तत्वज्ञानाचा जनक व महान मानवतावादी तत्वज्ञ कार्ल मार्क्स फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल असे म्हणतो की, 'फ्रेंच राज्यक्रांती ही एक 'PSEUDO REVOLUTION' (फसवी/खोटी क्रांती) होती. कारण जर तिथे खरोखर क्रांती झाली असती, तर तिथल्या सामान्य जनतेकडे सत्ता गेली असती. परंतु तसे न होता पुन्हा वरिष्ठ वर्गाकडेच सत्ता गेली. यात्रा अर्थ सामान्य जनतेचा सहभाग मिळवण्यात सरंजामदार यशस्वी झाले. म्हणजे फ्रेंच क्रांती ही स्वतःचे संबंध दुणावलेल्या वरिष्ठ वर्गियांची व वर्गियांची इतर वरिष्ठ वर्गियांवरील प्रतिक्रिया होती. अन्यथा, फ्रांस अवघ्या १० वर्षात नेपोलियन बोनापार्ट सारख्या सत्ताधिशाच्या व सम्राटाच्या ताब्यात गेला नसता. म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती हा मध्यमवर्गियांनी घडवलेला सत्ताबदल आहे. ती क्रांती नव्हे.

कार्ल मार्क्सचे विधान लक्षात घेऊनही फ्रेंच राज्य क्रांतीमुळे देशादेशांत सत्ताबद्दल झाले, वैचारिक परिवर्तने झाली; सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांची नवी घडी बसवली. जगातील साहित्यात प्रथमच वेगळा विचार आला. हीच फ्रेंच राज्यक्रांतीची मोठी कमाई आहे. तेव्हा या क्रांतीच्या उद्गात्याला--रूसोला व त्याच्या निर्भीड विचार प्रणालीला त्रिवार अभिनंदन !

# ग्रीन हाऊस इफेक्ट : काचघर

**संदीप फडके**
द्वितीय वर्ष/कला

आज आपण २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर आहोत. २० वे शतक हे क्रांतीकारक युग म्हणून इतिहासामध्ये गणले गेले आहे. नवीन-नवीन तंत्रे, शास्त्रे, संशोधने या साऱ्यामुळे औद्योगिकरण वाढले. दळण-वळणाची साधने निर्माण झाली. आधुनिक स्वरुपामध्ये शहरांची निर्मिती होऊ लागली.

आधुनिकीकरणाचे फायदे आपण लक्षात घेतले. फायद्यासाठीच मानवाचा स्वार्थी दृष्टिकोन निर्माण झाला. एखाद्या गोष्टीच्या निर्मितीमध्ये त्यापासून होणारे फायदेच फक्त लक्षात घेतले जातात पण त्यापासून धोके निर्माण होऊ शकतील की काय, याचा विचार केला जात नाही. कालांतराने संभाव्य धोक्यांच्या जाणीवेमुळे मानवी अस्तित्व हे कुठेतरी विचलित होते. त्याचवेळी आपण त्या गोष्टीवर विचार करू लागतो.

आज पर्यावरणाचा अभ्यास केल्यावर हेच दिसून आले आहे. प्रदूषणासारख्या आपत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आहेत. इंधनासाठी मानवाने जंगल संपत्तीचा नाश केला आहे, त्यामुळे पर्यावरणाचा समतोल पूर्णपणे ढळत चालला आहे. दिवसेंदिवस हवेमधील उष्णतेचे प्रमाण वाढत चालले आहे. याच संदर्भात आणखी एक नवी निर्माण झालेली संज्ञा म्हणजेच ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' होय.

## ग्रीन हाऊस म्हणजे काय ?

' ग्रीन हाऊस ' म्हणजे ' उष्ण हवेमध्ये झाडे लावण्याचे आणि त्यांना वाढविण्यासाठी निर्माण केलेले काचेचे घर होय '

झाडांच्या वाढीसाठी त्यांना आवश्यक असे योग्य तपमान राहाण्याची आवश्यकता असते. ' ग्रीन हाऊसमध्ये ' काचेची तावदाने असल्यामुळे, आवश्यक तपमान आतमध्ये टिकून राहाते. या काचरूपी घरामध्ये कृत्रिमरित्या गरमपणा आणलेला असतो. ही आतील उष्णता काचेच्या तावदानांमुळे व छप्परामुळे बाहेर जाऊ शकत नाही. बाहेरून येणारा सूर्यप्रकाश व उष्णता ही काचेच्या पारदर्शकत्वामुळे झाडांना मिळते व आतील उबदारपणा कायम राखला जातो.

## पृथ्वी - एक मोठे ग्रीन हाऊस

आपली पृथ्वी ही एक मोठे ' ग्रीन हाऊसच ' आहे. त्यातील हवेमध्ये उष्णता ठराविक प्रमाणात टिकवून धरण्याची नैसर्गिक शक्ती म्हणजेच ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' होय. ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' हे नाव देणे कितपत योग्य आहे ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण काचघरामध्ये थंड व गरम हवेचे प्रवाह व वारा यांचे परिणाम अजिबात नाहीत, ते पृथ्वीवर मात्र आहेत. या विषयावर जगातील अनेक शास्त्रज्ञांनी खल केले आणि सर्वानुमते शेवटी ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' हेच नाव शास्त्रीय जगतामध्ये स्वीकारले गेले.

## ग्रीन हाऊस - परिणाम

सूर्याकडून पृथ्वीकडे येणारी ऊर्जा ही प्रकाश किरणांच्या रूपाने येते. मुख्यत्वे करुन ही उर्जा दृष्य व अल्ट्राव्हायोलेट या किरणांच्या स्वरुपामध्ये वातावरणाच्या थरातून खाली येऊन ती भूपृष्ठ आणि

जलाशयांच्या पृष्ठभागांना मिळते. पृथ्वीवरून यामधील ऊर्जा परत अंतरिक्षामध्ये फेकली जाते. परंतु त्याचे प्रमाण फारच कमी असते. ती कमी शक्तीशाली असते. ती प्रारणांमध्ये रूपांतरित होऊन परत वरती जात असताना ठराविक तरंग लांबीचे 'इन्फारेड किरण' हे कार्बन-डाय-ऑक्साईड व पाण्याची वाफ याव्दारे शोषून घेतले जातात. अर्थात हवेमध्ये उष्णता ही उर्जारुपाने टिकून रहाते.

नैसर्गिकरित्या या घटकांचे प्रमाण हवेत टिकून ते मर्यादित राखले जात असल्याने धरून ठेवली जाणारी उष्णता ही ठराविक प्रमाणात असते. उष्णतेचे नियमन हे तपमानाच्या स्वरूपामध्ये दर्शविले जाते. ही प्रक्रिया दीर्घकालीन स्वरूपामध्ये विकसित झालेली असून तिचे परिणाम संथ गथीने होणार आहेत. परंतु त्यामध्ये अत्यल्प काळातही मोठे बदल होऊ शकतात. त्यामुळे मोठे परिणाम संभवतात. पृथ्वीवरून फेकल्या जाणाऱ्या किंवा पृथ्वीवरून पोहोचणाऱ्या ऊर्जेच्या प्रमाणात, २° ते ३° से. ग्री. ने वातावरणीय तपमान बदलते. ऊर्जेच्या प्रमाणात १% ने फरक झाल्यास मात्र त्याचे भयंकर परिणाम होतील.

संशोधनांतर्गत, सध्या पृथ्वीवरून बाहेर पडणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण घटत चालल्याची भीती व्यक्त केली जात आहे. कारण उष्णता ऊर्जा रूपात धरून ठेवणारे हवेतील घटक गेल्या काही वर्षात मानवनिर्मित घडामोडीमुळे वातावरणामध्ये वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात व झपाट्याने वाढत आहेत. अर्थात त्यांचे दीर्घकालीन घडणारे परिणाम अत्यल्प काळातच घडतील असा संभव आहे.

## ग्रीन हाऊस इफेक्ट : संभवनीय धोके

पुढील शतकाच्या मध्यापर्यंत वातावरणाचे सरासरी तपमान हे केवळ १.५° ते ४.५° ने वाढेल. मात्र हे वाढलेले तापमान कमी होण्यासाठी हजारो वर्षे जावी लागतील गेल्या हजारो वर्षांमध्ये कधीच नसेल इतका गरमपणा हवेत निर्माण झाल्याने वाऱ्याचे वाहणे आणि ढगांची निर्मिती होणे यावर प्रतिकूल परिणाम होईल. त्यामुळे सर्व विश्वच बदलून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पर्जन्यमानाप्रमाणे केलेली भौगोलिक विभागांची रचना ही पूर्णपणे बदलेल. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्थित्यंतर होईल. त्यामुळे पाऊस-पाणी मुबलक असलेल्या प्रदेशामध्ये पावसाअभावी ओसाड, भयान प्रदेश तयार होतील तर वैराण वाळवंटी भाग अतिवृष्टीमुळे हैराण होतील.

आजही अमेरिकेमध्ये याचा परिणाम दिसून येत आहे. अमेरिका हा देश जागतिक अन्नधान्याच्या व्यापारामध्ये अग्रेसर देश आहे. हा देश प्रतिवर्षी सुमारे ४०% अन्नधान्य निर्यात करतो. मात्र आज ही सरासरी २०% वर आली आहे. एवढेच नव्हे तर खुद्द स्वतःपुरतेच अन्नधान्य निर्मिती करु शकेल की नाही अशी भीती ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' मुळे निर्माण झाली आहे. अमेरिकेसमोर ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे.

' ग्रीन हाऊस इफेक्ट ' चा परिणाम सर्वात जास्त प्रमाणात ध्रुवीयप्रदेशावर होणार असा संभव आहे. तेथील वातावरण तपमान १०° से. ने वाढेल आणि त्यामुळे बर्फाळ भाग विशेषतः पश्चिम अंटार्क्टिकाकडील बर्फाळ भाग वितळून हिमनग वहात येऊन समुद्राला मिळतील आणि त्यामुळे २० हजार वर्षांपूर्वी घडल्या त्याच घटना घडतील. सर्वसाधारणपणे सर्वच सागरांच्या पाण्याची पातळी ही ५ ते ७ मीटर्सनी वाढेल व त्यामुळे समुद्र आपल्या मर्यादा सोडतील आणि निर्माण होणाऱ्या प्रचंड लाटांखाली अनेक सखल, सुपीक किनारी प्रदेश आणि मोठ-मोठी शहरे गडप होतील. त्याचप्रमाणे संपूर्ण सागरी जीवसृष्टी नष्ट होईल, असा धोका निर्माण झाला आहे

## संभाव्य धोका टाळण्याचे उपाय:—

अमेरिकेतील ' National Centre for Automospheric Chemistry Research ' या संस्थेतील या विषयाचे जाणकार आणि तज्ज्ञ व्यक्ती श्री. व्ही. रामनाथन हे भारतीय संशोधक आपल्या अनेक शोध निबंधाच्या सहाय्याने ' ग्रीन हाऊसचा ' धोका लोकांना दाखवून देत आहेत. त्याचे परिणाम आणि गांभीर्य लक्षात घेऊन जगातील सर्व लोक या विषयामुळे जागृत होतील असा त्यांचा विश्वास आहे.

अजूनही ' ग्रीन हाऊस इफेक्ट ' हा नैसर्गिक प्रक्रियांच्यामुळे काबूत ठेवला गेला आहे. आजपर्यंत हवा गरम होऊन त्याचे परिणाम घडायचे पण सुदैवाने तपमानाच्या नोंदीवरून तसे आढळले नाही. आजपर्यंत हवामानातील उष्णता ग्रहण करून तापमानाचे प्रमाण कायम राखण्याचे कार्य समुद्र करीत आहे, परंतु भावी काळात या कार्यात तो यशस्वी होईल की नाही हे सांगता येणार नाही. त्याआधीच दिवसेंदिवस ढळत चाललेला निसर्गाचा समतोल हा सावरला पाहिजे. काही वायुंचा वापर मर्यादित केला पाहिजे. अनेक कारखान्यांच्या प्रक्रियेमधील निर्माण होणाऱ्या विषारी वायूंचे प्रमाण कमी कसे होईल यावर संशोधन केले पाहिजे. तसेच अपायकारक वायूपासून उपायकारक वायू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले पाहिजेत. आज पैशाच्या हव्यासापोटी केली जाणारी जंगल संपत्तीची हानी थांबवली पाहिजे. तसेच जंगल संपत्ती टिकविण्यासाठी वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन तन्मयतेने व जोमाने केले पाहिजे. अशाप्रकारे हवेतील प्रदूषण टाळून 'ग्रीन हाऊस इफेक्ट' सारखी संभवनीय आपत्ती टाळता येणे शक्य आहे.

● ● ●

# साहित्याचे प्रधान हेतू

**संजू वायंगणकर**
तृतीय वर्ष/वाणिज्य

' साहित्य ' म्हणजे ' सहितस्य भाव: ' आपल्या दैनंदिन व्यवहारात ' साहित्य ' या शब्दाचा अनेक अर्थांनी वापर केला जातो. साहित्य म्हणजे ' साधन ' असा त्याचा सर्वसाधारण अर्थ घेतला जातो. यावरून ' प्रयोगाचे साहित्य, ' ' चित्रकलेचे साहित्य, ' ' लेखन साहित्य ' असे वेगवेगळे शब्द प्रयोग केले जातात. संस्कृत साहित्यशास्त्रात ' काव्य ' म्हणजेच साहित्य असे मानले जाते. काहींच्या मते वाङ्‌मय समीक्षेची मूल्ये म्हणजे साहित्य होय. साहित्याकडे कला दृष्टिकोन असल्यामुळे व त्यातून कलेचा आविष्कार होत असल्याने ' साहित्य ही एक कला आहे ' असेही मानले जाते.

मराठी वाङ्मयात ' साहित्याचा ' अर्थ वेगळ्याप्रकारे सांगितला जातो. काव्य, कथा, कादंबरी, निबंध-लघुनिबंध, नाटक, एकांकिका इत्यादी ललित वाङ्मय प्रकार म्हणजे ' साहित्य ' असे मराठी वाङ्मयात मानतात. " मनुष्यमात्राची बुद्धी व भावना यांना ज्या–ज्या गोष्टींनी विकसित होण्याला सहाय्य होईल त्या सर्वांना ' साहित्य ' म्हटले जाते. " यात सर्वसाधारणपणे संगीत कला, नाट्य, नृत्यकला, चित्रकला व शिल्पकला या सर्व कलांचाही अंतर्भाव होतो.

' साहित्य ' या शब्दासाठी ' सारस्वत ' हाही शब्द ' ज्ञानेश्वरीत ' आढळतो. तो असा–

" हे सारस्वताचे जोंड । तुम्हींची लाविले जे झाड ।
तरी अवधानामृते वाड । सिंपौनि कीजे ।। "

यावरून ' सारस्वत ' म्हणजे रसभावरुपाने डवरून येणारे झाड असा अर्थ सिद्ध होतो. निरूपणाची शोभा वाढविणारा गुणधर्म या ' सारस्वतात ' आहे. काव्याचे गुणधर्म प्रकट करण्याचे सामर्थ्यवान माध्यम म्हणजे ' सारस्वत ' होय. भारतीय साहित्यशास्त्रात सारस्वत म्हणजे अभिजात असे ललित गद्य-पद्य लेखन ! आपले विचार व्यक्त करताना मध्येच एक अशी सुंदर भूमी लागते की, तेथे एकाकी शब्दांचे सुवर्ण बनते. तेव्हा अर्थपूर्ण वाणीने केलेले लेखन म्हणजे वाङ्मय ! ' अभिरूची व स्मरणशक्ती यांच्या जोड

चाळणीतून पडणारा गाळीव लेख मिळून जो संग्रह बनतो त्याचेच नाव ' ' वाङ्मय ' होय.

ललित वाङमयापासून जगाला निरागस आनंदप्राप्ती होते. कलेचा हेतू मानवी अंतःकरणातून सौंदर्यदर्शनाने आनंद निर्माण करणे हा होय. रसिक कलावंत व रसिक वाचक ह्यांच्याच दृष्टीने हा विचार झालेला आहे. या विभिन्न वाटणाऱ्या संज्ञा एकाच केंद्रात लय पावतात. ते केंद्र म्हणजे ' आनंद ' होय. साहित्याकडे रसिक दृष्टीने पाहिले तर अशा प्रकारचा आनंद मिळतो. मात्र त्यासाठी रसिकांचा दृष्टिकोन हवा. ' आनंद ' देणे हा साहित्याचा सर्वमान्य असा घटक ठरतो आणि हाच साहित्याचा प्रधान घटक मानला जातो. माणसाचे दुःख कमी करणे, दुःखे व पापे काही काळासाठी विसरायला लावणे हेच कार्य ' साहित्य ' करत असते. सौंदर्यानुभूती आणि आनंद यांचा संबंध निश्चित केल्याशिवाय साहित्यातील कलागुणांवर प्रकाश पडणार नाही. सौंदर्य म्हणजे अध्यात्मिकतेचा भावात्मक प्रकाश होय. मानवाच्या उपजत प्रवृत्तीतूनच कलेचा उदय झाला. सौंदर्याच्या दर्शनाने आनंद होणे हेच कलेचे महत्त्व होय.

मानवी जीवन दुःख, दारिद्र्य, वियोग, भ्रष्टाचार यांनी भरलेले आहे, याची जाणीव झाल्यामुळे व प्रचिती आल्यामुळे मानव खिन्न होतो. म्हणून अशा उबगलेल्या मनाला विरंगुळा मिळावा म्हणून तो वाङ्मयाकडे वळतो. वाङ्मय वाचनाने होणारे समाधान हे अभावरूप असते तर ' आल्हाद ' भावरूप असतो, म्हणून तो जास्त प्रभावी ठरतो. साहित्य हे आत्माविष्कारासाठी आहे. ज्या लेखनात लेखकाचा आत्माविष्कार घडून आलेला आहे ते साहित्य होईल. म्हणजेच साहित्यात आत्मनिष्ठायुक्त आत्माविष्कार असेल तर ते साहित्य उच्चप्रतीचा आनंद देऊ शकेल.

पाश्चात्यांनी साहित्याचे ' उद्बोधन ' हे एक प्रयोजन सांगितले आहे. उपदेश करण्यासाठी साहित्याचा साधन म्हणून उपयोग केल्यास ते कृत्रिम ठरेल. त्याला मर्यादा पडतील. प्रचार म्हणून साहित्याचा उपयोग केला तर त्याची कलात्मक पातळी ढासळेल. परंतु साहित्याने आनंद द्यावा, मनोरंजन करावे, लोकांची मने रिझवावीत अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. याहीपेक्षा साहित्याने प्रेयसाकडून श्रेयसाकडे वाटचाल केली पाहिजे. ओठांचा उपयोग फक्त चुंबन घेण्यासाठी नसून काही चांगले विचार प्रकट करण्यासाठी आहे याची जाणीव साहित्याने करुन दिली पाहिजे. पण असे करताना कलेची बूज राखली पाहिजे. असे घडले तर दुधात साखर पडेल ; पण उद्बोधनाच्या आहारी जर साहित्यिक गेला तर त्या दुधात मिठाचा खडा पडलाच असे समजावे. आनंदापेक्षा उद्बोधनाला जास्त महत्व आहे असे माडखोलकरांनी प्रतिपादन केले आहे. ते म्हणतात, " मन आणि बुद्धी यांच्या उद्बोधनातून जो आनंद मिळतो, त्यांची सर जगातील अन्य कोणत्याही सुखाला येणार नाही. "

पाश्चात्यांनी सांगितलेले आणखी एक प्रयोजन म्हणजे ' जीवन–भाष्य ' होय. जीवन भाष्यासाठी दिव्य प्रतिभासंपन्न जीवनानुभव, जीवनावर प्रगाढ प्रेम, सौंदर्यात्मक वृत्ती आवश्यक आहे. रामायण व महाभारत या महाकाव्यांमध्ये आनंद आणि बोध यांचा असाच कलात्मक संगम साधलेला आहे. रामाचे दर्शन, त्याची कुलनिष्ठा ही जीवनभाष्यच करते, तर कृष्णाची समाजनिष्ठा जीवनभाष्याचेच उदाहरण आहे.

मर्ढेकरांनी साहित्य व इतर कलांचा विचार करुन ' साहित्य कला ही कनिष्ठ कला आहे ' असे म्हटले. संगीतातील संवेदना ही शुद्ध स्वरूपाची आहे. नितळ संवेदनांचा आनंद संगीत आणि इतर कलांपासून मिळतो. संगीतात ही तीव्रता अधिक आहे. मर्ढेकरांनी सांगितलेले साहित्याचे प्रयोजन पुढीलप्रमाणे आहे– " सौंदर्यदर्शन करून जीवन संपन्न करणे हे बरोबर आहे; पण जीवन संपन्न करण्यासाठी सौंदर्यदर्शन हे चूक आहे. "

' साहित्य ' ही एक एका जिवंत मनाने निर्माण केलेली ' चैतन्यमय सृष्टी ' आहे. चैतन्याच्या तेजाने ती झळाळत आहे. ' साहित्य व समीक्षा ' या ग्रंथात प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, " संबंध निश्चित असतो, परंतु हा संबंध कोणत्या प्रकारचा असतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. " आईच्या गर्भातील मूल जीवनरस आईमधूनच शोषून घेते, पण असे करताना ते स्वतःचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्व साकार करीत असते. पाण्यातून वर येणारे कमळ त्या पाण्यावरच आपल्या जीवनासाठी अवलंबून असताही स्वतःचे स्वतंत्र, स्वयंपूर्ण जग निर्माण करते. त्याचप्रमाणे प्रत्येक

ललितकृती ही जीवनानुभूतीतूनच वर आलेली असूनही स्वतःचे स्वतंत्र असे जग निर्माण करीत असते.

साहित्याच्या प्रयोजनाचा हा इतिहास पाहताना शेवटी ' सौंदर्यदर्शन ' हाच साहित्याचा प्रमुख असा हेतू दिसतो. साहित्य–कलेच्या द्वारा सौंदर्याचा साक्षात्कार घडत असतो. हे सौंदर्य साहित्यात जसे असते, तसेच नृत्यनाटयादि इतर ललित कलांमध्येही असते. रसिक दृष्टिला वस्तू–वस्तूंतील सौंदर्य दिसते. त्यामुळे साहित्यातील कलात्मक सौंदर्य रसिकांना जाणवणे स्वाभाविकच आहे. इतरांना ते दिसेलच असे नाही. तेव्हा एखादी वस्तू एखाद्याला असुंदर वाटली तर ती दुसऱ्याला सुंदर वाटण्याची शक्यता आहे. पण ललित कलेतील सौंदर्य सांगता येणे ही बाब वेगळी आहे. सौंदर्याचे दोन प्रकार पडतात. नैसर्गिक सौंदर्य व दुसरा मानवनिर्मित सौंदर्य. साहित्य हे मानवनिर्मिती करीत असते. ज्या सौंदर्याचा आधार वास्तव नाही, ते वाङ्मय विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत माणसाला मोहवित नाही तर सर्वांना सर्वकाळ आनंद देण्याचे श्रेष्ठत्व त्याजजवळ असते. एखाद्या रसिकाने त्याला दिसणाऱ्या वस्तूचे गुण त्यच्याजवळ असणाऱ्या शब्दसामर्थ्याने दुसऱ्याला मिळवून दिले तर ते एक प्रकारचे साहित्यच होईल.

भावनांना साहित्यात जे आवाहन केलेले असते, ते विश्वात्मक स्वरूपाचे असते. असे साहित्य ज्ञानी व अज्ञानी माणसालाही प्रतीत होते. उदा. रामायण, महाभारतातील कथा ह्या ज्ञानी व अज्ञानी माणसाला सुद्धा भावतात. रामाचा वनवास, सीतेचा विरह, भरताचा भ्रातृभाव, सीतेचे अग्निदिव्य सर्वांना भावते. साहित्यात बौद्धिक अंगापेक्षा भावनिक अंगाला महत्त्व आहे. साहित्य हे नवनिर्माणक्षम असते. दररोज साहित्य नवीन काहीतरी घेऊन येत असते. जीवनातील विविध भावनांचे दर्शन येथे होते. उदा. पु ल. देशपांडे यांचे, ' तुझे आहे तुजपाशी ' हे नाटक नवनिर्माणक्षम आहे.

भारतीय साहित्यातही सौन्दर्यविषयक विचार आलेला आहे. अभिनव गुप्ताच्या मते, अलौकिक आनंदाचे ज्ञान होणे म्हणजेच रमणीयता. रमणीयता म्हणजेच सौन्दर्य. हीच कल्पना कालिदासाने ' शाकुंतलात ' मांडली आहे. त्याला असे वाटते की रमणीय दृश्य अगर मधुर शब्द ऐकून मनुष्य उत्कंठित होतो. कारण कळत न कळत तो आपल्या पूर्वजन्मीच्या स्नेहाची स्मृती जागृत करीत असतो. विचारापेक्षा भावनांचे जे विविध प्रवाह आपल्या अनुभवास येतात, त्यावरच साहित्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. सौंदर्यसाहित्याने तसेच साहित्य वाचनाने पुन: पुन्हा चिंतन करण्यास वाचक प्रवृत्त होतो व त्याचा आस्वाद घेतो.
तात्पर्य, साहित्य व समाज जीवन याचा अत्यंत जवळचा संबंध आहे. अर्वाचीन वाङ्मयात समाजातील पडसाद आपल्याला आढळतात. पण साहित्य म्हणजे सामाजिक प्रक्रियेचे प्रतिबिंब नाही तर ते सर्व इतिहासाचे सार आहे. उदा. केशवसुतांनी सामाजिक क्रांतीचा विचार सांगितला, बालकवींना फक्त निसर्ग दिसला, सफल प्रीतीची गाणी तांब्यांनी गायिली तर विफल प्रेमाची आर्तवाणी गडकऱ्यांच्या हाताने रेखाटली.

वाङ्मय हे मानवी जीवनाचा ओघ बदलून टाकण्यास, त्यास गती देण्यास सहाय्यभूत ठरेल. वाङ्मयाच्या साहाय्याने जग बदलू शकेल. साहित्य हे वाचकाच्या मनाचा नुसता ताबा घेत नाही तर ते त्याच्या रक्तात मिसळते, चित्तशक्तीत प्रेरणा निर्माण करते व या प्रभावाने माणूस कार्यप्रवण होतो. सद्यस्थितीचे वर्णन करताना असे म्हणता येईल की, साहित्याने जीवनाची अनेक मूकदु:खे आज बोलकी होत आहेत.

डॉ. ब्रॅडलेने म्हटले आहे की, " कलेचा हेतू हा बाह्य जीवनाशी संबंध प्रस्थापीत करणे किंवा त्याची प्रतिकृती निर्माण करणे हा नसून तिचे एक स्वतंत्र परिपूर्ण व निरपेक्ष असे अस्तित्व असते. ते विश्व साकार करणे हाच कलेचा खराखुरा हेतू असतो. " थोडक्यात, कला ही मानवी जीवनाची फलश्रुती आहे असे म्हणता येईल.

' साहित्यकला ' ही भावसंपृक्त सौंदर्याचे दर्शन घडविणारी कला आहे हेच खरे !

● ● ●

# विद्रोही कविता – एक दृष्टिक्षेप

**संगीता बर्वे**
द्वितीय वर्ष/कला

भारतीय संस्कृतीमधील चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातीची कठोर बंधने, वांशिक भेद इत्यादिमुळे ज्ञान किंवा साहित्य हे विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित राहिले. एक विशाल समाज या ज्ञानापासून वंचित राहिला. हजारो वर्षांपासून हिंदू धर्मामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात आहे. त्यामधील शूद्रांना ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या त्रैवर्णियांची सेवा करावी लागे. त्यांना समाजव्यवस्थेमध्ये अत्यंत हीन असे पशुपातळीवरचे जीवन जगण्यास भाग पाडण्यात आले होते. शुद्र, चांडाल, अस्पृश्य, हरिजन, दलित अशा नावांनी विविध कालखंडात हा समाज ओळखला जात असे. ' दलित ' हा शब्द अलिकडचा आहे. " निव्वळ सामाजिकदृष्टयाच नव्हे तर आर्थिक व सांस्कृतिकदृष्टया उपेक्षित अशा समाजगटाला 'दलित' या नावाने ओळखले जाऊ लागले. " ' माणूस ' म्हणून त्यांचे अस्तित्वच पुसून टाकण्यात आले. त्यांच्यावर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्टया अत्याचार केले गेले. अन्न, वस्त्र, निवारा, स्वातंत्र्य, समता या गोष्टी त्यांना नाकारण्यात आल्या. थोडक्यात, त्यांचे जीवन जितके अध:पतीत करता येईल तितके केले. आणि याविषयीचाच राग दलित साहित्यांतून व्यक्त होऊ लागला.

दलित साहित्य हे प्रस्थापित मराठी साहित्यातील एक नवा बदल नसून तो वेगळा असा प्रवाह आहे. दलित साहित्य चळवळीतून दलित जाणीवेचे दर्शन घडते. ही जाणीव म्हणजेच आंबेडकरांचे विचार ! " या दलित जाणीवेतून ज्या ज्या लेखकांनी – मग ते जन्माने दलित असोत किंवा दलितेतर – त्यांचे साहित्य हे दलित साहित्य आहे. " मानवमुक्ती लढयातून दलित साहित्याचा उगम झाला. दलितांना भोगाव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे अत्यंत कडवट, तिखट दर्शन दलित साहित्यांतून प्रकट होऊ लागले. प्रचलित समाजव्यवस्थेबद्दल नकार व परिवर्तनवादाचा स्वीकार हे दलित साहित्याचे वैशिष्टच आहे.

दलित साहित्यांतून व्यक्त होते ती युगायुगाची चिरवेदना ! या वेदनेचे आदिरूप गवसते ते संत चोखामेळयाच्या अभंग गाथेत. संत चोखामेळा आपल्या जमातीची वेदना तीव्रतेने, उत्कटतेने व्यक्त करीत होता.

' ऊस डोंगापरि रस नोहे डोंगा
चोखा डोंगापरि भाव नोहे डोंगा '

असा आर्त स्वर त्याच्या कवितेतून उमटतो. पण त्याचे दु:ख कोणी जाणलेच नाही.

' हीन याती माझी देवा। कैसी घडेल तुझी सेवा
मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटू कवण्या रीती '

अशा प्रकारची आर्त वेदनाही त्याच्या कवितेतून जाणवते. चोखोबांच्या अभंगात ' वेदना ' होती. पण त्याच्या मुलाच्या कर्ममेळयाच्या अभंगात मात्र 'विद्रोह' होता. कर्ममेळा विठ्ठलाला उद्देशून - " अरे विठया !.. आम्हाला दोन दोन दिवस उपाशी ठेऊन, पंचपक्वान्नांची ताटे पुढयात घेऊन बसायला तुला लाज नाही वाटत ? "

विद्रोह म्हणजे संघर्ष. माणसाने आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष सुरू केला. ही संघर्ष भावना विद्रोही कवितेतून आकाराला आली. आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसूत. त्यांच्या ' अंत्यजाच्या

मुलाचा पहिला प्रश्न ' या कवितेचा नायक व्यक्ती नसून समाज आहे. कारण या कवितेची पाळेमुळे जीवनाच्या तळाशी साचलेल्या विषमतेत, सांस्कृतिक दुर्भंगलेपणात खोल रुपलेली आहेत. तसेच कुसुमाग्रजांच्या ' पाचोळा ' ' लिलाव ' यांसारख्या कविता यादृष्टीने सरस आहेत. तसेच ज्या समाजरचनेत गरीबांच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा लिलाव मांडला जातो ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नामशेष झाली पाहिजे असा उग्र त्वेश रसिकांच्या मनात निर्माण करण्याची शक्ती ' लिलाव ' या कवितेत आहे. तर ' पाचोळ्या ' च्या रुपाने कुसुमाग्रजांनी दलितवर्गांच्या कारुण्यपूर्ण जीवनाचे भेदक चित्रण केले आहे. दलित कवितेचा जन्म दलित मुक्तिलढ्यातून झालेला आहे. दलित कविता ही समुहाच्या वेदनेची कविता आहे. तिला समाजातील अंधश्रद्धा, उपेक्षा, संकुचितपणा नष्ट करावयाचा आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय प्रस्थापित करु पाहणाऱ्या वर्गासाठी ती आहे. तिने माणसासारख्या माणसाला तुच्छ लेखणाऱ्या प्रतिगामी शक्तींविरूद्ध उग्र बंड पुकारले आहे. भूतकाळातील वेदना व्यक्त करीत ती वर्तमानाला सामोरे जाते आणि जीवापाड जपलेली सोनेरी स्वप्ने सत्यसृष्टीत उतरवून दाखवते.

या दलित कवितेचे प्रेरणास्थान आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ! अस्पृश्यता हा आमच्या नर देहावरील कलंक आहे, आणि तो नष्ट केला पाहिजे. त्यासाठी शर्थ करावी लागेल, संघर्ष करावा लागेल अशी आत्मतेजाची जाणीव अस्पृश्य मानले गेलेल्या समाजात निर्माण करण्यात ज्या महापुरूषाने सारी हयात घालविली, त्या डॉ. बाबासाहेबांचे स्मरणही स्फुरणदायी ठरते. अस्पृश्योद्धाराच्या कामाची सुरुवात करतानाच त्यांनी, ' मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. ' अशी प्रतिज्ञा केली. त्यांच्यामुळे दलित ' माणसात ' आला. आपल्या अज्ञानी बांधवांना त्यांनी ज्ञानाची वाट दाखविली. दारिद्र्यात खितपत पडलेल्या दलितांची अस्मिता जागृत करून त्यांच्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकली. ' शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ' असा संदेश त्यांनी आपल्या बांधवांना दिला. पददलित अस्पृश्य समाज बंधनमुक्त व्हावा, तो निखळ माणूस म्हणून जगावा हीच त्यांची तळमळ होती. सर्वच क्षेत्रात अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने हक्क मिळावेत म्हणून त्यांनी स्वातंत्र्यलढा उभारला व त्याचे शेवटच्या घटकेपर्यंत झुंजार नेतृत्व केले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीदहन, काळाराममंदिर प्रवेश या त्या काळातील क्रांतीकारी घटना. पण त्यामुळे दलितांना हक्काची जाणीव झाली व सामाजिक गुलामगिरीचे बंध झुगारुन देणारी झुंजारवृत्ती जन्मास आली. अशाप्रकारे लक्षावधी पददलितांना धुळीतून धवलतेकडे नेणारे बाबासाहेब या युगाचे महान शिल्पकार. दलितांना आत्मविश्वास, आत्मावलंबन आणि आत्मसन्मानाचा प्रकाश देणारे युगंधर बाबासाहेब समग्र दलित जीवनाचे प्रेरणास्थानच. आंबेडकरपूर्व दलित चळवळीचा प्रारंभ फुले यांच्या कार्यापासून होतो. महर्षी शिंदे, राजर्षी शाहूमहाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रयत्नातून आंबेडकरपूर्व दलित चळवळ उभी राहिली.

' किसन फागू बंदसोडे पाटील ' हा एक जाग आलेला अस्वस्थ कवी ! हा देश माझा म्हणण्याइतके या देशाने आपल्यासाठी काय केले ? असा प्रश्न त्याला पडतो. म्हणून तो लिहितो –

" पहा पहा सारे जन हो, हा हिंद देश माझा
दुहीचे मूलस्थान
भेदांचे येथे रान
वैरास देई मान, हा हिंद देश माझा
जगतात कोठे नाही
ती भेद येथे पाही
जन्माने वर्ण ठरवी, हा हिंद देश माझा. "

या देशात माणसासारख्या माणसाला ज्या तऱ्हेने शतकानुशतके वागणूक मिळाली तेथे यापेक्षा दुसरी काय प्रतिक्रिया होणार ? धर्माच्या नावाखाली माणसाचा छळ होतो त्या धर्माविषयी प्रेम का वाटावे ? जनावरांपेक्षाही हीन जीवन वाट्याला आणून देणाऱ्या समाजव्यवस्थेत त्यांनी का रहावे ? जनजागृतीच्या प्रेरणेने भारलेला कवी आपली वेदना कवितेतून व्यक्त करतो. किड्या-मुंग्यांना साखर घालणारा हिंदू धर्म अस्पृश्यांना उपाशी ठेवतो,

शिळ्यापाक्या, उष्ट्या, फेकलेल्या तुकड्यावर गुजराण करायला सांगतो. हा अन्याय नव्हे काय ? म्हणून किसन फागू अगतिकपणे देवाला म्हणतो–

" हरी ! मज पशू कर वा पक्षी कर
परि करू नको महार. "

या दुःखभोगातून त्यांच्या मनात विद्रोह जागा होतो. वेदना ही विद्रोहाची जननी आहे. म्हणून किसन फागूंचे मन अस्पृश्यांना आवाहन करते–

' साहू नका कुणाचा जुलूम
होऊ नका कुणाचे गुलाम
सोडून द्यारे सारे बदकाम. "

आणि यासाठी ' नाही लढल्याविन मुक्ती ' हे सूत्र मांडतात. जनजागरणाचे व्रत घेतलेल्या किसन फागूंच्या कवितेने दलितांच्या ' ठेविले अनंते तैसेचि राहावे ' या वृत्तीचा उपहास केला आहे. या उपहासामागे त्यांचे तिळतिळ तुटणारे अंतःकरण होते. त्यांच्या कवितेची भाषा कधी समजावणीची, कधी कडवट उपहासाची, कधी नकाराची तर कधी धिक्काराची. पण त्यामागे ' निर्भेद असे जो धर्म तोच, स्वधर्म ' हे सूत्र होते. किसन फागूंच्या तुलनेत शाहीर घेगडे यांची कविता अधिक प्रचारकी, आवाहनप्रिय आहे. त्यांच्याप्रमाणेच वामनराव कर्डकही आपली कविता घेऊन दलितांपर्यंत गेले. त्यांनी दलितांच्या मनात अंगार पेटविला. ते म्हणतात–

" तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा, पाऊसधारा मुळी न आम्हा शिवे. "

बाबासाहेब हयात होते तेव्हा त्यांच्या विचारांचे लोण समाजात पोचवावे. मुक्तिलढ्यासाठी नवजागरण घडवून आणावे म्हणून किसन फागूजी, घेगडे, कर्डक, ना. रा. शेंडे इत्यादिंची कविता धडपडत होती.

बाबुराव बागूल म्हणतात – " माणसाच्या जगात माणसाएवढे मोठे कुणीही नाही. देव, धर्म, देश ही माणसाच्या निर्माणक्षमतेची आणि प्रतिभेची स्मारके आहेत. माणसामुळे देशाला देशपण येते, कलेला कला येते. " म्हणून दलितांची कविता ही माणसाची कविता आहे. ती हिंदू संस्कार नाकारून अवतरते आहे.

धर्मांतरानंतर व त्यापाठोपाठ डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर जी परिस्थिती निर्माण झाली त्यातून दलित कविता वणव्यासारखी जाळीत सुटली. हा भावनांचा वणवा उध्वस्ततेच्या, अन्यायाच्या, संतापाच्या, अगतिकतेच्या प्रवृत्तीतून भडकलेला होता. स्वातंत्र्यानंतरही दलितांना अत्याचार सोसावा लागला म्हणून दलित कविता ही शतकानुशतके दुःख, दारिद्र्य मानहानी, उपेक्षा भोगणाऱ्या समाजाची आहे. जोपर्यंत वर्णव्यवस्था कायम आहे. तोपर्यंत सामाजिक विषमतेचे दुःख कायम राहणारच ! दलित कवितेला सामाजिक व आर्थिक विषमतेचे पूर्ण निर्मूलन हवे आहे.

१९५६ नंतरच्या काळातील एक श्रेष्ठ कवी नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेला व्यापक अनुभव दिले. श्रमिकांचे सहजीवन, त्यांच्या व्यथा, वेदना आणि आकांक्षा सुर्वे यांनीच मराठी कवितेत प्रथम प्रखर रीतीने आणल्या. ' ऐसा गा मी ब्रम्ह, ' ' माझे विद्यापीठ ' ' जाहिरनामा ' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. आपल्या कवितेतून त्यांनी सामान्य माणसाच्या जीवनातील प्रखर वास्तवता टिपली आहे. आणि त्यांची भावनोत्कट चित्रेही मांडली आहेत. भाकरीचा चंद्र शोधण्यातच ज्यांची जिंदगी बरबाद झाली, त्या नारायण सुर्वेनी स्वतःचे अनुभवविश्वही आपल्या काव्यात ओतले आहे. ' माझी आई ' या कवितेत ते एक थरथरता अनुभव व्यक्त करतात. हा अनुभव आईच्या चिरविरहाचा आहे. आई गेली त्या रात्री काय झाले हे सांगताना ते म्हणतात –

" त्याच रात्री आम्ही पाचांनी
एकमेकांस बिलगूनी
आईची माया समजून
घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही
आता आई देखील नाही. "

असा आपला दाहक अनुभव ते मांडतात. ' सर्वांसाठी आपण ' हे सुर्व्यांच्या कवितांतून स्पष्ट होणारे मुख्य विचारसूत्र आहे. नवी समाजरचना हे सुर्व्यांचे स्वप्न आहे. म्हणून परंपरा, विषमता, धर्मभावना नाकारण्याची त्यांची भूमिका आहे. ते म्हणतात

'ज्यांना जन्मभर दुःख, दैन्य, दारिद्र्य मिळाले असेल त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये तर, काय करावे ? "

नामदेव ढसाळांची कविता ही अन्य दलित कवितेपेक्षा अंतर्बाह्य निराळी आहे. मुंबईतील ' गोलपिठा ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या गलिच्छ जगात वाढलेल्या ढसाळांनी जे भोगले ते कवितेतून व्यक्त केले. गोलपीठाच्या जगातील माणसांनाच ते आवाहन करीत नाहीत, तर त्या पलिकडच्या सुरक्षित जीवन जगणाऱ्या पांढरपेशांनाही करतात. कारण समाजाचे दलित व दलितेतर असे विघटनच त्यांना मान्य नव्हते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलितांच्या उन्नतीसाठी देशाने अतिशय मर्यादित पावले उचलली. सर्व दृष्टीने या वर्गाचा स्वतंत्र भारतात भ्रमनिरास झाला. 'स्वातंत्र्यात माणूस निराश होतो 'अशी ढसाळांची प्रतिक्रिया आहे. म्हणून ते चिडून लिहितात–

" पंधरा ऑगष्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे. "

' माणूस ' म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणाऱ्या समाजाच्या मनातला धुमसत राहिलेला अंगार व्यक्त करताना ते म्हणतात–

" किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी ?
मरेपर्यंत रहायचे का असेच युद्धकैदी ?

' कोंडवाडा ' या कवितासंग्रहात दया पवारांचे जिवंत अनुभव प्रकट झाले आहेत. जातीव्यवस्था आणि आर्थिक दुरवस्था दलितांची कशी कोंडी करते याचे चित्र ' कोंडवाडा ' मधून उमटले आहे. देशाच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या अस्पृश्य शिपायाच्या गावी त्याच्याच आई बहिणींची विटंबना होते. ही बातमी समजताच तो सैनिक आपल्या या देशाला उद्देशून वेदनेने विचारतो आहे –

" हे माझ्या देशा, सांग, सांग
कोणत्या माझ्या सीमा ?
तू तर हात घातला काळजाला. "

देशाच्या सीमा आणि गावकुसाबाहेरील लोकांच्या वाट्याला आलेल्या या जाचक चौकटी यात कवीने मोठे वास्तव नाटच टिपले आहे. दया पवारांच्या कवितेत विद्रोहापेक्षा वेदनेचा स्वर तीव्र आहे. वामन निंबाळकरांचे दुःख हे, ते ज्या वस्तीत वाढले त्या गावकुसाबाहेरच्या वस्तीचे विदारक दुःख आहे. या समाजाची कुणी दखल घेतली नाही. यांना हीन प्रकारचे जीवन जगावे लागले. दलितेतर समाजाने दलितांची घोर उपेक्षा केली. म्हणून निंबाळकर म्हणतात–

" ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन
विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा. "

दलित स्त्री–पुरुषांवर होणाऱ्या अत्याचारामुळे निंबाळकरांचे मन पेटून निघते.

नरेशकुमार इंगळे यांची ' अंगारा ' मधील कविता मानवता पायदळी तुडविणाऱ्या प्रतिगामी शक्तींशी संघर्ष करते आहे. जे दलितांविषयी खोटा कळवळा दाखवतात, त्यांचे खोटे, भडक चित्र रेखाटतात त्यांच्याच गळ्यात स्तुतीचे हार पडतात, असे ते म्हणतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढा काळ लोटला तरी मी तिथेच आहे आणि मी तिथंच राहणार का ? या त्र्यंबक सपकाळांच्या प्रश्नाने मन अस्वस्थ होते. दलितादी अल्पसंख्य समुहांच्या वाट्याला आले ते अन्याय, बहिष्कार, जाळपोळ म्हणून तिकिट चेकरचा व्यवसाय करणारे सपकाळे लिहितात– " मराठी साहित्यात माझ्या वेदनेचा सूर मला कुठे गवसलाच नाही. मी लहानपणी जे भोगले ते अजून–माझे वय वाढले तरी तसेच आहे. " त्यांच्या कवितेचा मुख्य सूर संतापाचा आहे. जिथे वेदना असते तिथे विद्रोह असतो. म्हणून सपकाळांची कविता सुरुंगासारखी स्फोटक्षम वाटते ! ज. वि. पवारांची कविता व्यक्तीची नसून समाजाची आहे. " फुलांशी खेळणाऱ्या वयात मी निखाऱ्यांशी खेळतोय, मोकळ्या हवेत बागडणाऱ्या वयात मी कारावास भोगतोय असे पवार म्हणतात, ते काही खोटे नाही. त्यांची कविता समुहाची व्यथा, त्यांची चीड, त्यांचे आव्हान व्यक्त करते.

दलित कवीत अगदी वेगळा प्रकृतिधर्म असलेले कवी म्हणजे प्रा. केशव मेश्राम ! त्यांच्या कवितेत वेदनेबरोबर विद्रोह आहे. त्यांच्या काही कवितांत

बांध फोडणारा प्रवाह खळाळत असलेला दिसतो. ' एक दिवस मी परमेश्वराला ' या कवितेत मेश्राम यांचे खरे रुप गवसते. ते आरंभीच म्हणतात
" एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली, तो लेकाचा फक्त फक्कन हसला. "

आपल्या वाढदिवशी परमेश्वराला शिवी देणारे हे कविमन आपल्या समाजाला, ज्या स्तरात आपण जन्मलो, वाढलो त्या स्तराला, ज्या तऱ्हेने जगण्यासाठी धडपडावे लागते ती तऱ्हा पाहून पेटून उठते.

अशा प्रकारे दलित कविता आपल्या सभोवतालच्या पारंपारिक साखळ्या तोडून मराठी कवितेच्या क्षेत्रात आज प्रतिष्ठा पावली आहे. दलित कवितेचा जन्म जसा दलित वर्गासाठी आहे तसा आपल्या वर्गाबाहेर पसरलेल्या समाजासाठी आहे. ती सार्थ आहे तशी परार्थ आहे. बाबूराव बागूल म्हणतात त्याप्रमाणे एक वर्ण, एक जात तेवढी अस्पृश्यतेला जबाबदार धरता येणार नाही. तर संपूर्ण समाजव्यवस्थाच तिला जबाबदार आहे. दलित कविता जशी पीडितांचे दुःख व्यक्त करण्यात रंगली आहे. तशीच ती सामाजिक विषमतेवर घणाघात घालीत आहे. ती ' सूर्यवंशी ' आहे आणि ती घराघरांतून सूर्य पेटत चालल्याची ग्वाही देत आहे. अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म हेच तिचे स्वप्न आहे. निर्धार, दुर्दम्य आशावाद व्यक्त करणाऱ्या या विद्रोही कवितेने मराठी कविता अधिक जाणीवसंपन्न व प्रगल्भ केली आहे.



# कविता

## व्यथा

मनातल्या व्यथेनं साकार व्हावं
शब्दरूप होऊन या कागदावर
व्यथांचा गुंता सोडवता, सोडवता पाझरावं
माझ्या शब्दांनी करूणरस होऊन.
दोनच अश्रू ढाळावेत आणि ती अक्षरे पुसट व्हावी
त्यातील व्यथेसह . . . !

प्रगतीच्या पथावर मानव चाललाय
याला भान नाही मानवतेचं
भान नाही आपल्या कर्तव्याचं आणि जबाबदारीचं
भान आहे ते फक्त पैशाचं आणि
मृगजळासारख्या वाटणाऱ्या क्षणिक सुखाचं
मानवातली माणूसकी विरळ होत चाललीय
आणि गडद होत चाललीय ती फक्त हाव
पैशाची, भोगाची !

. . . .

फुलणं एका कळीचं
एक कळी फूलत होती
वाऱ्याच्या स्पर्शाने थरथरत होती
दवबिंदूच्या अस्तित्वात लाजत होती
सूर्याचा सोनेरी किरण तिला हसवीत होता
आकाशाच्या निळयाशार डोहात ती तरंगत होती
अचानक एक वाऱ्याचा झोत आला
आणि . . . . आणि एक सुंदर कळी
उमलायच्या आतच खुडली गेली
राहिले ते रुक्ष, निष्पर्ण असे देठ...!
प्राणप्रियेच्या वियोगाने अश्रू ढाळणारे
वेदनेचे गाणे ओठात माझ्या
पण त्याचे सूर कानात तुझ्या
रंगाचा कुंचला हातात माझ्या
पण चित्र उमटले मनात तुझ्या
वियोगाचे दुःख हृदयात माझ्या
पण अश्रू माझ्या मात्र डोळयात तुझ्या
माझ्यात तू आणि तुझ्यात मी सामावूनच गेलो आता

. . . .

दुःखाचे बांधूनी पैंजण
वेदनेचा लावूनी ताल
मी नाचतेय
अखंडपणे, अविरतपणे
पण नाचता नाचता
मी थकून जाईन, गळून पडेन, मरून जाईन
पण माझे हे पैंजण दुःखाचे, वेदनेचे पैंजण
बांधेल दुसरं कुणीतरी आणि नाचेल
अखेरपर्यंत . . .

**भाग्यश्री इचलकरंजीकर**
प्रथम वर्ष/कला

## खंत

सारी स्वप्ने विलीन झालीत !
आहोत आज उभे आपण
ओसाड सुक्या माळावर
नजरेस पडत नाही दिव्यांचा प्रकाश
आकाशात नाही वारे, आसमंतात वारे
चारी दिशांना दाटून आलाय
अंधारच अंधार
निर्जन झालेत आपुलकीचे पाट
पुढे दिसतोय ऊंचच ऊंच घाट
चाळीस वर्षांपूर्वीची सारी स्वप्नं
आज विलीन झालीत
सारे जग झालेय निष्पर्ण
अवती भवती
कुत्र्यांचे भीतीदायक भुंकणे
जनावरांचे सरपटणे
किती उमेदी होत्या
जेव्हा पहिल्या स्वातंत्र्याचा मिळाला खाऊ
तेव्हा ओढ होती नव्याची
जोड होती ध्येयवादाची
आणि भुरळ होती त्या रंगाची
आता साचली त्या रंगाची धूळ
आणि काळवंडलय आसमंत
स्वप्नांचे झाले आहे पोतेरे
ध्येयवादाचे मातेरे
व्यवहारात लबाडीची मगरमिठी
पडली माणुसकीला
मनात खंत आहे, दुःखे आहेत
अपेक्षाभंगाची वेदना ठसठसते आहे
ओसाड सुक्या माळावर
आहोत उभे आपण
उभेच आहोत...

गोविंदा सारंग
द्वितीय वर्ष/कला

## सत्याचे काय काम आहे ?

भ्रष्टाचारी राज्यात
सत्याचे काय काम आहे?
पाण्यात दूध मिसळणाऱ्या भैय्यांचे हे राज्य आहे।
परीक्षेत कॉपी करणाऱ्या मुलांची शाळा आहे
शिक्षकांना त्रास देणाऱ्या तरूणांचे कॉलेज आहे।
नटांची नक्कल करायला
मुलांसाठी पिक्चर आहे
डॅश डॅश विरुद्ध बोलणाऱ्या
लोकांसाठी जेल आहे।
आश्वासने देणाऱ्या
नेत्यांसाठी स्टेज आहे
पैशाची लाच घ्यायला
गुंडांसाठी पोलीस आहे।
आजाऱ्यांना मारण्यासाठी
पाण्याचे औषध आहे
भ्रष्टाचारी राज्यात
सत्याचे काय काम आहे ?

कल्पना पेठे
द्वितीय वर्ष / वाणिज्य

## भावनाश्रू

भावना
हर्षाश्रूच्या
तेजोमय डोळ्यांना
अंजन घालणाऱ्या

भावना
कंठाश्रूच्या
दाटलेल्या मनांना
मुक्ततेकडे नेणाऱ्या

भावना ओढाश्रूच्या
क्षीणलेल्या तनांना
उबारा देणाऱ्या

भावना
तारुण्याश्रूच्या
धावणाऱ्या विचारांना
काबूत ठेवणाऱ्या

भावना
दुःखाश्रूच्या
हृदयातील अस्थिरतेला
शांत करणाऱ्या

भावना
वृद्धाश्रूच्या
स्वर्गीय कल्पनेला
विणत ठेवणाऱ्या

**उदय घाडी**
द्वितीय वर्ष / वाणिज्य

## शंका

सूर्य आता कलणार आहे
आणि
सांजही अंधारणार आहे
तरीही मी उभा आहे
उद्याच्या सूर्यासाठी.
ती सांज येणार आहे
फुले पुन्हा उमलणार आहेत
तुझी चाहूलच तशी
मऊ उबदार आहे
पण . . . .
आजकाल सूर्यही
ढासळायला लागला आहे
सांजवेळ होईल की नाही
मला ही शंका आहे

**श्रीकांत मिठबावकर**
तृतीय वर्ष / वाणिज्य

## काव्य

गालात हसताना मनात का रूसावे
स्वप्न पहाताना मध्येच का उठावे
विश्वात तुझ्या मलाच का गुंतवावे
भाग्य कुणाचे हे तुझ्या अंतरी मी असावे
शृंगारात आपुल्या ताऱ्यांनी का लाजावे
शून्यात पहाताना ओठांनी का झंकारावे
कोवळ्या मनाने जसे दवात चींब व्हावे
तसे हे ' काव्य ' ओठांनी तव गालावरी लिहावे.

**संजय धुरी**
तृतीय वर्ष / वाणिज्य

## क्षितिज

पुनवेच्या राती
सागराला भरती,
आसवांच्या नद्यांना
का लागली ओहोटी
धुंद वाहतो वारा
बरसात नक्षत्रांची,
अवसेचा ध्यास
का लागे ओठी
का हसतो चंद्र
चेतनाहिन अंधाराला,
क्षणात मेघांनी
झाकोळून गेला
अंधारच अंधार
स्तब्ध झाला वारा,
उरी वेदना घेवून
येई शुक्र तारा

वसंत केळकर.
तृतीय वर्ष / कला

## झुलवा

आठवणींची पाखरे
भरारी मारतात
तेव्हा –
अश्रुंची पाने
थरथरु लागतात
अन् –
दुबळ्या मनाच्या
जखमा दुखावतात
तेव्हा–
इच्छांच्या कलशाला
पाझर फुटतो
अन् –
आशेच्या झुंबराला झुलवा मिळतो.

संजू वायंगणकर
तृतीय वर्ष / वाणिज्य

# Metaphysical Poetry

Sangita Nene
T. Y. B. A.

Metaphysical poetry began early in the Jacobean Age. e. g. In the last stage of the Age of Shakespeare. John Donne was the leader and founder of the metaphysical school of poetry. He led the new way of writing poetry as a reaction against the conventional poetry of the Spensarians. It was Dr. Johnson who called Donne and his followers- ' the Metaphysical Poets. ' This title was borrowed by Dr. Johnson from John Dryden.

John Donne was the father of metaphysical school of poets which broke new ground in English poetry. He was born in London In 1537. Similarly, Andrew Marvel (1621-1678) and George Herbert (1593-1633) were also metaphysical poets.

The word - ' meta ' means ' beyond ' and ' physics ' means ' physical nature. ' It was Dryden who first used the word - ' metaphysical ' in connection with Donne's poetry and wrote- " Donne affects the metaphysics " Then, Dr. Johnson confirmed the judgement of Dryden.

Dr. Johnson condemned this school of poets because of the habits common to this school of poets, of always seeking to express something after, something behind the simple obvious first sense of a subject. They were affected by the ingenuity, the subtlety and what Johnson calls ' the watch for novelty ' which distinguishes Donne, for instance, from the straightforward sentiment and the lucid imagery of the Elizabethans.

The following are the main characteristics of the metaphysical poetry of this age. The works of this group of poets have several features in common.

i) Their poetry is, to a great extent, lyrical.

ii) In theme, it is chiefly religious or amatory.

iii) There is much metrical facility even in complicated lyrical stanza.

iv) The poetic style is some times almost starting in its sudden beauty of phrase and melody of diction, but there are unexpected turns of language and figures of speech.

**Display of learning.**

The metaphysical poets were men of learning and to show their learning was their chief object. In metaphysical poetry, we come across obscure and recondite references, and vast learning is twisted in such a manner that it becomes very difficult for a reader to follow what the poet really intends to say.

## Intellectual poetry

Metaphysical poetry was purely intellectual and made an appeal to the intellectuals. The thoughts of the metaphysical poets were often new but seldom natural. They saw beneath the surface of life and illuminated the deeper places with revealing flashes and devoting their intellect and imagination to reflection upon God and their relation to Him. They produced what is, by no means, common in our literature, great religious poetry.

## Far-Fetched Images

Metaphysical poets saw acute resemblances in things apparently unlike. They introduced far-fetched images which could not be easily understood by the readers.

## Conceits

The metaphysical conceit arose from intellectual process of thinking in figures. Conceit is an instrument by which a metaphysical poet reveals his wit. Conceit is a literary term which means a strained or far-fetched comparison of literary figure.

## Summary of the chief Characteristics of Metaphysical Poetry

1) It is complex and difficult. Most varied concepts are brought together.

2) It is intellectual in tone. There is an analysis of the most delicate shades of psychological experiences.

3) There is a fusion of emotion and intellect as there is intellectual analysis of emotions personally experienced by the poet.

4) It is full of conceits which are learned, intellectual and over-elaborated.

5) It is argumentative. There is subtle evolution of thought.

6) Originality is achieved by the use of a new vocabulary drawn from the world of trade and commerce, the arts and the sciences.

7) In order to arrest the attention, often a poem begins abruptly and colloquially, and unusual rhythms are used. Similarly, unusual compound words are also used for the same purpose.

8) Sometimes dramatic form is also used.

---

## Remarkable Parallel !

Facts and figures have often proved that history repeats itself.

The course of Napolean and Hitler were linked by an interesting number, 129.

* Napolean was born in 1760 and Hitler in 1889, 129 years later.
* Napolean came to power in 1804 and exactly after 129 years Hitler came to power in 1933.
* Napolean invaded Vienna in 1809 and after 129 years Hitler invaded Vienna in 1938.
* Napolean attackad Russia in 1812 and Hitler in 1941 again after 129 years.
* Both dictators attacked Russia in winter and were defeated.



Rasraj

# Literary Criticism

**Hemlata Damale**
T. Y. B. A.

In its strict sense, the word ' criticism ' means judgement. This word is generally used in this broad sense. Therefore, the literary critic is generally regarded as an expert who gives such a judgement. He brings a special faculty and training to bear upon a piece of literary work. He examines its merits and defects. Then, he passes a judgement upon it. However, the term ' literature of criticism ' includes more than the literature which records judgement. We include under it the whole mass of literat'ıre. Its'object may be analysis, interpr n, evaluation or all of these in combine. Poetry, drama and novel deal directly with life. criticism deals with poetry, drama, novel and also with criticism itself. We define creative literature as an interpretation of life under the various forms of literary art. Therefore, we can define ' criticism ' as an interpretation of that interpretation, and also of the forms of art through which it is given.

Let us, first, consider the function of criticism – Criticism may be regarded as having the following different functions.

1. That of interpretation or explanation.
2. That of Judgement.
3. That of exposition or appreciation.
4. That of evaluation.

In practice, however, these functions have been generally combine.

In the words of walter Pater, ' Criticism is an art of interpreting art. It serves as an intermediary between the author and the reader, by explaining the one to the other. The critic, as an interpreter, has got special training. Therefore, he feels the virtue of a masterpiece, then he analyses it and sets it forth. According to Carlyle, Criticism stands like an interpreter between the inspired and the un-inspired. In other words, the critic explains the full meaning and value of a work to an ordinary reader. The critic, as interpreter, penetrates to the heart of the book. He analyses its essential qualities of power and beauty. He distinguishes between what is temporary and what is permanent in the book. He analyses and formulates its meaning. He explains the artistic and moral principles in it. He makes explicit what is implicit in the book. He shows what the book really is-its content, its spirit and its art. His own aim is to know, and to help the reader to know the book itself. However, this function of criticism appears rather didactic. Therefore, according to Matthew Arnold 'Criticism is a disinterested attempt to learn and expl ain the best that is known and thought in the world Therefore, it is said that the good critic narrates the adventures of his soul among the masterpiece.

According to some critics, the function of criticism is judgement. Here, the critic is looked upon as a judge who finds out the

faults and merits of a book. The critic, as a judge, must have wide learning and experience. His judgement must be based on his knowledge of the subject and also on the existing book. However, the critic as a judge must be impartial and free from any kind of bias. He is like an investigator. He must review the phenomena of literature as they actually stand. He must systematize the laws and principles by which they are moulded and produce their effects. He must recognize no court of appeal to the literary works themselves. He must discover the principles by direct examination of the books. He must examine literature in the spirit of pure investigation as a satirist.

In fact, the reader is not interested in the final judgement or evaluation, but in the process by which it is reached. Therefore, according to other critics, exposition or appreciation is the function of criticism. The reader finds the true value of the finest works of criticism in exposition or appreciation. Such a critic shall poise the book with discernment. He shall not be too free with the censure. His influence must be positive and creative rather than destructive. He must be a man of deeper experience and superior wisdom He must try to enlighten and stimulate the reader. Such a critic must share with his readers his larger sense of the meaning of literature. He must have special gifts of insight, penetration and comprehension. He must help his reader to find in a great book qualities of power and beauty, a wealth of interest and a depth of significance, He is a path-finder breaking new ground. Sometimes, he is a friendly companion. He teaches us to read it for ourselves with quickned intelligence and keener appreciation, He gives us not instruction but provocation. There are a few more views about the function of criticism.

1) According to Addison ... the function of criticism is pure appreciation. The critic provides aesthetic pleasure to the reader by showing the spots of beauty and loveliness of a book.

2) According to some critics, the great function of criticism is to evaluate properly the works of great artist so that the common reader may be able to arrive at the real value of an artist.

3) Another function of criticism is to make a comparative study of a work of art with refereneće to similar other works of art produced in other languages of the world.

4) It is the function of criticism to reconstruct the work of the creative vision of the artist.

However, we must always remember that in actual practice the various functions of criticism pass over into one another. It, therefore, becomes difficutt to draw a sharp line between them. We can conclude that literary criticism performs manyfold functions.

# Religion and Politics

**Sangita Koyande**
S. Y. B. A.

**Concepts of Religion and Politics :**
Man was living in the caves at the early stage of his settlement. Then, he stationed on the river-banks. At that juncture, man felt peculiar curiousity about this world and his life in it. He tried to interpret his life and the events in this world. This gave rise to religion. Different philosophers came forth with different religions. They tried to evolve ideal value systems. Consequently religion is a code consiting of ideal principles which aim at the development and emancipation of the society.

The political institution was emerged in the world after the religious institution. According to that, the government is an instituton that governs that society on the basis of law and authority to punish. It requires many schools of political thought to construct the government. The activities, performed of those schools to grasp the power and to retain it, are termed as politics

**The basic factors underlying Religion and Politics**

Religion tries to interpret life and the world around us. It is created to offer more happy life to man. In other words, we find that the ideal stage of man's life is aimed at in the religion. Therefore, the fundamental basis of religion is the principles-which are advocated by the philosopher or the angel or an immortal power. Naturally, religious book is the chief base of religion. Hence, 'the words' in those books acquire supreme importance. This stage perverted to such an extent that some people dare-say that religion is not made for the society, but the society is made for the religion rather. Similarly, it is also said that the nature of religion is eternal,

On the other hand, politics is based on the nature of the Government. The Government is based upon written or unwritten rules. Such rules are dependant upon the people. The social-mind is related with the contemporary socio-economic and cultural circumstances. Consequently, politics is relied upon the contemporary conditions.

That is, the nature of politics is temtorary and the future of the society is destined by the politics. Therefore, ' society ' gets supreme importance rather than the ' words in religious books ' However, we should not forget that society is dependant upon pclitics sometimes; but sometimes politics is relied upon society.

As a result, politics is based upon various schools of political thought. such a

condition gives birth to various political parties. These parties try to solve the questions and problems of the society with the help of their political objectives and policies. Thus, politics is based upon changeable or flexible principles, whereas, religion rests upon inflexible or rigid and dogmatic thoughts. In short, the commitment to the political thoughts is entirely a social matter while religion is exclusively a personal matter. The commitment to the political thought is rested upon social circumstances and problems whereas religion rests on the individual faith and belief.

**Religion and politics-Inconsistency :-**

Religion pays respect to ' the words.' and politics to the public opinion. Religion is eternal and contineous flow of faith but politics is a temporal matter. Still, politics affects man's life and future widely. politics thinks of man within the context of society. And, religion thinks of society with reference to man.

**Consequences :**

In practice, some people try to consolidate religion and politics by ignoring the above-said inconsistencies. They try to impose the word-supremacy theory upon the public opinion. They run the religion based politics assuming that society is strictly made for religion only.

But, this tendency begets some other ill-effects e. g. As it is held that religion is eternal; the old, out-dated customs and beliefs in the religion are attempted to impose upon the people in the from of politics. The heinous slaughter of the Jews by Adolf Hitler is the worst instance of this. Similary, it is attempted to win the political battle by inflaming the religious feelings. However, we can't say that such victory solves the problems of the society. This indicates that there is a huge rift between man's individual faith and his social welfare. However, the people are intellectually blinded due to the inflamation of religious sentiments.

The social conflicts continue to exist even after that. And, the people who run the religion based-politics are motivated by extreme, impetuous and revengeful thoughts. This creates blood-shed. But, the social problems stand unsolved. Many instances can be cited in this regard. In Iran, the Shiate Muslim leader Khomeni declared crusade, and grasped the Government and politics in his hands. He caused Iran to fight a war for a long time. But, finally, Iran failed to achive her welfare on the basis of religious thoughts alone.

In India, Ram was born in the ancient times. The place of his birth is called as-' Ram - Janmabhoomi, Then the muslims invaded India and Babar the Muslim king devastated ' the Ram Mandir ' and erected the Babari Masjid there. To think of the religious sentiment, the struggle broke out on the question of re-building of the Ram Mandir at its earlier site. But, this was the chief issue during the recent general elections in India. To Think of this objectively and honestly, the Ram-Janmabhoomi-issue can be a question of individual faith. The political parties can win elections infuriating religious sentiments on this question. But, one can't solve the social problmes that the country is facing nowadays.

If we cast another watchful look at Maharashtra we find that religion and communalism are raising their heads, It is easy to win the elections under the

guise of religion, but can such a victory solve the problems of society ? some antisocial elements are creating terror and hooliganism, which is resulting in the loss of individual freedom. But, history has put many instances before us that where the individual freedom is lost, dictatorship takes the birth.

In view of the prospective politics in Maharashtra, we should rather remember the instance of punjab Both the Hindu and Sikh religious groups inhabit in Punjab. A few centuries ago one of the Hinduistic groups became aggressive in order to protect the Hindus from the Muslim invasion. That group obtained a warlike role. It was further designate as the Sikh religion. Therefore, even today, we find the persons belonging to the Hindu and the Sikh within a single family. In recent years or during the freedom struggle movement a social organisation was created there in Punjab called as Akali Dal They advocated social and religious principles and the problems based on them. But, after sometime, they started asserting impetuous religious demands and political concessions. In this manner, a social organisation was transformed into a political party.

It partly succeeded in obtaining the power in punjab. But, this success in part created the greatest peril on the path of their social service. Because, they have offered a religious appeal to the unemployed youths in punjab and obtained their votes. However, when they came to power, they found it difficult tofulfil the religious demands they had spoken for. In conseqence, the Akali-Dal Party developed a faction among itself pressing more aggressive demands in order to create a stronghold on the Punjabi people and politics. Meanwhile, Mrs. Indira Gandhi's shrewd moves became successful. The Akali Government was toppled and the Congress grasped the power. Therefore, the defeated Akali Dal consolidated all of its factions. And it started pressing the demand of autonomy to the state of Panjab. But, again, they took the base of religion, and they instigated the religious feelings. As a result, the unemployed Punjabi youth became ready to sacrify his life and slaughter others for the sake of religion. Thousands of innocent people were killed. In fact, the basic problems of Punjab are growing unemployment, landless small farmers poverty.

It is possible to implement long-term remedy through the medium of political policies on those problems. But as Karl Marx said ' Religion is a pill of opium, " the Akails have given this pill to the Sikhs in Punjab. Therefore, they have forgotten about their basic problems. The Akalis are trying to seek the power under the guise of revival of Sikh-religion. However, the comman-man is suffering from starvation, The youth is haunted by religious fanaticism. And the newly-rich class has gone blind by political ambitions. This is an error of misconceiving the concepts of religion and politics.

And such an error of misconception is most likely to occur in Maharashtra also. Therefore, could we hold that Punjab has sounded a warning bell for us the Maharashtrians ? And, should we conclude that if we don't avoid the communal and religious appeals, we are also doomed to meet the same fate as the Punjab has been with ? We leave the answer up to the thoughtful Maharashtrians only.

● ● ●

## The Body

Ear
A grest listener
Listens the Life music
Nose
A fine smeller
Smells the Life scent
Eye
A good looker
Sees the Life-picture,
Heart
A good compiler
Compiles the Life juice
Mouth
A rhythmic singer
Sings the Life song.

**Uday Ghadi**
S. Y. B. Com.

## A Poem

When
One of the
Beauties
In Nature
Sometimes
Divides the mind,
Then
The blue lake
In
Such Nature
Tries
To Finish
Itself

**Shyam Birje**
T. Y. B. Com.

# कनिष्ठ विभाग

# भारतरत्न डॉ. आंबेडकर

रेखा मिठबावकर
बारावी/कला

महान कर्मयोगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतसरकारने मरणोत्तर ' भारतरत्न ' हा किताब देऊन गौरव केला आहे. त्या निमित्ताने त्यांचा जीवन परिचय –

डॉ. आंबेडकरांनी साऱ्या आयुष्यभर अन्यायच सहन केला. त्यांना जन्मभर ' अस्पृश्यांचे पुढारी ' हेच लेबल लावले गेले. वस्तुतः त्यांची योग्यता फार मोठी होती. त्यांच्याएवढा सुशिक्षित, त्यांच्याएवढा निष्कलंक चारित्र्याचा, उत्कृष्ट वक्ता व व्यासंगी पंडित तसेच अर्थशास्त्रज्ञ भारतीय नेत्यांत आढळून येणे अवघड होते. ते नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री होते. तेव्हा व नंतर ते विरोधी पक्षात असतानाही त्यांच्या व्यक्तिमत्वाची, व्यासंगाची, ज्ञानाची जेवढी कदर व्हावयास पाहिजे तेवढी झाली नाही.

पूर्वायुष्यात ते बडोद्यात होते. ते मोठे अधिकारी होते, पण त्यांच्या हाताखालचे सवर्ण हिंदू कारकून त्यांच्या टेबलावर फायली दुरूनच फेकीत असत. बाहेर पारशी व मुसलमान लोकही त्यांना हीन समजून रहायला जागा देत नसत. उत्तरायुष्यात त्यांना कधी कोणी ' जातीय ' ही शिवीसुद्धा बहाल केली नाही. कारण त्यामुळे ते लगेच सवर्ण हिंदूंचे, जातीय का होईना पुढारी बनले असते ! लोकांनी ते शाब्दिकसुखही त्यांना देण्याचे नाकारले, ते शेवटपर्यंत अस्पृश्यांचेच पुढारी राहिले !

पूर्वजीवनाचा विचारशक्तीवर चांगला परिणाम होत असतो. डॉ. आंबेडकरांचा हिंदू बांधवांनी छळ केला होता. त्यामुळे त्यांच्यावर डॉ. आंबेडकरांचा राग असल्यास नवल नाही. मात्र डॉ. आंबेडकर निराशावादी नव्हते किंवा निधर्मवादीही नव्हते. धर्म हा समाजाला आवश्यक नाही असे काही लोक समजतात, माझा तसा दृष्टिकोन नाही असे ते म्हणत. ' धर्माचा पाया हा व्यक्तिजीवनाला आवश्यक आणि सामाजिक व्यवहाराला पोषक असा आहे. ' तरुण लोक धर्माविषयी असे बेफिकीर बनत चालले आहेत, ते पाहून मला दुःख होते, असे ते म्हणाले होते. मला धर्म पाहिजे, पण धर्माच्या नावावर चाललेला ढोंगीपणा नको आहे. ' याचे कारण विशद करताना त्यांनी सनातनी दृष्टिकोनच सांगितला–' भौतिक सुख हे समाजातील सर्व दुःखाचा परिहार करणारे नाही, माणूस केवळ भाकरीवर जगत नाही, त्याला मन आहे आणि त्याला विचारासाठी खाद्याची आवश्यकता असते. धर्म माणसात आशावाद निर्माण करतो आणि त्याला सत्कार्याकडे प्रवृत्त करतो. '

भारताचा हिंदू धर्मातील त्रिदोषांमुळे ऱ्हास झाला, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. हे त्रिदोष कोणते ? विभूतीपूजा, मानवाचे दैवीकरण आणि कर्तव्यच्युती यामुळे हिंदू समाज रसातळाला गेला. हिंदूंची विभूतीपूजा त्यांच्या धर्मातून आली आहे. राष्ट्रावर जेव्हा जेव्हा संकट येईल तेव्हा, तेव्हा मी अवतार घेईन व या राष्ट्रास आपत्तीतून सोडवेन, असे भगवंताने हिंदूना सांगितल्यापासून शत्रूविरुद्ध एकवटून लढण्याचे त्यांनी सोडले, ते शांतपणे परमेश्वराच्या अवताराची वाट पहात असतात.

' जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला असे असूनही आजच्या कलियुगात बेफिकीरपणे

बेजबाबदारपणे लोक वागत आहेत. उदा. ' स्त्रीशिवाय घराला आणि मुलांशिवाय स्त्रीला शोभा नाही. ज्या स्त्रियांनी स्वतःच्या तळहाताचा पाळणा करून मुलांचे संगोपण केले – ज्यांनी मुले सुशिक्षित होण्यासाठी परिश्रम केले – ज्यांनी आपल्या मुलांना दीर्घायुष्य लाभण्यासाठी देवाची भोळीभाबडी करुणा भाकली – ' देवा माझे बाळ औक्षवंत होऊ दे, सदा निरोगी अन् सुखी राहू दे ' अशा मातांना काळीमा लावणारी मुले म्हणजे फुले न समजणारी आणि अलगद उचलून नजरकैदेत, गुलामगिरीत फेकणारी स्त्री - जिला स्त्रीचे हृदय नाही – आईचे प्रेम नाही – ' आईचं प्रेम न रुजत घालताच उगवतं, त्याचं बी पोटानं पेरत नाही – हृदयानं, अशी स्त्रियांना कलंक फासणारी कलंकिनी सिंधू कृष्णा ठाकूर – आत्मसमर्पण करू पहाते. पण हे विदारक कटू सत्य ब्लेडच्या धारदार पात्यासारखे काळजाच्या लुसलुशीत भागावर रेघोट्या ओढणारे आहे.

धर्माचा केंद्रबिंदू माणूस असला पाहिजे, परमेश्वर नव्हे. लोक ज्यास धर्म म्हणून ओळखतात, तो धर्म नसून कायदा असतो. या कायद्यात सुधारणा करणे हे बदलत्या काळाचे द्योतक असते. धर्माच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांचे भारतीय नेत्यांत आगळे स्थान आहे. गांधीजीप्रमाणे ते चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते नव्हते किंवा नेहरूप्रमाणे पाखंडी देखील नव्हते. ते अस्पृश्यांच्या राखीव जागांचे प्रचारक असले तरी शीख धर्मियाप्रमाणे अलगतावादी नव्हते. गांधी–नेहरूप्रमाणे ते मुसलमानांचे अनुनय करणारे तर कधीच नव्हते. सावरकरांप्रमाणे हिंदूराष्ट्रवादी नव्हते, पण मुसलमानावर त्यांची फारशी मुहोब्बत नव्हती. असला तर रागच होता. त्यांच्याबरोबर सुखाने नांदणे अशक्य आहे, अशी त्यांची समजूत होती. म्हणून सर्वप्रथम पाकिस्तानवर ग्रंथ कोणी लिहिला असेल तर तो डॉ. आंबेडकरांनीच !

डॉ. आंबेडकर शुद्ध राष्ट्रवादी होते. ते प्रखर पाकिस्तान विरोधी होते. तसेच ते कम्युनिस्ट विरोधीही होते. भारताच्या सांस्कृतिक एकतेवर त्यांचा विश्वास होता. हिंदी भाषा त्यांना परम आदरणीय वाटे. त्यांच्या दृष्टीने भारतीय राजकारणास दुय्यम महत्व होते. खरे महत्व सांस्कृतिक एकतेवर होते. डॉ. आंबेडकरांनी उत्तरायुष्यात बौद्ध धर्म स्वीकारला, असे असले तरी त्यांचे चरित्र अभ्यासल्यावर मनाची खात्री पटते की, डॉ. आंबेडकरांचे जीवन वैदिक ऋषींचे होते. साधी राहणी, अत्यंत उच्च विचार, ज्ञानाची मनस्वी ओढ, सर्वस्वाचा त्याग करावयाची तयारी व जाज्वल्य देशभक्ती या गुणांत डॉ. आंबेडकरांवर मात करतील, असे नेते भारतीय राजकारणात फारच क्वचित सापडतात.

व्यक्तीचे स्वातंत्र्य डॉ. आंबेडकरांना प्राणापेक्षा प्रिय होते. दलितांना गुलाम म्हणून सर्वांनी हजारो वर्षे वापरले ! स्वतः डॉ. आंबेडकरांना तो छळ सहन करावा लागला होता. व्यक्तिस्वातंत्र्यावर कोठेही घाला आला की, डॉ. आंबेडकर अस्वस्थ होत व त्या अन्यायास तोंड फोडत. या व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेमामुळे त्यांना लोकशाही आवडत नसे. लोकशाही जर धोक्यात येत असेल तर त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात येईल असे त्यांना वाटे. लोकशाहीबरोबर धर्मनिरपेक्ष राज्याची त्यांची अपेक्षा होती. हिंदू धर्म स्वभावतःच सहिष्णू असतो. डॉ. आंबेडकरांचे ' हिंदू वे ऑफ लाईफ ' वर जे प्रेम होते, ते त्या हिंदू संस्कृतीतील अद्यावत लोकशाहीमुळे. जातीच्या प्रेमामुळे हिंदू संस्कृतीचा उच्च दर्जा जेव्हा खालावू लागला व त्यामुळे व्यक्तिगत स्वातंत्र्य व लोकशाही धोक्यात येऊ लागली. तेव्हा त्या जातपातीवर डॉ. आंबेडकरांनी भयंकर हल्ला चढविला. शेवटपर्यंत डॉ. आंबेडकरांचे जीवन स्वच्छ व सरळ होते. त्यांच्या चेल्यांनी त्यांच्या तेजस्वी जीवनाचा खरा अर्थ जाणून घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही व जातपात विरहित शासन व्यवस्थेवरील प्रेम लक्षात घेऊन त्यानुसार आचरण केले, तर डॉ. आंबेडकरांचे ते सर्वोत्कृष्ट स्मारक होईल.

डॉ. आंबेडकरांना भारतसरकारने मरणोत्तर 'भारतरत्न हा सर्वोच्च्य नागरी बहुमान देऊन केवळ त्यांचाच नव्हे तर संपूर्ण दलित समाजाचाच एकप्रकारे गौरव केला आहे. एक कवी बाबासाहेबांचा गौरव करताना म्हणतो–

तू अमर तेज तव अखंड सामर्थ्याचे ।
दलितांच्या दीपा प्रणाम तूज विश्वाचे ।

● ● ●

# कौतुक

## लता

**२८ सप्टेंबर १९८९ रोजी स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांना ६० वर्षे पूर्ण झाली. संगीत क्षेत्रात लताने बजावलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून केंद्र शासनाने त्यांना 'फाळके पुरस्कार' बहाल केला आहे. त्यानिमित्ताने–**

कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये ' शूरा मी वंदिले ' म्हणून, संगीतातल्या दिग्गजांनी ज्या रंगमंचावरून सुरांच्या बरसातीचे साक्षात्कार घडवले, तिथे एका परकऱ्या पोरीने हे नवल वर्तवले होते. आपल्या वयाच्या मानाने लता मंगेशकरने दाखवलेले कौशल्य आश्चर्यकारक होते. सूरांतून मिळालेला आनंद आणि कर्तबगार पित्याच्या आठवणीने रंगमंदिरातील श्रोत्यांच्या अंगावर रोमांच निर्माण झाले होते. तृषातपाची मेहनत केलेल्या बुजुर्गाप्रमाणे स्वच्छ तान, सूरात भिजलेला अर्थ, लयीचा अचूक अंदाज आणि सभेवरची वारीसारखी झडप असे तिचे दर्शन होते. कुमार गंधर्व व बालगंधर्वांच्या नंतर बालवयात आपल्या असामान्यत्वाने संगीतातील वाट लता मंगशकरने उजळली. श्रोत्यांना दिनानाथांची आठवण झाली.

वडिलांचे व्रत चालवणाऱ्या लता मंगेशकरने वडिलांची नक्कल केली नाही. आपल्या कारकिर्दीत गझल, दादरे, ठुमऱ्या आणि हजारो विविध चालींनी नटलेली गाणी म्हणून कलावंत " यासम हा " असतो हे सिद्ध करून दाखवले.

लता मंगेशकरांचा सूर निर्विवाद आहे, पण शब्दांची फेक करताना दिसणारी लयकारीची जाणीव संगीताच्या आस्वादकांना मंत्रमुग्ध करणारी आहे. ती सूराइतकीच सूक्ष्म आहे. कायकारीच्या अलौकिक जाणकारीचे हे वरदानच म्हणावे लागले. गीतातले शब्द तर आशयगर्भ वाटतातच, पण व्यंजनमुक्त स्वरांनाही आश्रय लाभतो. आपल्या गाण्यांतून शब्द, सूर आणि लयीचे आकार, गंध आणि रंग घेऊन स्वरलतेवरील फुलांचे नंदनवनच लता मंगेशकरने निर्माण केले. अहोरात्र अलौकिक सूरांची अशी उधळण केल्यामुळेच आमची पहाट या सम्राज्ञीच्या सूरांबरोबरच उमलते. दुपार, संध्याकाळ, रात्र, मध्यरात्र याच सूरात न्हाऊन निघतात. ' जरा याद करो कुरबानी ' यातील आर्त हाक ऐकताना आजही डोळ्यांच्या कडा भिजतात आणि वाटते की, जवानांच्या कुरबानी इतकीच ह्या अलौकिक आवाजाची जगावर मेहरबानी आहे ! शास्त्रीय संगीतातले भुर्जी खाँ सारखे विद्वान गृहस्थही लता मंगेशकरचे गाणे ऐकताना रंगून जातात आणि " तंबोऱ्यातून निघणारा गंधार ऐकायचा असेल तर लताच्या गळ्यातून ऐका" असे उद्गार कुमार गंधर्व काढतात. अशिक्षित, शाळकरी पोरांपासून ते म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांना स्वरांच्या जादूने भारून टाकणारी ही कल्पकता होय. सुरांच्या याचकाने मागावे ते तिने पुरवावे. गझल, ठुमरी, दादरा, कव्वाली, भजन, पाळणे, लोकगीते, भावगीते, बालगीते, खानदानी संगीताच्या वळणाची गाणी . . .
तुम्ही जे जे मागितले ते तिने अस्सल दर्जातून दिले. रंगाची स्वरपुष्पे क्षणात पुरविणाऱ्या लता मंगेशकरच्या स्वराचा धर्म परिसाचा आहे. तिच्या गीतांतून तिची अभिनयाची जात जाणवते इतकी की लता पार्श्वगायिका आहे की तिच्या गीतांच्या अभिव्यक्तीतून होणाऱ्या भावनांच्याही पातळीला न पोहोचणाऱ्या नटच्या पार्श्वगायिका आहेत. असा प्रश्न निर्माण व्हावा. हिंदी चित्रपटांची दुनिया तिच्या भक्कम आवाजावर उभी आहे. सुरांच्या दुनियेतील ती अनभिषिक्त

सम्राज्ञी आहे. कोट्यावधी अंत:करणांच्या सुरांची मूक भागवता, भागवता वाढली आहे. दिनानाथांच्या मर्मबंधातील ठेव तिने सांभाळली आहे. या स्वराला ' तत् त्वम् असि' म्हणावे लागेल.

ज्ञानदेवाच्या दारी सोन्याचा पिंपळ होता. लता मंगेशकरच्या दारी सुरांचा पिंपळ आहे. पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, वंग तिच्या सुरांनी एकत्र बांधून ठेवला आहे. भारतीय संगीताच्या प्राथमिक शिक्षणाला ह्या गीतांचा उपयोग करून घेता येईल. सुरांतून सुंदर संस्कार घडवला जाईल. युद्ध, दंगल, जाळपोळ, सत्तेची उलथापालथ या सगळ्यांतून मनाची कोळोखी नष्ट करणारा लता मंगेशकरचा सूर आहे. अतिपरिचयाने देखील अवज्ञा न झालेला हा सूर आहे. माधवी देसाईच्या शद्वात या सुराचा गौरव करायचा तर म्हणावे लागेल–

आर्त विराणी मनात जागवणारी,
संध्याछायेची कापरी धून–
तुझ्या भैरवीसोबत जवळ येते अन्
कधीच न जमलेले मैफलीचे सूर अखेरीस जमवते.

**ज्ञानदेव परब**
अकरावी/वाणिज्य

● ● ●

अर्जुन पुरस्कार विजेती

## वंदना राव

वंदना रावचा जन्म एप्रिल १९६३ रोजी मंगळूर येथे झाला. तिचे वडील मंगळूर येथील सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ आहेत. वंदना रावचे प्राथमिक शिक्षण सेंट मेरीज गर्ल्स हायस्कूल येथे तर विस्न विमेन कॉलेज मंगळूर येथे बी. कॉम. पर्यंत महाविद्यालयीन शिक्षण झाले.

तिचे अँथलेटिक्समधील पदार्पण सेंट मेरीज हायस्कूलमध्ये असताना १९७८ साली झाले. १९८१ पासून श्री. जे. एम्. अपुचू यांच्या मार्गदर्शनाखाली ती शिक्षण घेत होती आणि त्याचबरोबर आई–वडिलांच्या वेळोवेळी मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे तिने आतापर्यंत उच्च शिखर गाठले आहे.

मे १९८४ साली तिला कार्पोरेशन स्टॅट बँकेमध्ये क्रीडाक्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरीमुळे नोकरी मिळाली. बँकेच्या सेवेमध्ये पदार्पण करत असतानाच तिचा भारतीय अँथलेटिक पथकात समावेश झाला. त्याचबरोबरीने परदेशी दौऱ्यात ज्या ठिकाणी जगातील अव्वल दर्जाचे नामवंत खेळाडू उपस्थित राहतात, त्या ऑलिंपिक (लॉस एंजिल्स, अमेरिका) क्रीडा महोत्सवात भाग घेण्याची सुवर्णसंधी तिला मिळाली.

ऑलिंपिकमधील तिची सर्वोत्कृष्ट कामगिरी पाहून बँकेने चार महिन्यात सप्टेंबर १९८४ मध्ये वरिष्ठ जागेवर तिला बढती दिली. तिची उत्कृष्ट कामगिरी पाहून बँकेच्या क्रीडा विभागाने भावी काळाच्या दृष्टीने तिला अँथलेटिक्समध्ये लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

सेऊल येथे पार पडलेल्या दहाव्या आशियाई क्रीडा महोत्सवात ४ x १०० मीटर रिलेमध्ये तिने भारताचे नेतृत्व केले आहे. तिला तेथे सुवर्णपदकाचा मान मिळाला. याशिवाय तिने मिळविलेले यश पुढीलप्रमाणे- १) १९८२ आशियाई क्रीडा महोत्सव, नवी दिल्ली, शंभर मीटर धावणे–सातवा क्रमांक २) १९८४ ऑलिंपिक क्रीडा महोत्सव लॉस एंजल्स (अमेरिका) ४ x ४०० रिले सातवा क्रमांक ३) १९८५, आशियाई ट्रॅक आणि फिल्ड (जकार्ता) १०० मीटर धावणे– तिसरा क्रमांक, ४ x ४०० रिले प्रथम क्रमांक. ४) १९८५, वर्ल्डकप अँथलेटिक स्पर्धा (कॅनबेरा) भाग घेतला. ५) १९८६, चौथी अँथलेटिक स्पर्धा नवी, दिल्ली, २०० मीटर धावणे, प्रथम क्रमांक. ६) १९८६ (सेऊल) आशिया क्रीडा महोत्सव ४ x ४०० मीटर रिले,प्रथम क्रमांक. ७) १९८७, आशियाई ट्रॅक आणि फिल्ड (सिंगापूर) ४ x ४०० मीटर रिले-प्रथम क्रमांक. ४ x १०० मीटर रिले द्वितीय क्रमांक, ८) १९८७ साली रोममध्ये भरलेल्या जागतिक अँथलेटिक अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेतला.
९) १९८७ मध्ये अर्जुन पुरस्कार मिळविला.
१०) १९८८ च्या सेऊलमधील ऑलिंपिकमध्ये सहभाग.

**मंदार जोशी**
बारावी/कला

● ● ●

# विश्वासराव पाटील

**१९ सप्टेंबर १९८९ रोजी 'पानिपत'चे लेखक विश्वासराव पाटील यांना 'प्रियदर्शनी' पुरस्कार बहाल करण्यात आला.**

पानिपतावर झालेला दारूण पराभव मराठी मनावर अजूनी दुःखद ठसा उमटवून आहे. " पानिपतावर विश्वास गमावला" असा वाक्यप्रचारही रूढ आहे. पण 'पानिपत' या ८१४ पानी ऐतिहासिकम राठी कादंबरीचे लेखक विश्वासराव पाटील यांच्या या ' पानिपत 'च्या विजयाने एक नवा ' विश्वास ' मराठी साहित्याला दिला आहे. विश्वास पाटील यांच्या " पानिपतने " एकदमच अटकेपार झेंडे रोवून मोठ्या ताकतीने मराठी ऐतिहासिक कादंबरीचे दालन भारून टाकले आहे.

पूर्वीच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटके–स्वामी, श्रीमान योगी, छावा, झेप, रायगडाला जाग येते, इथे ओशाळला मृत्यू या सर्वांपेक्षा पानिपतचे वेगळेपण नेमकं कशात आहे ? याचा विचार करताना, एक लक्षात येते की यात, नायक, नायिका किंवा खलनायकही नाहीत किंवा भावूक रडवणारे प्रसंग, घटना यांची समोर रेलचेल असतानाही लेखक त्या प्रसंगाना 'मेलोड्रामॅटिक' करण्याच्या मोहात अजिबात पडलेला नाही.
तर ' युद्ध ' हाच या कादंबरीचा नायक आहे. युद्ध म्हणजे महायुद्ध की ज्याने मराठी ध्वजाची, साम्राज्याची रयाच पालटली. मराठी साम्राज्याला प्रचंड हादरा बसला. खजिना रिता झाला. " अनेक मोत्ये गळाली " व अहमदशहा अब्दालीच्या अचाट सामर्थ्याची कल्पना नसताना लढाईस उभ्या असलेल्या मराठी सैन्याची दैना उडाली. इथून परत जाताना अहमदशहा अब्दालीने प्रचंड लूट तर नेलीच पण त्याने जाताना–थोडी थोडकी नाही तर बावीस हजार बायका, मुले गुलाम म्हणून अफगाणिस्तानात नेली. बहुसंख्येने ती सर्व मराठी सरदार–शिलेदारांची बायका मुलेच होती. खुद्द नाना फडणविसांची आई पानिपतावर नाहीशी झाली होती व जंगजंग पछाडूनही तिचा शेवटपर्यंत शोध लावता आला नाही. याचे शल्य नाना फडणविसांना सदोदित होते.

इतिहासाला नावेही माहित नाहीत अशा बावीस हजार जीवांची पानिपत रणांगणावर शोकांतिका झाली होती नऊवारी टोपदरी लुगडी, नथ, बुगड्या घालणाऱ्या त्या स्त्रिया दहा रुपयास एक या भावाने गुलाम म्हणून विकल्या गेल्यावर अफगाणी पेशव इजार घालून उंच भिंतीच्या अफगाणी घरात ज्या घुसल्या त्या कायम विलीन झाल्या. या व अनेक भयानक, मन सुन्न करणाऱ्या पानिपत युद्धाच्या व पराभवाच्या दारुण सत्यघटनेवर ' पानिपत ' ही कादंबरी ठामपणे वाटचाल करत असते. जवळजवळ चाळीस पात्रे या कादंबरीत वावरत असतात. पण भाषेचा फुलोरा, भावनोत्कट प्रसंग, कपटनीती, कटनाट्य, युद्धनीती या सर्वांना सावरत ही कादंबरी पुन्हा " युद्ध " या नायकापाशीच पोचते. सूत्र सोडत नाही.

या कादंबरीचा विषयच आहे ' युद्ध. ' दोन महाभयानक महायुद्धाच्या भीषण सावलीतून आपण गेलो आहोत. पण त्यापूर्वीही एक भीषण युद्ध ज्याच्या अपयशाचे परिणाम मराठी मातीने अनुभवले आहेत. ज्यांचे आर्त चित्कार आजही 'पानिपचा पराभव' इतिहासात शिकताना आपण कोवळ्या शाळकरी वयात अनुभवलेला आहेच, पण आता समज आलेल्या वयात पुन्हा ते पानिपतचे शल्य एकवार मनावर आघात करून जाते. या अपयशाचे खापर नेहमीच सदाशिवरावभाऊ यांच्यावर फोडले गेले आहे. पण कोणत्याही युद्धाच्या आरंभाचे अगर परिणामाचे कारण कुणी एक व्यक्ती असूच शकत नाही, तर त्यामागे अनेक स्फुल्लिंगाची बीजे फार पूर्वीपासूनच रूजून गेलेली असतात. अनेक कारणांनी संघर्षाची ठिणगी पडत जात–जात अखेर वणवा भडकतो. तर अशा अनेक सामाजिक, राजकीय, मानसशास्त्रीय व नैसर्गिक कारणांचा शोध घेत " पानिपत "चा शोध सुरू झालेला आहे व चाळीसच्या वर व्यक्तिरेखा, काळाचे भान राखून पण मूळ तात्त्विक पातळीवरून अनेक तपशील, बारकावे, नकाशे, आकडे हे सारं सांभाळून सुद्धा पानिपत केवळ युद्धाचा आराखडा मांडणारी कंटाळवाणी ऐतिहासिक कादंबरी न रहाता एक भव्य पट उलगडत, पण शेवटी शून्यमनस्क करणारी शोकान्तिका ठरते. यात तिचे वेगळेपण व यशाचा उच्चांक आहे.

वाङ्मय दप्तरातील कागदपत्रांचा अभ्यास, इतिहास संशोधक मंडळाची मदत एवढ्यावरच विश्वास पाटील विसंबले नाहीत, तर पानिपतच्या युद्धभूमीवर सतत दोन महिने ते वणवण भटकले. तिथल्या गावांना भेटी दिल्या. भौगोलिक परिस्थिती समजावून घेतली. जवळ जवळ चार वर्षे अभ्यास केल्यानंतरच त्यांनी कादंबरी लेखनास सुरुवात केली. नोकरीचा व्याप सांभाळून (तो सुद्धा महसूल विभाग) दररोज पहाटे साडेतीन ते सात पर्यंत लेखन केले. व अशा कष्ट साधनेचे फळ त्यांना 'प्रियदर्शिनी' च्या बहुमानाने मिळाले आहे. मराठी साहित्यात एका चिंतनशील व वेगळ्या दिशेने जाणाऱ्या, ताज्या दमाच्या कादंबरीची व लेखकाचीही भर पडली आहे.

केवळ 'प्रियदर्शनी' मुळे 'पानिपत' मोठी ठरत नाही. पारितोषिके मिळणे न मिळणे यावर काहीच अवलंबून नसते. कधी-कधी पारितोषिके खिरापतीसारखी वाटली जातात, तर कधी ती योजनापूर्वक दिली जातात. तशीच पात्रता असूनही नाकारली जातात. जातीजमातींना डोळ्यासमोर ठेवूनही पारितोषिके दिली जातात. म्हणूनच पारितोषिकाने साहित्याची गुणवत्ता ठरत नाही, तर साहित्याचे खरे मूल्यमापन हा वाचक करत असतो. या पार्श्वभूमीवर 'पानिपत' कादंबरीने मराठी साहित्याला एक वेगळे वळण लावले आहे असे म्हणावेसे वाटते.

**माधुरी गोरे**
बारावी/कला

● ● ●

# डॉ. जयंत नारळीकर

**वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रात हिंदीचा प्रसार केल्याबद्दल डॉ. जयंत नारळीकर यांना आत्माराम पुरस्कार मिळाला.**

सुप्रसिद्ध खगोलतज्ज्ञ व गणिततज्ज्ञ जयंत नारळीकर यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे रँग्लर असून ते बनारस हिंदू विद्यापीठात व पुणे विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते. १९५७ साली जयंत नारळीकर यांनी बनारस हिंदू विद्यापीठाची बी. एस्सी. पदवी मिळविली. १९५७ मध्ये त्यांना केंब्रिज येथील उच्च शिक्षणासाठी जे. एन्. टाटा शिष्यवृत्ती मिळाली. ते केंब्रिज विद्यापीठातील गणितामधील ट्रायपॉस ही परीक्षा उत्तीर्ण झाले. १९५९ साली ते रँग्लर झाले. त्यांनी केंब्रिज विद्यापीठामधून बी. ए., एम्. ए. पीएच्. डी. आणि डी. एस्सी. या पदव्या संपादन केल्या. १९६०–६१ मध्ये त्यांना डब्ल्यू. ए. मीक शिष्यवृत्ती मिळाली.

नारळीकर हे १९६३ पासून रॉयल अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे आणि केंब्रिज फिलॉसॉफिकल सोसायटीचे फेलो आहेत. ते १९६२–६३ मध्ये फिट्झ विल्यम हाऊस, केंब्रिज येथे बेरी–रॅम्से फेलो आणि वरिष्ठ संशोधक फेलो होते. १९६७–७२ मध्ये ते केंब्रिज विद्यापीठातील इन्स्टिटयूट ऑफ थिअॉरेटिकल अॅस्ट्रॉनॉमी या संस्थेच्या अध्यापन व संशोधन वर्गाचे सदस्य होते. १९७३–७५ या काळात ते जवाहरलाल फेलो होते. १९७४ पासून ते इंडियन अॅकॅडेमी ऑफ सायन्सचे फेलो आहेत. १९७६ साली 'इंडियन नॅशनल सायन्स अॅकॅडेमी' ने फेलोशिप देऊन त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. ऑक्टोबर १९७२ पासून ते टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई येथे खगोलीय भौतिकीचे प्राध्यापक म्हणून कार्य करीत आहेत.

फ्रेड हॉईल, एच बाँडी व टी. गोल्ड यांनी पूर्वी मांडलेल्या विश्वोत्पत्तिशास्त्रातील स्थिर अवस्था उपपत्तीच्या संदर्भात नारळीकरांनी संशोधन केले. हॉईल व नारळीकर यांनी विश्वातील द्रव्याच्या निर्मितीसंबंधी गणितीय विवरण केलेले होते. याकरिता त्यांनी ऋणात्मक ऊर्जेची संकल्पना उपयोगात आणली. गुरुत्वामुळे एखाद्या वस्तूच्या शीघ्रतेने होणाऱ्या आकुंचनाला गुरुत्वीय अपवाद म्हणतात. हॉईल व नारळीकर यांनी हा अपवाद ऋणात्मक ऊर्जेची शक्ती वापरून थांबवता येतो असे दाखविले. तथापि, गुरुत्वाकर्षणातील ऋणात्मक ऊर्जेला तोंड देणारी दुसरी ऋणात्मक शक्ती हॉइल–नारळीकर यांनी तर्क केल्याप्रमाणे असेल काय, हा अद्यापि न सुटलेला प्रश्न आहे.

हॉईल व नारळीकर यांनी २१ जून १९६४ रोजी लंडनच्या रॉयल सोसायटीपुढे गुरुत्वाकर्षणाचा एक नवा सिद्धांत मांडला. त्यात अर्न्स्ट माख यांच्या तत्वाला गणितीय रूप देऊन आइन्स्टाइन यांच्या गुरुत्वाकर्षणाशी त्याची सांगड घालून देण्यात आली. जडत्व हा वस्तुचा भौतिक गुणधर्म नसून त्याचा विश्वरचनेशी संबंध आहे, असे या सिद्धांतात प्रतिपादन करण्यात आले.

नारळीकर आणि त्यांचे सहकारी के. एम्. व्ही. अप्पाराव यांनी विश्वामध्ये कृष्ण विवरांप्रमाणे श्वेत विवरे अस्तित्वात आहेत आणि प्रत्यक्षात ती विवरे नसून द्रव आणि ऊर्जा यांची उगमस्थाने आहेत, असे मत प्रतिपादन केले.

केंब्रिज विद्यापीठाने नारळीकर यांना ज्योतिष्यशास्त्रातील टायसन पदक, स्मिथ पारितोषिक आणि ॲडम्स पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला. १९६५ साली भारत सरकारने त्यांना ' पद्मभूषण ' हा किताब दिला. १९७३ मध्ये मुंबईमधील इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने त्यांना सुवर्ण पदक दिले.

नारळीकर यांनी आर. जे. टेलर, डब्ल्यू. डेव्हिडसन, एन. ए. वझरमन यांच्या समवेत 'ॲस्ट्रोफिजिक्स' आणि फ्रेड हॉईल यांच्या समवेत 'ॲक्शन ॲट अ डिस्टन्स इन फिजिक्स ॲंड कॉस्मॉलॉजी' हे ग्रंथ लिहिले.' तसेच स्ट्रक्चर ऑफ द युनिव्हर्स हा त्यांचा ग्रंथही प्रसिद्ध झाला आहे. खगोलीय, भौतिकी, गुरूत्वाकर्षण, विश्वोत्पत्तिशास्त्र इ. विषयांवरील त्यांचे ७० हून अधिक संशोधनात्मक निबंध आणि लेख प्रसिद्ध झालेले आहेत. याखेरीज त्यांनी काही विज्ञान कथा लिहिलेल्या असून वैज्ञानिक विषयांवर सुलभ भाषेत व्याख्याने देण्यासंबंधी त्यांची ख्याती आहे.

**राजश्री वेलणकर**
बारावी/विज्ञान

● ● ●

# युगपुरुष–पं. नेहरु

**मृणाल काळे**
अकरावी / कला (अ)

१४ नोव्हेंबर १९८९ रोजी मोतीलाल नेहरू यांना पुत्र रत्नाचा लाभ झाला. दैवी प्रसादाने प्राप्त झालेल्या त्या दिव्य तेजाच्या, नवजात बाळाला पाहून माता–पिता आनंदाने बेहोष होऊन गेले. त्याच्या आयुष्याच्या जीवनपत्रिकेत जवाहर एक युगपुरुष होईल हे रेखाटले होते आणि ते शेवटी खरे ठरले. भारत मातेच्या दिव्य मुकुटातील एक तेजस्वी हिरा म्हणजेच जवाहर !आणि जवाहर म्हणजेच युगपुरुष नेहरु होय.

शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे बाल जवाहर हळूहळू वाढत होता. आपला पुत्र जगात श्रेष्ठ व्हावा अशी मोतीलालजींची इच्छा होती.म्हणून त्यांना इंग्रजी शिक्षण दिले, हिंदु धर्मातील रामायण–महाभारत या ग्रंथांचाही परिचय घडविला. आपल्या राहत्या आनंदभवनात सर्व सोयी उपलब्ध करून त्यांनी बाल जवाहरचे शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि व्यवहारिक यासारखे शिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू अधिक तेजोमय केले.

उच्च शिक्षणासाठी जवाहरलालना इंग्लंडमधील हॅरो पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश मिळाला. त्या कालावधीत त्यांचे वाचन खूप वाढले. रूसो, जपानी लढा, इटालीचा स्वातंत्र्यवीर गॅरिबाल्डी, हिंदूस्थानातील मवाळ आणि जहाल पुढाऱ्यांचे स्वातंत्र्यासाठी प्रयत्न वगैरे गोष्टी जवाहरने मनःपूर्वक अभ्यासल्यामुळे त्याच्या मनाची

उत्कृष्ट जडणघडण झाली. दोन वर्षे हॅरोच्या महाविद्यालयात राहिल्यावर जवाहरने केंब्रिज येथील कॉलेजात प्रवेश घेतला. विविध शाखांचा अभ्यास करून १९१० मध्ये जवाहर बी. ए. झाले. त्या काळातही त्यांच्या मनात राष्ट्राबद्दल तळमळ निर्माण होऊन राष्ट्राबद्दलची जागृती निर्माण झाली. ते हळूहळू जहाल मताचे बनले.

मोतीलालजींची इच्छा होती, जवाहरने ' आय. सी. एस.' होऊन हिंदुस्थानात एक मोठा सरकारी अधिकारी म्हणून यावे. पण जवाहर बनले बॅरिस्टर ! त्यांनी अलाहाबाद येथील कोर्टात वकिली सुरू केली. पण वकिली व्यवसायात त्यांचे मन रमेना, म्हणून सरकारी नोकरीतील त्यांचे लक्ष कमी कमी होऊ लागले व नकळत ते राजकारणात ओढले जाऊ लागले. काँग्रेसच्या बैठकांना हजर राहू लागले. अधूनमधून त्यांचा अभ्यास चालू होता. साहित्याची त्यांना तीव्र आवड होती. त्यामुळेच त्यांनी १९१४ मध्ये एम्. ए. ची पदवी संपादन केली.

जवाहर सत्ताविस वर्षाचे असताना इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी विविध पुस्तकाचे खूप वाचन केले. त्यामुळे देशसेवेची तळमळ अधिकच तीव्र झाली. परक्याच्या ताब्यात असलेल्या भारतीय लोकांची चाललेली दयनीय अवस्था ऐकून जवाहरना संताप येई. आपला भारत संपूर्ण स्वतंत्र झाल्याशिवाय आपणास सूख मिळणार नाही अशी त्यांची मनोमन खात्री झाली आणि म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय राजकारणात उडी घेतली.

देशाच्या हितासाठी त्यांनी राजकारणात घेतलेली उडी युगपुरुष होण्यास सार्थ ठरली. तेथूनच ते राजकारणी बनले. अलाहाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी लोकांचे आरोग्य, शिक्षण आणि नागरी जीवन सुधारण्यास प्रारंभ केला. काँग्रेस सेवा दलाचे कार्य त्यांनी उत्साहाने केले. सायमन कमिशनला विरोध करून दाखविल्यामुळे त्यांना बेदम लाठीमार सहन करावा लागला. प्रतापगड व रायबरेली येथील सहकारी चळवळीत त्यांनी भाग घेतल्यामुळे इंग्रज सरकारने त्यांचा छळ सुरू केला. मिठाच्या सत्याग्रहाच्यावेळी सरकारने त्यांना तुरुंगात डांबले. ९ ऑगस्ट १९४२ ते २४ मार्च १९४५ पर्यंत जवाहर अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध होते. त्या कालावधीत त्यांनी विविधतेत ऐक्य साधणारा व भारताचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारा ' डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' हा महान ग्रंथ लिहिला. या त्यांच्या ग्रंथाला भारतीय जनतेने दाद देऊन त्यांचे कौतुक केले.

स्वातंत्र्य मिळावे म्हणून त्यांनी इंग्रज सरकार विरूद्ध बंड पुकारले.
१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. जवाहरलालना ओतप्रोत आनंद झाला. जीवनातील एक स्वप्न साकार झाले. त्यांनी केलेले प्रयत्न फळाला आले आणि त्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री होण्याचा मान जवाहरना मिळाला आणि त्यांच्याच पवित्र, यशस्वी हाताने भारताचा पहिला राष्ट्रध्वज दिल्लीच्या लाल किल्ल्यावर प्रथम फडकविला गेला.

पं. जवाहरलाल नेहरूंचे राजकीय जीवन अथांग जनसागराच्या उसळत्या लाटावर स्वार होऊन डौलाने सफर करणाऱ्या नौकेसारखे होते. नेहरू म्हणजे अलोट गर्दी, नेहरू म्हणजे मिनिटागणिक टाळ्यांचा प्रचंड कडकडाट, नेहरु म्हणजे लाखो कंठातून निनादणारा गगनभेदी जयजयकार असे जणू समीकरणच झाले होते. स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय जनतेचे जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे हे सत्य वरिष्ठ नेत्यांना नेहरूंनी पहिल्या प्रथम सांगितले. साऱ्या जगाबद्दल त्यांना आपलेपणा वाटे. भारताला त्यांनी मिळवून दिलेले स्वातंत्र्य म्हणजेच भारतातील मानवतेला त्यानी दिलेली एक महान देणगीच होय! भारतात लोकशाही समाजवादाचे मंदिर बांधण्यासाठी त्यांनी आपली उभी हयात खर्च केली. भारताच्या स्वातंत्र्यसंघर्षात त्यांनी जो क्रांतिकारक भाग घेतला तो इतिहास कधीही विसरला जाणार नाही. महायुद्धासारखी संकटे जगातून नष्ट व्हावीत यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले. महात्मा गांधीजीप्रमाणेच शांततेचा संदेश त्यांनी जगातील मानवजातीला दिला. " युद्धमुक्त जग " हेच त्यांचे चिरंतन स्मारक होय ! हे ध्येय साकार करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. साम्राज्यवादाचे ते कट्टर दुष्मन होते. साऱ्या आशिया खंडात राजकीय जनजागृतीचे नेहरु प्रतीक होऊन

बसले होते. आधुनिक जगातील वैचारिक संघर्षाचे ते ऊर्जस्वल सुवर्णमध्य होते.

जन्माने ते भारतीय होते तर शिक्षणाने ते पाश्चात्य होते. प्राचीन भारताच्या संस्कारांनी त्यांचे मन प्रभावित झाले असले तरी वृत्तीने ते आधुनिक होते. आंतरराष्ट्रीय दृष्टीने ते कट्टर राष्ट्रवादी, देशभक्त होते. उदारमतवाद, मानवतावाद ह्यांचा त्यांच्यामध्ये " समभाव संयोग " झाला असल्याने नवभारताच्या आशा-आकांक्षांचे ते एक श्रद्धास्थान होऊन बसले होते. भारताच्या तटस्थवादी परराष्ट्रीय धोरणांचे जवाहर एकमेव शिल्पकार होते. देशाच्या योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे ते जनक होते. राष्ट्र विकासाच्या पंचवार्षिक योजना अंमलात आणताना संकटाचे अनेक डोंगर आडवे आले तरी डोंगराचे शिखर गाठण्याची " तेनसिंगाची " हिंमत आणि निर्धार त्यांनी कधीच सोडला नाही.

नेहरूंच्या आचार विचारात अनेकदा कठोर, वास्तववादी व व्यवहारवृत्तीपेक्षा स्वप्नाळू आणि काव्यमय कल्पनांची भरारी आढळत असे. ते ज्वलंत राष्ट्रवादी होते हे सांगायलाच नको. साम्राज्यवाद नष्ट होऊन अखिल मानवजात स्वतंत्र झाली पाहिजे असे त्यांना उत्कंठतेने वाटे. बुद्धी आणि भावना यांचा समावेश त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये स्वभावतःच व्यापलेला होता. त्याचे प्रतिबिंब स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय धोरणामध्ये आज उमटलेले दिसते. प्राचीन भारताला आधुनिक विज्ञानाचा दृष्टिकोन त्यांनीच प्रथम दिला. ते खऱ्या अर्थाने शांतीदूत होते. नेहरूंनी जगातील सर्व राष्ट्रांना भेटी देऊन त्यांना आपले मित्र बनवले. खऱ्या शांतीसुखाचा संदेश सांगणारे नेहरू एक महान नेते होते. म्हणूनच सारे जग त्यांच्याकडे आदराने पहात असे. देवदूताप्रमाणे तेजस्वी आणि मानवकल्याणासाठी तळमळीने कार्य करणारा जवाहर भारताचा शांतीदूत ठरला. भारतीय जनतेने ' भारतरत्न' आणि 'पंडित' असे दोन मौलिक किताब देऊन त्यांचा गौरव केला.

अफाट लोकप्रियता लाभलेला भाग्यवान युगपुरूष, जनगणमन अधिनायक असा भारतभाग्यविधाता, सत्य अहिंसा, शांती, प्रगती यांचा निस्सिम भक्त, लोकशाही समाजवादाचा कट्टर पुरस्कर्ता, ज्ञानविज्ञान तत्वज्ञानाची आवड असणारा रसिक नेता, लोककल्याणासाठी अहर्निश तळमळणारा, कष्टणारा शूर, खंबीर, विचारी आणि द्रष्टा पुढारी, नवचैतन्यांचा निष्ठावान केंद्रबिंदू, नवभारताचा अभिनव शिल्पकार, दीन दलितांचा प्रेमळ पाठीराखा, मानवतेचा पुजारी, जगाचा मार्गदर्शक, दीपस्तंभ, पूर्व पश्चिमेचा पूल, जगातील थोर मुत्सद्दी, भारतमातेच्या कंठातील कोहिनूर, जनतेच्या हृदयसिंहासनावरील सम्राट, त्यागाचे महान प्रतीक, जगाचा नवा इतिहास घडविणारा हा थोर युगपुरूषच होता.

● ● ●

## भेसळ : एक समस्या

**पुष्पलता महाजन**
अकरावी / विज्ञान

न्याहरी चालली आहे वाटतं ? पण काय हो, तुम्ही नक्की कशावर ताव मारताय ते माहित आहे का ? तुम्ही जो कुरकुरीत टोस्ट खाता आहात, त्याला जे बटर लावले आहे, त्यामध्ये चहाबरोबरच भाजलेल्या डाळी, तुरडाळीची सालं व आयर्न सल्फेट या सर्वांचे मिश्रण आहे. त्या पेयामधील साखरेमध्ये खाण्याचा सोडा, स्टार्च व गोंद मिसळलेला आहे. अंड्यावर जी मिरपुड टाकलेली आहे, ती सुद्धा शुद्ध स्वरूपात असेल

# कविता

## जीवनस्वप्ने

गहन जीवनातल्या मार्गावर
कोणाचीही सोबत नसताना
गुंफीत जाती कल्पनांची शृंखला
आणि स्वप्नांचा एकेक मणी.

ठाऊक आहे का जीवन म्हणजे ?
' स्वप्न ' म्हणजेच जीवन आहे
स्वप्न नसते तर
बुडला असता सारा संसार

पंखांच्या बळावर भरारी घेतात पक्षी
वाऱ्याच्या झोतामुळे झुलतात ढग
स्वप्ने आहेत म्हणूनच आज सारे
हासत हासत पुढे येत आहे जग

स्वप्न होते म्हणून वेडी माणसे
देशासाठी, झुंजले, लढले
स्वप्न होते म्हणूनच तर
शिवप्रताप, रामायण, महाभारत घडले.

स्वप्नांच्या दुनियेपासून
दूर कसे रहावे ?
जीवंतपणी मृत्युच्या यातना भोगून
सांगा कसे जीवन जगावे ?
स्वप्नें आणि जीवन यांचा
संगम होवून बनतो ' माणूस '
जीवन तारेवर स्वप्नाच्या काठीसह
करतो कसरत ' आंधळा माणूस. '
स्वप्ने व जीवनाच्या संगमातून
निर्माण झालेला ' माणूस ' आशेच्या किरणांवर
घालवीत असतो आपले ' आयुष्य '!

**मनोहर इंदुलकर**
बारावी / कला (ब)

## रजनी

झंकारित झंकार आली रजनी
उधळित गगनी सप्तरंग अन् पावित्र्याची धुनी ॥धृ॥

थवे खगांचे घेत भरारी
परतती अपुल्या देशी
जणू भ्रमर नाचती या निळ्या निळ्या-गगनी ॥१॥

घेऊनी सोबत चमकत्या सया
पसरूनी गगनी मोहमाया
किरण चंदेरी चंद्राचे, उधळले नील तारांगणी ॥२॥

सुगंध घेऊन रातराणी
फुलली धुंद या क्षणी
रजनीने पसरली अद्‌भूत धुंद अशी मोहिनी ॥३॥

**मृणाल काळे**
अकरावी / कला

बसले होते. आधुनिक जगातील वैचारिक संघर्षाचे ते ऊर्जस्वल सुवर्णमध्य होते.

जन्माने ते भारतीय होते तर शिक्षणाने ते पाश्चात्य होते. प्राचीन भारताच्या संस्कारांनी त्यांचे मन प्रभावित झाले असले तरी वृत्तीने ते आधुनिक होते. आंतरराष्ट्रीय दृष्टीने ते कट्टर राष्ट्रवादी, देशभक्त होते. उदारमतवाद, मानवतावाद ह्यांचा त्यांच्यामध्ये " समभाव संयोग " झाला असल्याने नवभारताच्या आशा-आकांक्षांचे ते एक श्रद्धास्थान होऊन बसले होते. भारताच्या तटस्थवादी परराष्ट्रीय धोरणांचे जवाहर एकमेव शिल्पकार होते. देशाच्या योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे ते जनक होते. राष्ट्र विकासाच्या पंचवार्षिक योजना अंमलात आणताना संकटाचे अनेक डोंगर आडवे आले तरी डोंगराचे शिखर गाठण्याची " तेनसिंगाची " हिंमत आणि निर्धार त्यांनी कधीच सोडला नाही.

नेहरूंच्या आचार विचारात अनेकदा कठोर, वास्तववादी व व्यवहारवृत्तीपेक्षा स्वप्नाळू आणि काव्यमय कल्पनांची भरारी आढळत असे. ते ज्वलंत राष्ट्रवादी होते हे सांगायलाच नको. साम्राज्यवाद नष्ट होऊन अखिल मानवजात स्वतंत्र झाली पाहिजे असे त्यांना उत्कंठतेने वाटे. बुद्धी आणि भावना यांचा समावेश त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये स्वभावतःच व्यापलेला होता. त्याचे प्रतिबिंब स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय धोरणामध्ये आज उमटलेले दिसते. प्राचीन भारताला आधुनिक विज्ञानाचा दृष्टिकोन त्यांनीच प्रथम दिला. ते खऱ्या अर्थाने शांतीदूत होते. नेहरूंनी जगातील सर्व राष्ट्रांना भेटी देऊन त्यांना आपले मित्र बनवले. खऱ्या शांतीसुखाचा संदेश सांगणारे नेहरू एक महान नेते होते. म्हणूनच सारे जग त्यांच्याकडे आदराने पहात असे. देवदूताप्रमाणे तेजस्वी आणि मानवकल्याणासाठी तळमळीने कार्य करणारा जवाहर भारताचा शांतीदूत ठरला. भारतीय जनतेने ' भारतरत्न' आणि 'पंडित' असे दोन मौलिक किताब देऊन त्यांचा गौरव केला.

अफाट लोकप्रियता लाभलेला भाग्यवान युगपुरूष, जनगणमन अधिनायक असा भारतभाग्यविधाता, सत्य अहिंसा, शांती, प्रगती यांचा निस्सिम भक्त, लोकशाही समाजवादाचा कट्टर पुरस्कर्ता, ज्ञानविज्ञान तत्वज्ञानाची आवड असणारा रसिक नेता, लोककल्याणासाठी अहर्निश तळमळणारा, कष्टणारा शूर, खंबीर, विचारी आणि द्रष्टा पुढारी, नवचैतन्यांचा निष्ठावान केंद्रबिंदू, नवभारताचा अभिनव शिल्पकार, दीन दलितांचा प्रेमळ पाठीराखा, मानवतेचा पुजारी, जगाचा मार्गदर्शक, दीपस्तंभ, पूर्व पश्चिमेचा पूल, जगातील थोर मुत्सद्दी, भारतमातेच्या कंठातील कोहिनूर, जनतेच्या हृदयसिंहासनावरील सम्राट, त्यागाचे महान प्रतीक, जगाचा नवा इतिहास घडविणारा हा थोर युगपुरूषच होता.

● ● ●

# भेसळ : एक समस्या

**पुष्पलता महाजन**
अकरावी / विज्ञान

न्याहरी चालली आहे वाटतं ? पण काय हो, तुम्ही नक्की कशावर ताव मारताय ते माहित आहे का ? तुम्ही जो कुरकुरीत टोस्ट खाता आहात, त्याला जे बटर लावले आहे, त्यामध्ये चहाबरोबरच भाजलेल्या डाळी, तुरडाळीची सालं व आयर्न सल्फेट या सर्वांचे मिश्रण आहे. त्या पेयामधील साखरेमध्ये खाण्याचा सोडा, स्टार्च व गोंद मिसळलेला आहे. अंड्यावर जी मिरपूड टाकलेली आहे, ती सुद्धा शुद्ध स्वरूपात असेल

याची गॅरेंटी नाही. कारण मिरपुडीमध्येही पपईच्या बियांचे मिश्रण असू शकेल.

अशा प्रकारे वाळू, भूसा व माती ह्यांची भेसळ केलेला आहार तुम्ही-आम्ही सदैव घेत असतो. भेसळीचे दोन प्रकार आहेत. अन्नामध्ये किंवा खाण्याच्या जिनसांमध्ये एखादा त्यासारख्या पदार्थ घालून जशी भेसळ होऊ शकते, त्याचप्रमाणे एखादा पदार्थ काढून घेऊनही करता येते. उदा. दुधामधील साय किंवा स्निग्ध पदार्थ काढून ते विकणे हा दुधवाल्या व्यापाऱ्यांचा नित्याचाच उद्योग आहे. भेसळीसाठी वापरण्यात येणारा प्रत्येक पदार्थ आपल्याला अपायकारक ठरेल असे समजणे बरोबर नाही उदा. ' ब्रू ' ह्या कॉफीमध्ये कॉफीच्या बियांबरोबरच चिकोरीच्या बियांची पूडही घातलेली असते. दुधामध्ये जर शुद्ध पाणी मिसळले तर तेही अपायकारक नाही. अर्थात पाणी घातल्यामुळे दुधाची पोषकता मात्र बरीच कमी होते. कमी प्रतीच्या मालाला चांगल्या मालाचे लेबल अडकवणे ही सुद्धा भेसळीची एक महत्वाची खुबी आहे. बहुतेक वेळेला भेसळीचे पदार्थ अत्यंत स्वस्त व मुबलक प्रमाणात मिळणारे असतात. तसेच हे पदार्थ सहजासहजी ओळखताही येत नाहीत. पदार्थ जितका दुर्मिळ, तितके भेसळीचे प्रमाण अधिक सुगंधी अशा केशरामध्ये तर बऱ्याच वेळेला गव्हाचे पीठ, डींक व पावडर यांना रंग देऊन बेमालुमपणे मिसळलेले असते. हिंगामध्ये रेसीन व गोंद यांची भेसळ करतात. उपहारगृहात आपण जो तयार चहा घेतो त्यामध्ये तर सॅकरीन, कोळशाची पूड इ. ची भेसळ केलेली असते. तसेच तयार सरबतामध्ये सॅकरीन, उल्सीन व सोडियम सायक्लोमेट ह्यांची भेसळ करण्यात येते. चहामध्ये भाजलेल्या चण्याच्या डाळीचे किंवा तूरडाळीच्या सालाचे तुकडे व आयर्न सल्फेट मिसळलेले असते. कॉफीमध्ये चिंचेच्या बियांचे मिश्रण केलेले असते. तर साखरेमध्ये स्टार्च, डींक व खाण्याचा सोडा अशी भेसळ केली जाते.

भेसळ आता एवढी व्यापक झाली आहे की, पानपट्टीही तिच्या तावडीतून सुटलेली नाही. पानाच्या मसाल्यामध्ये कागदाचे गव्हाच्या पिठाने रंगवलेले तुकडे, गोंद पावडर, परवानगी नसलेले रंग व सुवास टाकण्यात येतात. सुपारीमध्ये तर माती, लाकडाचे तुकडे व लोखंडाचे तुकडेही आढळून येतात.

लोणी व तूप यामध्ये प्राण्यांची चरबी किंवा वनस्पती तूप मिसळतात. अर्थात अशी भेसळ ओळखून काढायला सुसज्ज प्रयोगशाळेची जरूरी असते. वनस्पती तूप मिसळलेले असल्यास, ते शोधायला लोण्यामध्ये किंवा तुपामध्ये सम प्रमाणात हायड्रोक्लोरीक आम्ल घालण्यात येते. मग त्यामध्ये फुरफुरेल व अल्कोहोल घालतात. जर पाच मिनिटांनंतर हे मिश्रण गुलाबी झाले तर तुपामध्ये वनस्पती तूप मिसळलेले आहे असे समजावे. जेव्हा आपण मसाल्याकडे वळतो तेव्हा तर भेसळ जादा व अस्सल माल कमी असा मामला असतो. मिरी, लवंगा व वेलची ह्याऐवजी बऱ्याच वेळेला आपल्याला पपईच्या बियाच विकत घ्याव्या लागतात. त्या चवदार लागतात ही गोष्ट वेगळी. तिखटामध्ये मिरचीच्या पुडीबरोबरच मीठ, भुसा, वाळू, तांदळाचे व गव्हाचे पीठ बेमालूमपणे मिसळलेले असते. जर रंगात फरक वाटला तर लाल रंग देण्याची व्यवस्थाही करण्यात येते. काळ्या जिऱ्यामध्ये बऱ्याच वेळेला कोळशाची भुकटी मिसळतात, तर हळदीमध्ये लेड क्रोमेट व मेटॅनील यलो यांचे मिश्रण केलेले असते.

काही भेसळी अगदी भयानक असतात. अन्नपदार्थांचा खप वाढविण्यासाठी त्यात नानाविध रंग घालतात. तर कधी कधी टाकाऊ पदार्थही रंग देवून आकर्षक बनवून विकले जातात. हलक्या प्रतीचे, कीड लागलेले पदार्थही आकर्षक रंग देवून व सुबकरित्या पॅक करून विकण्यात येतात बऱ्याच वेळेला हे रंग खायचे नसून अपायकारकही असतात. शिवाय अशा 'मेटॅनिल यलो' सारख्या प्राणघातक रंगाला बंदी घालण्यात आलेली आहे. ह्रा रंग जर मिठाईमध्ये वापरण्यात आला असेल तर अत्यंत हानिकारक ठरेल. अशा मिठाईमध्ये हायड्रोक्लोरिक आम्ल टाकले असता ती लालसर बनते. अशा तऱ्हेने भेसळ ओळखता येते. भेसळीमुळे होणारे नुकसान मंदगतीने होते. अर्थात लहान मुलांच्या व तरुणांच्या शरीराची जी हानी होते ती मात्र कधीही भरून निघणारी नसते. शिवाय दम लागणे, वाढ खुंटणे या समस्या उद्भवतात.

कधी कधी मात्र भेसळीचे स्वरूप महाभयंकर रुद्रावतार धारण करते. विमानात वंगण म्हणून वालावयाचे तेल जर खायच्या तेलामध्ये घातले तर खाणाऱ्याला पक्षाघाताचा (अर्धांगवायू) तडाखा बसतो. १९६० साली अशा भेसळीमुळे मोरोक्कोमधील १०,००० लोकांना अर्धांगवायू झाला. अफूचे तेल मोहरीच्या तेलामध्ये मिसळल्यास कमालीची गुंगी येऊ शकते.

चहासारख्या पदार्थातील भेसळ ओळखणे गृहिणींना सहज शक्य आहे. पांढऱ्या ओलसर टीपकागदावर पिवळट, लालसर रंगाचे डाग पडले तर चहा भेसळयुक्त समजावा. परंतु इतर बहुतेक पदार्थांतील भेसळ शोधून काढण्यासाठी प्रयोगशाळेतील तंत्राचाच वापर करावा लागतो.

१९५४ मध्ये ' प्रिव्हेन्शन ऑफ फूड ॲडल्टरेशन ॲक्ट' करण्यात आला. व १९५५ मध्ये त्या नियमात सुधारणा करण्यात आल्या त्या नियमांचे जर काटेकोरपणे पालन करण्यात आले तर भेसळीची समस्या बहुतांशी सुटू शकेल. काही नगरपालिका अन्नातील भेसळ शोधण्यासाठी ' फूड इन्स्पेक्टर्स' नेमतात. हे अधिकारी दुकानांतून किंवा उपहारगृहांतून अन्नपदार्थांचे नमुने गोळा करतात. मग ह्या नमुन्यांची प्रयोगशाळेमध्ये तज्ज्ञांकरवी छाननी होते. त्याचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतो. परंतु भेसळ करणाऱ्यांपैकी कांही जणांनाच न्यायालयात खेचले जाते व त्यांना होणारी शिक्षा तो कायदा हास्यास्पद ठरविण्याएवढी सौम्य असते.



काव्य हेच माझं पहिलं आणि अखेरचंही प्रेम आहे. सकाळी उठलेले पक्षी दिवसभर रानात, आकाशात संचार करीत असतात पण रात्रीच्या मुक्कामाला आपल्या ठराविक झाडावरच येतात. त्याप्रमाणे, मी पुन्हा पुन्हा काव्याकडेच वळलो आहे. मी कवितेसाठी जगलो नाही, कवितेनं मला जगवलं आहे.

साठ वर्षांपूर्वी सुरू झालेली माझी शब्दयात्रा आयुष्याच्या संध्याकालीही चालू आहे. कवितेने आपल्याला साथसोबत दिली याचा मला अभिमान व दिलासाही वाटतो. कविता माझ्याबरोबर चालत राहिली असं नाही तर सभोवारच्या घटनांतील अर्थ आणि सत्व शोधण्याचा तिनं प्रयत्न केला व माझ्या जगण्याला माझ्यापुरता विशेष अर्थही दिला.

**–कुसुमाग्रज**

# कविता

## जीवनस्वप्ने

गहन जीवनातल्या मार्गावर
कोणाचीही सोबत नसताना
गुंफीत जाती कल्पनांची शृंखला
आणि स्वप्नांचा एकेक मणी.

ठाऊक आहे का जीवन म्हणजे ?
' स्वप्न ' म्हणजेच जीवन आहे
स्वप्न नसते तर
बुडला असता सारा संसार

पंखांच्या बळावर भरारी घेतात पक्षी
वाऱ्याच्या झोतामुळे झुलतात ढग
स्वप्ने आहेत म्हणूनच आज सारे
हासत हासत पुढे येत आहे जग

स्वप्न होते म्हणून वेडी माणसे
देशासाठी, झुंजले, लढले
स्वप्न होते म्हणूनच तर
शिवप्रताप, रामायण, महाभारत घडले.

स्वप्नांच्या दुनियेपासून
दूर कसे रहावे ?
जीवंतपणी मृत्युच्या यातना भोगून
सांगा कसे जीवन जगावे ?
स्वप्नें आणि जीवन यांचा
संगम होवून बनतो ' माणूस '
जीवन तारेवर स्वप्नाच्या काठीसह
करतो कसरत ' आंधळा माणूस. '
स्वप्ने व जीवनाच्या संगमातून
निर्माण झालेला ' माणूस ' आशेच्या किरणांवर
घालवीत असतो आपले ' आयुष्य '!

**मनोहर इंदुलकर**
बारावी / कला (ब)

## रजनी

झंकारित झंकार आली रजनी
उधळित गगनी सप्तरंग अन् पावित्र्याची धुनी ।।धृ।।

थवे खगांचे घेत भरारी
परतती अपुल्या देशी
जणू भ्रमर नाचती या निळ्या निळ्या-गगनी ।।१।।

घेऊनी सोबत चमकत्या सया
पसरूनी गगनी मोहमाया
किरण चंदेरी चंद्राचे, उधळले नील तारांगणी ।।२।।

सुगंध घेऊन रातराणी
फुलली धुंद या क्षणी
रजनीने पसरली अद्भूत धुंद अशी मोहिनी ।।३।।

**मृणाल काळे**
अकरावी / कला

## जीवन

जीवन म्हणजे दुःख, त्यावर
विजय मिळवा,
जीवन म्हणजे संघर्ष, त्याचा
स्वीकार करा.
जीवन म्हणजे आव्हान, त्याला
सामोरे जा.
जीवन म्हणजे गूढ, ते
उकलण्याचा प्रयत्न करा.
जीवन म्हणजे शोकांतिका, त्याची
जाणीव ठेवा,
जीवन म्हणजे कर्तव्य, ते
पार पाडण्याचा प्रयत्न करा.

**शंकर पाटील**
बारावी / कला (अ)

## सुमला

सुमला लय मगे आकडाक लागला
कसा बग फलकायत चालता.
मेला शेंबूड फुशी फराकान
एवढा माझ्या नाकासारा होता.
तेका भेंढो खावची लय सवय होती
सारो दिस चिकट त्याचे व्हट.
आता व्हटाक कसली लाली लायता
मेला व्हटाचो चंबुच करता.
सुमल्याचे केस म्हणजे काय सांगा.
बोकडाची दाढी खूप बरी.
आता मगो आंबाडो घालता
वरती शेवत्याची फुला माळता
नाक नुसता थपाथपा गळता
नळो फुटान पाशिट गळता तसा.
आता मेल्यान चमकी घातल्यान
नाक कसा टेचान फुलयता.
दुसकाळात आसतात जसे म्हशीचे डोळे
तीच सुमल्याची होती दशा.
मेला बघतरी सुरमो घालता
डावो डोळो व्हयो तेव्हा लान करता
किती म्हणतस अकरा गेले पावसाळे,
हा हा इला माझ्या ध्यानात,
सुमला होता तेव्हा पाच वर्षांचा,
आता मेला आकडता झाला लग्नाचा.

**नितीन नाईक**
बारावी / वाणिज्य

## आशा

जो तो जगत असतो
आशा आकांक्षांची माळ
उराशी बाळगून
पण – – –
तीच माळ एखादेवेळी
अचानकपणे तुटली तर ?
किती दुःख होते !
कधीतरी या आशा
हृदयातच दडपाव्या लागतात
तर – – – कधी त्या
फुलांसारख्या कोमेजून जातात.
कदाचित समूळ नष्ट कराव्या लागतात
कारण – – –
तो दोष असतो परिस्थितीचा
त्याला नश्वर मानव तरी काय करणार ?

**प्रवीण पुरळकर**
अकरावी / विज्ञान

## वणवण

वणवण भटकतो मी फाटक्या पादत्राणाने
पण, कोण मला जवळ करीना मोठ्या आदराने
माणसासमोर माणुसकी केव्हाच विधवा झाली
त्याची झळ गरीबांना सोसावी का लागली ?
अराजकता निर्माण झाली, मूठभर बनले शक्तीशाली
आम्ही बापडे एकटे पडलो, कोण आम्हा तारील वाली;
छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत लाचारी हे हत्यार बनले
पोटापाण्याचे प्रश्न त्यांचे मात्र कायमचे सुटले
सज्जनांचे पारडे कमी झाले, दुर्जनांचे जड होत चालले
आणि पक्ष, नेत्यांमुळे गरीब लोक भरडून गेले
अशांतता–अराजकतेचे देशभर युद्ध पसरले आहे
भारत सोडून वेगळे खलिस्तान होत चालले आहे.

**आनंद कदम**
अकरावी / कला

## संध्या

मी बुडालो होतो जागेपणीतल्या
स्वप्नांच्या डोहात
ती आली नाजूक पावलांनी
गतदिनांची पुनरावृत्ती करीत
तिच्या वास्तवाची जाणीव होताच
सारी सृष्टी सप्तरंगानी न्हाऊन गेली.
नभात रंगपंचमी चालूच होती.
तिच्या आगमनाची चाहूल लागताच
मी सुद्धा माझ्या स्वप्नातून जागा झालो.
पण माझी स्वप्ने तिच्यामुळे
जास्तच उजळून निघाली.
तिच्या त्या हळुवार स्पर्शाची आणि
हर्षोत्कट मीलनाच्या अतिरम्य क्षणाची
आठवण माझ्या मनःचक्षूत कोरली आहे.
ती संध्या माझ्या हृदयातून कधीही
पुसली जाणार नाही,
अशी ती संध्या . . .

**प्रवीण पुरळकर**
**अकरावी / विज्ञान**

## प्रेमातूनी पाऊस धारा

घेतली वाहून होतीस, तूच माझी आसवे ।
अजून पान्हावले, गडे तुझे डोळे निळे ।।
घेतली मागून होतीस, तूच माझी पाउले ।
नकोस नाकारू आता तू, पाय माझे थांबले ।।
काय सांगू आता तुला, आभाळही भारावले ।
नकोस जाळू रवि माझा, सरळ किरण फाकले ।।
तूच आता दिलासा, कुणी जरी का हासले ।
तोड आता विचारधारा, पहा रम्य तेज फाकले ।।

**अनील धाडीगावकर**
**अकरावी / वाणिज्य**

# Shakespeare's Predecessors

pushpalata Mahajan
XI Science

It will be seen that special importance attaches historically to the work of those playwrights who, coming just before shekespeare, prepared the way for him by ensuring the triumph of that free and flexible form of drama which he was afterwards to make his own. In a loose sense, they constitute a group, and they are commonly known by the name of ' the university wits.' As this implies, they were all men of academic training, and had thus been brought into personal touch with the new learning, and had absorbed its spirit, at one or other of the two great institutions of scholarship. But, with one exception, they gave their talents to the public stage, and it is certain that the strongly pronounced taste of their audience had a good deal to do with the class of drama which they produced. Arranged roughly in order of time, they are :

JOHN LYLY ( 1554-1606).
THOMAS KYD ( 1557-95 ),
GEORGE PEELE (1558-97),
THOMAS LODGE ( 1558-I625),
ROBERT GREENE ( 1560-92),
CHRISTOPHER MARLOWE ( 1564-93),
and THOMAS NASH ( 1567-1601).

It would be of little use to give a mere catalogue of the dramatic works of these men, and a more detailed examination of there writings would be out of keeping with the design of this short sketch. We must think of them, therefore, mainly as a group, and must be satisfied with the general assertion that each contributed something to the evolution of the drama into the forms in which shakespeare was to take it up. Concerning two of them only, a few further details must be added, because of their special significance in literary history and of the direct influence which they exerted upon shakespeare himself. These are Lyly and marlowe.

Lyly is most widely known as the author of a prase romance entitled Euphues. His dramatic work consists of eight comedies, of which the best are Campaspe, Endymion and Gallathea. These were all written for performance at the court, and the interest in them depends not on plot, situation or even characterisation, but on language – that is, on the wit, point, ingenuity and grace of the dialogue. At a time when the humours of the public stage ran often into coarseness and horse-play, Lyly helped to give comedy an intellectual tone. In this, as well as in his skill in clever repartee and in his continual use of puns, conceits and all sorts of verbal fireworks, he anticipated shakespeare, whose early comedies, such as Love's Labour's Lost and A Midsummer Night's Dream, obviously owe much to his example. From Lyly shakespeare also learned how to combine courtly main plot with episodes of rustic blunders and

clownish fooling. In these things Lyly set a fashion which others, including Shakespeare. followed, and in comedy he was undeniably Shakespeare's first master,

MARLOWE'S historical importance is even greater. A man of fiery imagination and immense though ill-regulated powers, who lived a wild Bohemian life and while still young was killed in a drunken brawl, he was by nature for more of a lyric poet than a dramatist; yet his Tamburlaine the Great, Dr. Faustus, The Jew of Malta and Edward II, despite the bombast and extravagance by which they are freguently marred, give him the place of pre-eminence among pre-Shakespareen playwrights. In these plays he really fixed the type of tragedy and chronicle play for his immediate successors, and in them also he introduced blank verse to the romantic drama and the public stage.

That Shakespeare, who must have known him well. and who probably collaborated with him,was at first profoundly influenced by him is evident. His early blank verse is fashioned on Marlowe's His narrative poem, Venus and Adonis, is in part at least inspired by Marlowe's Hero and Leander. His Richard III and Richord II are clearly based on the model of chronicle play provided in Edwar᷈ ᷈I. Even in The Merchant of Venice ther᷈ ᷈e many details ot show that Shakespeare wrote with The Jew of Malta in mind.

## SHAKESPEARE'S LIFE

**Pradeep Girkar**
XII Science

WILLIAM SHAKESPEARE was born on or about the 23rd April, 1564 , at Stratford on Avon, Warwickshire. He was the son of a prosperous tradesman of the town, who a little later became its High Bailif or Mayor. Though there is no actual record of the fact, it is practically certain that, like other Stratford boys of his class he went to the local Grammar School, an excellent institution of its kind, where he was taught Latin and arithmetic. While he never became a learned man, his few years at school thus gave him a sound education as far as it went. Financial misfortunes presently overtook his father, and when he was about fourteen, he was taken from school that he might help the family by earning money on his own account. In his 19th year he married Anne Hathaway, a woman eight years his senior the daughter of a well to do yeoman of the neighbouring village of Shottery. This marriage was hasty and ill advised, and appears to have been unhappy. Three children were born to him Susannah, and the twins, Judith and Hamnet, Tradition says that meanwhile he fell into bad company, and that a deer stealing escapade in the woods of Cherlecote Hall obliged him to fly from home. There may or may not be truth in this story. We cannot tell. It is certain that a few years after his marriage roughly, about 1587 he left his native town to seek

his fortunes in London. At this time, the drama was gaining rapidly in popularity through the work of the University Wits. Shakespeare soon turned to the stage, and became first an actor, and the ( though without ceasing to be an actor) a playwright An ill-natured reference to him in a pamphlet written by Greene on his deathbed, shows that in 1592 he was well known as a succeesful author. He remained in London upwards of twenty years after this, working hard, producing on an average a couple of plays a year, and growing steadily in fame and wealth.

He became a shareholder in two of the leading theatres of the time, the Globe and the Black-friars, and purchased property in stratford and London. But the years which brought prosperity also brought domestic sorrows. His only son died in 1596 : his father in 1607 his younger brother Edmund, also an actor, in 1607 and his mother in 1608 Then between 1610 and 1612 he retired to Stratford, where he had bought a house-the largest in the town known as New.Place His elder daughter had already (1607) married Dr. John Hall, who was later celebrated as a physician, on February lo 1616, Judith became tha wife of Thomas Quiney, whose father had been one of the poet's closest friends. By this time Shakespeare's health had broken down completely, and he died on the 23rd April of that year. Shakespeare's biography proves conclusively that. like Chaucer, he was no dreamer, but a practical man of affairs. He reached London poor and friendless; He left it rich and respected; and his fortunes were the work of his own hand.

Much light is thus thrown not only upon his personal character. but also upon his writings, in which great powers of creative imagination are combined with, and supported by, a wonderful feeling for reality, sound commonsense, and a large and varied familiarity with the world. of the learning which is shown in his plays, and about which so much has been written it is enough here to say that it is not the learning of the trained and accurate scholar – of a Bacon or a Ben Jonson but rather the wide miscellaneous knowledge of many things, which was naturally accumulated by an extraordinarily assimilative mind during years of contact with men and books at a time when all social intercourse and all literatuse were alike saturated with the classicism of the Renaissance. Translations gave him easy access to the treasures of ancient literature; the intellectual atmosphere of the environment in which he lived and worked was charged with new ideas, and was immensely stimulating; and Shakespeare was pre-eminently endowed with the happy faculty of turning everything that came to the best possible account.

# Characteristics of Shakespere's Works

**Prasad Gothoskar**
XII Science

Taken as a whole, Shakespeare'r plays constitute the greatest single body of work which any writer has contributed to our literature. Perhaps their most salient feature is their astonishing variety Other men have surpassed him at this point and that; but no one has ever rivalled him in the range and versatility of his powers. He was (though not equally) at home in tragedy and comedy, and his genius took in innumerable aspects of both; he was supreme, not only as a dramatist but also as a poet to whom the worlds of high magination and delicate fancy were ailike open; and while not himself a very profound or very original thinker, he possessed in a superlative degree the faculty of digesting thought into phraseology so memorable and so final that, as we all know, he is the most often duoted of all English writers. He was almost entirely free from dogmatism of any kind and his tolerance was as comprehensive as his outlook. In the vitality of his characterisation in particular he is unparalleled; no one else has created so many men and women whom we acceqt and treat not as figments of a poet's brain, but as absolutely and completely alive. His uniqve command over the resources of the language must also be noted; his vocabulary is computed to run to some 15,000 words, while that of Milton contains scarcely more than half that number.

The greatness of Shakeepeare's work is apt to blind critics to his limitations and defects, but these must, of course, be recognised in any estimate of him, or otherwise we shall get him out of his proper focus, Broad as hs was, he was essentially a man of his time, and while his plays are remarkable for their general truth to what is permanent in human nature, still his interpretation of human nature is that of an age in many respects very different from our own. He wrote hurriedly, any signs of hasty and ill sonsidered production are often apparent·

Designing his plays properly for the stage, and anxious to secure their success under the actual conditions of stage he was willing at time to sacrify consistency of character and the finer demands of art to the achievement of a telling theatrical effect. In his occasional coarseness he reflects the low taste of the ' grondlings ' to whom he had to appeal. At places his psychology is hopelessly crude and unconvincing; his style vicious his wit forced and pcor; his tragic language bombastic.These and other faults will be conspicuous to anyone who reads him in the least critically. But they are small things afterall in comparison with those paramount qualities which have given him the first place among the world's dramatists,

□□

# The Elizabethan Romantic Drama

**Sarala Kubal**
XII Science

The Elizabethan Romantic Drama : The quarter-century or so which followed the production of Gorboduc was a period of great confusion in the English drama. On the one hand, thare were scholars who cherished the ambition of naturalising the Senecan, or ' Classic, ' species of play, of which Sackville and Norton's tragedy had been an example, and their efforts were seconded by humanists like Sir Philip Sidney, who believed that the only sure way to a really artistic drama lay through the faithful imitation of ancient models. On the other hand, the writers and actors who catered for the amusement of the miscellaneous unscholarly public, knowing that their patrons cared little for the finer detils of art, and much for exciting plots and. vigorous action, rejected altogether the decorous Senecan conventions and struck out into a variety of experiment all of them very crude, in a type of play which rested upon entirely different ideas of construction, These experiments may be regarded as a natural elaboration of the dramatic elements of the older English stage. and as a groping in the dark after a larger and freer art than was possible under the cramping conditions of the Senecan style. There was thus a temporary conflict between the humanists, who stood for classical tradition, and sought to impose it upon the people, and the strong national taste of the English public, who demanded a quite different sort of thing. In the end, the national taste triumphed, and just before Shakespeare began his career as a playwright the ' romantic ' form of drama was definitely established.

The establishment of this romantic drama was the achievement of Shakespeare's immediate predecessors a group of university men who had been trained in the school of the classics, and had learned much there about dramatic workmanship, but who, while profiting their lessons, discarded their spacial principles of composition, and instead carried forward the free tradition of the popular stage.

Before we turn to their work, however, we must be sure that we understand, at least in a general way, the difference between the so-called 'classic' and 'romantic' type of play.

Confining our attention to the points which immediately concern us here, we may epitomise the principles of the classic drama under their heads :
1) It adhered rigorously to unity of subject and tone, and as a result, it kept the spheres of tragedy and comedy entirely separate A tragedy had to be a tragedy from the first to the last, it had to maintain the proper tragic pitch and avoid

all suggestion of familiarity, and no humorous episode was permitted in it; comedy had to be a comedy from the first to the last, and no tragic element was allowed to enter into its composition; 2) There was little or no dramatic action, the incidents composing the plot taking place off the stage, and being reported to the audience in dialogue and set narrative;

3) In theory, at all events, the three unities of time, place and action controlled the construcrion, by which we mean, in the briefest possible statement (a) that the the entire story of a play had to be confined to a single day, (b) and to a single scene, and (c) that it was to be one single story only, without subplots or minor episodes of any kind. These principles were derived, or more correctly speaking, were supposed to be derived, from the practice of the Attic writers of tragedy and the teachings of the great Greek critic Aristotle; but they came into the modern drama through the plays of the Latin p[illegible] Seneca, in which they were exhibited in their severest form. The particular type of drama which the humanists sought to introduce is now clear, and we are also in a position to understand the general characteristics of the opposed type, which Shakespeare's forerunners established in its place. for the romantic, or Shakespearean drama (i) makes free use of variety in theme and tone, often blending tragic and comic incidents and characters in the same piece; (2) While it, of course, employs both action and narrative in carrying on a plot, it is essentially a drama of action, nearly everything that happens being represented on the stage; and (3) it repudiates the three unities (a) allowing the story, on occasion, to extend over months end even years; (b) Changing the scene as often as s neceesary, sometimes from one town or country to another; and (c) employing subplots and minor episodes in connection with its central subject.



# कॉलेज डायरी

# १९८९–९०

## वरिष्ठ विभाग

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी बजावली. १९८६ ते १९८८ या सलग तीन वर्षात आमच्या महाविद्यालयातील इतिहास विभागाचे विद्यार्थी मुंबई विदयापीठात प्रथम व व्दितीय क्रमांक मिळवत आले आहेत. यावर्षीही 'ग्रामीण विकास' या विषयात राजेंद्र मुंबरकर हा विद्यार्थी विदयापीठात बी. ए. परीक्षेत प्रथम आला आहे. बी. ए. परिक्षेत एकूण १७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले. यावरून महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावल्याचे स्पष्ट दिसते.

यावर्षी महाविद्यालयाची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी प्राचार्यांनी प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यावर वर्षारंभीच विविध जबाबदाऱ्या सोपवल्या व वर्षभरातील उपक्रमांचे नियोजन केले. त्यानुसार विद्यार्थी मंडळाच्या निवडणूक विभागाची जबाबदारी प्रा. सुरेश सोनटक्के, साक्षरता मोहीम व जिमखाना प्रमुख प्रा. एल. डी. गोलतकर, स्टाफ ॲकॅडमी व सांस्कृतिक विभाग-प्रा. गोठोस्कर, विविधा, उत्कृष्ट वाचक योजना वक्तृत्व व वाङमय विभाग–प्रा. आनंद जरग, रसराज, आठवड्यातील आवडलेली बातमी व प्रसिद्धि विभाग–प्रा. विनायक पाटील, राष्ट्रीय सेवा योजना –प्रा. मधूकर गावडे, सहल विभाग–प्रा. आर. जी. जाधव अशी कामाची विभागणी करण्यात येऊन कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. वर्षभरातील महाविद्यालयाची दैनंदिनी पुढीलप्रमाणे–

सिंधुदुर्ग वृक्षमित्रसेवा संघाच्या वतीने कुडाळ येथे आयोजिलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत महाविद्यालयीन गटात आमच्या महाविद्यालयाची कु. संगीता बर्वे ही विद्यार्थिनी व्दितीय आली.

ते १८–७–८९ या कालावधीत विद्यार्थ्यांना पुस्तक पेढीमार्फत पुस्तके वाटण्यात आली. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तकांचा एक संच मोफत वर्षभर वाचण्यासाठी व इतर सर्व विद्यार्थ्यांना दोघांत एक संच देण्यात आला.

३१ जूलै रोजी स्टाफ ॲकॅडमीतर्फे प्रा. हेमंत चव्हाण यांचे Poetry of keats यावर पहिले व्याख्यान झाले. प्राध्यापकांत वैचारिक देवाण-घेवाण व्हावी या उद्देशाने हा विभाग स्थापन करण्यात आला आहे.

२ ऑगस्ट रोजी विविधा व्यासपीठातर्फे देवगडचे प्रसिद्ध कीर्तनकार मधुकर गोगटे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाव्दारे रायगड–रत्नागिरी जिल्ह्यातील आपद्ग्रस्तांना मदतनिधी जमवण्यात आली.

८ ऑगस्ट रोजी याच व्यासपीठामार्फत 'मराठीचा व्यवहार व साहित्याभिरुची' या विषयावर संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळचे प्राचार्य श्री. दत्ता पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

